## प्रकरण दुसरे

# १७२० पर्यंतचा मराठ्यांचा प्रदेश विस्तार - विशेष संदर्भ कोकण किनारपट्टी

इ.स.१७२० ते १७४० या कालखंडात पेशवा बाजीराव हा पेशवा होता. त्याने त्याच्या कारकीर्दीत मराठ्यांच्या सत्तेचा पेशवा या नात्याने मराठा सत्तेच्या विस्तारासाठी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष काय प्रयत्न केले याची सविस्तर चर्चा पुढील तिसऱ्या प्रकरणी आपण करणार आहोत. प्रस्तुत प्रकरणात आपणास मराठी सत्तेच्या उदयापासून ते बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूपर्यंतच्या काळापर्यंतचा म्हणजे १७२० पर्यंतच्या मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराचा आढावा घ्यावयाचा आहे.

यामध्ये छ.शिवाजी महाराज, छ.संभाजी, राजाराम, ताराबाई आणि छ.शाहू आणि त्याचा पेशवा बाळाजी विश्वनाथ इ.च्या कारकीर्दीचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

छ.शिवाजी महाराजांनी १६७४ मध्ये स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला आणि स्वत:चे स्वतंत्र राज्य निर्माण झाल्याचे जाहीर केले. आतापर्यंतच्या महाराष्ट्राच्या अंध:कारमय इतिहासाच्या पार्श्वभूमीवर ही गोष्ट फार मोठी होती. सभासदाच्या शब्दात सांगायचे तर, ''राजे सिंहासनारुढ झाले, या युगी सर्व पृथ्वीवर म्लेच्छ बादशहा मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती झाला. हो गोष्ट काही सामान्य झाली नाही''[१] छ.शिवाजीने स्वत:ला राज्याभिषेक करुन मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण केले. त्या अगोदर सर्वसाधारण १६४५-४६ पासून ते राज्याभिषेकांपर्यंत त्याला अनेक स्वकीयांशी व परकियांशी सतत लढे देत रहावे लागले. इथे प्रश्न असा उपस्थित होतो की, शिवाजीला एकदम स्वराज्याची कल्पना कशी सुचली? शिवाजीची स्वराज्याची कल्पना त्याची स्वत:चीच की अन्य कुणाची? वा.सी.बेंद्रे म्हणतात, ''राज्यक्रांतीच्या उठावास जी भूमिका तयार असावी लागते ती सर्व जवळजवळ मालोजी राजे आणि शहाजी राजे यांच्याच कालखंडात तयार झाली होती.''[२] इतिहासतज्ञ दि.वि.काळे म्हणतात, ''शिवाजीच्या पराक्रमाला जी अनुकूल परिस्थिती मिळाली तिचो सुरुवात त्याचा आजा मालोजी याच्याच कर्तबगारीने झाली.''[३] रियासतकार सरदेसाई म्हणतात, ''जर शिवाजीस राज्य संस्थापक म्हणावयाचे तर शहाजीला राज्य संकल्पक असे पद देण्यास हरकत नाही.''[४] याउलट मराठी राज्याच्या स्थापनेचे सर्व श्रेय छ.शिवाजी महाराजांनाच देणारे काही इतिहास संशोधक आहेत. प्रा.त्र्य.शं.शेजवलकर, सेतुमाधवराव पगडी, न.र.फाटक, प्रा.सदाशिव आठवले इ. मंडळींच्या मते मराठ्यांच्या स्वराज्य निर्मितीमागे इतर प्रेरणा वगैरे काही नव्हत्या. स्वराज्याचा मामला हा फक्त शिवाजीचाच होता. वस्तुत: महाराष्ट्रात सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठ्यांचे स्वराज्य शिवाजीने स्थापन केले. त्याला अनेक घटक जबाबदार ठरले. किंबहुना तत्कालीन परिस्थितीचा यथायोग्य उपयोग करुन घेऊन शिवाजीने महाराष्ट्रात मराठ्यांचे स्वराज्य निर्माण केले असे म्हणणेच अधिक संयुक्तिक होईल.

शिवाजीने स्वराज्य निर्माण केले. पण साम्राज्य निर्माण केलेली नाही. मात्र 'पुण्यात येताच बारा मावळे काबीज

केली.''[५] असे जे सभासद म्हणतो त्यापेक्षा शिवाजीच्या मृत्यूच्या सुमारास पुष्कळच प्रदेश शिवाजीच्या ताब्यात होता आणि शिवाय हा सर्व स्वतंत्र होता. बारा मावळाच्या पलिकडे जाऊन राज्य विस्ताराच्या योजना शिवाजीने आखल्या. त्यातूनच त्याच्यावर मोऱ्यांशी, अफजलखानाशी लढण्याचा प्रसंग आला. शिवाजीच्या आयुष्यातील अफजलखान प्रकरण हे भयंकर प्रकरण होते. १०-११-१६५९ रोजी शिवाजीने जी अफजलखानाशी सलामी दिली, त्यात तो पराभूत झाला असता तर इतिहास कदाचित बदलला असता. तथापी त्या प्रकरणात शिवाजीने अफजलखानाचा पराभव करुन विजापूरला एक मोठा हादरा दिला हेच खरे.

२-i) **कोकण किनारपट्टी आणि मराठे –**

छ.शिवाजी महाराज स्वातंत्र्याच्या प्रेरणेने भारावलेले होते आणि म्हणून त्यांनी इतर अनेक प्रांताप्रमाणे कोकण प्रांतातही आपल्या हालचाली सुरु केल्या. या हालचाली विशेषत: जावळी विजयानंतरच्या दिसतात. राज्याभिषेकापर्यंत कोकणवर महाराजांनी अनेक युध्द मोहीमा काढल्या. तथापी त्याचबरोबर महाराजांच्या सैन्याने दूरवर कर्नाटकाकडेही मजला मारलेल्या दिसतात. १ ऑक्टोबर १६५८ च्या एका पत्रात उल्लेख आहे की, ''साहेब कर्नाटक प्रांती मसलतीस गेले.''[६] प्रा.ग.ह.खरे म्हणतात याचा अर्थ असा की, ''शिवाजी महाराज सन १६५८ मध्येच कर्नाटक स्वारीवर गेले होते. हे स्पष्ट होते.''[७] परंतू या पलिकडे जाऊन खरे त्या स्वारीचा खुलासा करताना दिसत नाही. १६५९ नंतर शिवाजीच्या दृष्टीने महत्वाचे प्रसंग म्हणजे शाईस्तेखान प्रकरण (१६६३), सुरतची लूट, पुरंदरचा तह, आग्रा भेट - सुटका, राज्याभिषेक, कर्नाटकचे राजकारण आणि अखेर मृत्यू असा त्याचा जीवनपट आहे हे सर्वश्रूत आहेच.

मात्र या प्रकरणात मराठे आणि किनारपट्टी असाच विचार करावयाचा असल्याने सुरुवातीस शिवाजी महाराजांच्या कोकण स्वारीचा विचार केलेला आहे.

**<u>छ.शिवाजी महाराजांची कोकण मोहीम –</u>**

शिवाजी महाराजांनी जावळी जिंकल्यानंतर राज्याभिषेकापर्यंत कोकणवर अनेक युध्द मोहीमा काढल्या. या युध्द मोहिमात त्यांना मोंगल, आदिलशाही, सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज आणि डच या परकीय सत्तांना तोंड द्यावे लागले. याशिवाय त्यांना शृंगारपुरचे सुर्वे, सावंतवाडीचे लखम सावंत, कुडाळचे देसाई, दाभोळचे दळवी, पालवणचे जहागीरदार, बेदनूरचे नाईक इत्यादी देशस्थ शत्रूंशी सामना करावा लागला. यातले बहुतेक सर्वच शत्रू पश्चिम समुद्र किनारपट्टीवरुन आरमाराद्वारे महाराजांना एकसारखे सतावत होते. तेव्हा महाराजांनी स्वराज्य संरक्षणासाठी सागरी महत्व जाणून पश्चिम किनारपट्टीवर आरमारी दुर्गांची अभेद्य रांगच नव्याने निर्माण केली. 'ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र'[८] हे ओळखून महाराजांनी परकीय सत्तांना शह देण्यासाठी प्रचंड आरमाराची उभारणी केली. आरमाराकडे लक्ष देणारा मध्ययुगातला शिवाजी हाच एकमेव एतद्देशीय राजा 'द्रष्टा राष्ट्रपुरुष' ठरतो.

**<u>मुघल आदिलशाही आणि शिवाजी यांचे संबंध –</u>**

महमद आदिलशहाच्या मृत्यूनंतर विजापुरी दरबारात माजलेल्या गोंधळाचा फायदा घेऊन महाराजांनी कोकणात

प्रवेश केला. याचवेळी रापुत्र औरंगजेब दक्षिणेच्या सुभेदारीवर आला होता. त्याने दक्षिणीशाह्या पादाक्रांत करण्यासाठी युध्दमोहीमा चालू ठेवल्या होत्या. कुतुबशाहीवर स्वारी करुन त्याने गोवळकोंड्याचे राज्य मांडलिक बनविले. त्यानंतर त्याने विजापुरावर हल्ला करुन शहराला वेढा घातला.

सन १६३६ मध्ये मुघल व आदिलशहा यांनी निजामशाही खालसा केल्यानंतर निजामशाही आपसात वाटून घेतली. त्यांच्यात झालेल्या तहानुसार मुघल बादशाहला उत्तर कोंकणचा भाग मिळाला. उत्तर कोकणात नगर, कल्याण, भिवंडी, वसई, जुन्नर, महाड, डहाणू, चौल, पनवेल, नागोठणा, माहुली वगैरे भाग मोडत होता. यालाच 'निजामशाही कोकण' म्हटले जाई.

याच तहानुसार आदिलशाहीला निजामशाहीतला दक्षिण कोकणचा भाग मिळाला. यात दाभोळपासून ते गोव्यापर्यंतचा प्रदेश मोडत होता. म्हणजेच पुणे, सुपे, चाकण, बारामती, इंदापूर, दाभोळ, संगमेश्वर, रत्नागिरी, चिपळूण, विशाळगड इत्यादी प्रदेश 'आदिलशाही कोकणा' त येत होता.

याचवेळी आदिलशाही व शहाजी यांच्यात तह होऊन त्याने आदिलशाहीची नोकरी पत्करली. तेव्हा आदिलशहाने शहाजीला भीमा व नीरा या नद्यांमधला प्रदेश जहागीर म्हणून दिला. या शहाजीच्या जहांगिरीत पुणे, सुपे, इंदापूर, चाकण, बारामती वगैरे भाग मोडत होता. त्यानंतर सन १६३७ मध्ये शहाजीला बेंगळूरची जहागीर मिळाली. त्यामुळे शहाजीने दादोजी कोंडदेवाकरवी शिवाजीला पुण्याची जहागीर दिली.

**मुघल–आदिलशाही तह –**

विजापूरचा महंमद आदिलशहा सन १६५६ मध्ये मृत्यू पावल्यानंतर बडी साहेबीण छोट्या अली आदिलशहास गादीवर बसवून विजापूरचा कारभार करु लागली. तिच्या अंतस्थ कारस्थानामुळे विजापूर दरबारात गोंधळ माजला. या संधीचा फायदा घेऊन राजपूत्र औरंगजेगबाने विजापूरावर हल्ला केला.

१) अली आदिलशहा या महंमदचा तोतया वारस आहे, त्यामुळे त्याला विजापूरच्या गादीवर बसण्याचा अधिकार नाही. २) गादीवर बसण्यापूर्वी त्याने मुघल सम्राटाची मान्यता घेतली नाही ही कारणे पुढे करुन औरंगजेबाने जून १६५७ मध्ये विजापूरला वेढा घातला. त्याने द्रव्याचे आमिष व धाक दाखवून अनेक विजापुरी सरदारांना आपल्याकडे वळवून घेतले. अशा परिस्थितीत शहाजहान बादशहाने औरंगजेबास विजापूरचे राज्य खालसा करण्याची आज्ञा दिली. जरी आदिलशाही खालसा करता आली नाही, तरी १६३६ च्या तहानुसार विजापूरकरांना दिलेला दक्षिण कोकण ताब्यात घ्यावा किंवा दीड कोट खंडणी घेऊन विजापूरकरांशी तह करावा असा तगादा शहाजहान बादशहाचा होता.

बादशहाच्या आज्ञेनुसार औरंगजेबाने विजापूराभोवती प्रचंड सैन्यानिशी वेढा घातला. तेव्हा हा धोका टाळण्यासाठी आदिलशहाने ऑगस्ट १६५७ मध्ये औरंगजेबाबरोबर तह केला. या तहानुसार आदिलशहाने मुघलांना दक्षिण कोकण (आदिलशाही कोकण) आणि एक कोट खंडणी देऊ केली. तेव्हाच औरंगजेबाने विजापूरचा वेढा

उठवून माघार घेतली.

या तहानुसार आदिलशहाने मुघलांना शहाजीच्या जहागिरीतला भाग दिल्यामुळे शिवाजीच्या स्वराज्यातील पुणे, सुपे, चाकण, बारामती, इंदापूर, कल्याण वगैरे भाग मुघलांकडे जाणार होता. या भागालाच त्या काळी 'आदिलशाही कोकण' म्हणून ओळखले जात होते.

हा प्रदेश विजापूरकरांनी तहाद्वारे मुघलांच्या स्वाधीन केल्यामुळे महाराजांच्या स्वराज्याचे अस्तित्वच धोक्यात आले. त्यांनी आदिलशहाची कमकुवत शक्ती जाणून तिचे लचके तोडले होते. परंतु प्रचंड मुघली शक्तींशी संघर्ष करुन स्वराज्याचा प्रदेश जिंकून घेणे त्यांना शक्य नव्हते. तेव्हा महाराजांनी सोनोपंत डबीर या वकिलास मुघलांकडे पाठवून त्यांच्याशी मैत्रीचे संबंध जोडले. त्यांनी पुणे, कल्याण, भिवंडी व चौल हा प्रदेश जहागीर म्हणून मुघलांच्याकडे मागितला. या मोबदल्यात महाराजांनी मुघलांची तात्पुरती मांडीलकी मान्य केली. परंतु औरंगजेबाने शिवाजीस 'दाभोळ घेऊन ते तुमच्याकडे ठेवा,' असे सांगितले. दाभोळचा प्रदेश हा आदिशाहीतला होता. तेव्हा हा संघर्ष टाळण्यासाठी महाराजांनी आदिलशाहीशी मैत्रीचे संधान बांधले. मुघलांना आदिलशाहीसारखा शत्रु जिवंत ठेऊन महाराजांनी मुघलाना शह देण्याचे ठरविले.

सप्टेंबर १६५७ मध्ये शहाजहान बादशहा आजारी पडला. अशावेळी दारा, सुजा आणि मुराद हे औरंगजेबाचे भाऊ तक्त बळकावण्यासाठी दिल्लीकडे निघाले होते. याचा सुगावा औरंगजेबास लागताच त्याने दक्षिणेतले राजकारण अर्ध्यावरच सोडून दिले. त्यानंतर तो घाईघाईने आपल्या भावंडांचा पराभव करण्यासाठी आणि दिल्लीचे तक्त बळकाविण्यासाठी उत्तरेकडे निघाला. या संधीचा फायदा घेऊन महाराजांनी स्वराज्यविस्तार करण्यासाठी कोकणावर मोहीम काढली.

**<u>कोकण मोहीम –</u>**

औरंगजेब कुतुबशाही आणि आदिलशाही स्वारीवर असताना महाराजांनी जून १६५७ मध्ये कोकणावर चढाई केली. त्यांनी मुघलांचा अहमदनगर व जुन्नरचा प्रदेश लुटला. या लुटीत त्यांना अमाप संपत्ती व पुष्कळ घोडे मिळाले. त्यानंतर औरंगजेब उत्तरेकडे गेल्याचे पाहून महाराजांनी जानेवारी १६५८ मध्ये दाभोळ, भिवंडी, संगमेश्वर, चिपळूण, तळं, घोसाळं, बिरवाडी आणि माहुलीचा किल्ला इत्यादी भाग जिंकून घेतला. ह्या प्रदेशावर ताबा ठेवण्यासाठी महाराजांनी जवळच असलेल्या सागाच्या जंगलाचा उपयोग करुन ताटवे बांधली. त्यामुळे महाराजांचे आरमार पनवेल, भिवंडी, कल्याण वगैरे बंदरातून ये-जा करु लागले. या आरमाराचा पोर्तुगीज, सिद्दी व इंग्रज यांच्या आरमारी हालचालींना शह बसू लागला. त्यानंतर महाराजांनी कोकणची व्यवस्था लावण्यासाठी कल्याणच्या सुभेदारीवर दादाजी बापूजीची नेमणूक केली आणि ते सावंतवाडीस आले.

**<u>शिवाजी आणि लखम सावंत यांचे संबंध –</u>**

कल्याण व भिवंडीची व्यवस्था लावल्यानंतर महाराज सावंतवाडीस आले. कारण वाडीचे सावंत हे एक बडे

ग्रस्थ होऊन बसले होते. १५ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून सावंतवाडीचा प्रांत आदिलशाहीच्या ताब्यात होता. आदिलशहाने खेमसावंत भोसले यांना हा प्रांत जहांगीर म्हणून दिला होता. परंतु सन १६२७ मध्ये खेमसावंत यांनी आदिलशाहीचे मांडलिकत्व झुगारुन आपले स्वातंत्र्य जाहीर केले. त्यानंतर १६५० मध्ये खेमसावंत यांच्या लखम सावंत या पुत्राने कुडाळच्या देसायांचा मुलूख काबीज केला. आदिलशाहीच्या भीतीमुळे लखम सावंताने महाराजांचे मांडलिकत्व स्वीकारले. महाराजांनी त्याला सरदेसाई हा किताब देऊन स्वराजाच्या सेवेत रुजू करुन घेतले.

गोव्याच्या पोर्तुगीज व्हाईसरॉयने ५ मे १६५८ च्या पत्रात शिवाजी आणि लखम सावंत यांच्या संबंधाचे वर्णन केले आहे. लखम सावंताने शिवाजीची मांडलिकी पत्करताच आदिलशहाने सावंताचे पारिपत्य करण्यासाठी रुस्तुमजमान यांस स्वारीवर पाठविले, त्याने सावंताचा रांगणा किल्ला घेतला. परंतु सावंताने त्याचा पराभव करुन त्याचे पंधराशे लोक ठार मारले. पुढे ५ मार्च १६५९ रोजी शिवाजी आणि लखम सावंत यांच्यात तह होऊन त्याने शिवाजीचे मांडलिकत्व स्वीकारले. [९]

**<u>शिवाजी आणि लखम सावंत यांचा तह –</u>**

१) या तहानुसार लखम सावंताने राज्याचा अर्धा भाग शिवाजीच्या स्वाधीन करावा आणि त्यातला महसूल दरसाल द्यावा. जहागिरीतल्या अर्ध्या उत्पन्नात तीन हजार शिपाई ठेवावेत आणि ज्यावेळी बोलावणे होईल त्यावेळी फौजेनिशी महाराजांच्या सेवेत रुजू व्हावे.

२) जहागिरीतील फोंडा किल्ला महाराजांच्या ताब्यात ठेवावा आणि किल्ल्याच्या संरक्षणासाठी सावंताने मदत करावी. बेदनूरसारख्या संस्थानाच्या खंडण्या घेण्यास स्वारी निघेल त्यावेळी सावंताने महाराजांच्या मदतीस यावे.

३) स्वराज्य विस्ताराच्या कार्यात मदत करावी.

४) महाराजांचे अधिकारी जमाबंदीच्या चौकशीसाठी जहागिरीत वेळोवेळी येतील त्यास सावंताने मदत करावी.

५) या प्रांताची देसकत (मालकी), वतने व बहादूर किताब सावंताकडेच रहावा आणि त्यातील किल्ले व ठाणी सावंताच्या ताब्यात असावी.

अशाप्रकारे लखम सावंत यांनी शिवाजीस राजा मानून त्याच्या स्वराज्यात राहण्याचे कबूल केले. त्यामुळे तूर्त तरी कोकणातल्या परकीय सत्तांना शिवाजी व सावंताचा शह बसला. परंतु हा तह क्षणभंगुर ठरला. कारण लखम सावंताने हा तह अमान्य करुन विजापूरच्या सुलतानाचे मांडलिकत्व स्वीकारले.

**<u>शिवाजी–सुर्वे संबंध –</u>**

दक्षिण कोकणात शृंगारपुरचे सुर्वे हे विजापूरकरांचे जहागीरदार होते. ते विजापूरकरांच्या आज्ञेत होते. त्यांनी शिवाजीच्या स्वराज्यात हस्तक्षेप केला होता. तेव्हा शिवाजीने त्याला स्वराज्यात सामील करुन घेण्याचा प्रयत्न

केला. परंतु तो स्वराज्याच्या आड येऊ लागला. हा स्वराज्यातला अडसर दूर करण्यासाठी शिवाजीने शृंगारपूरावर हल्ला केला. तेव्हा सूर्यराव सुर्वे पळून गेला. अशाप्रकारे शिवाजीने शृंगारपूर आणि सावंतवाडीचा काही भाग स्वराज्यात आणला. त्यानंतर त्यांनी अफजलखानाच्या भयंकर संकटाला तोंड देण्यासाठी जावळीस प्रयाण केले.

शिवाजी महाराजांनी अफजलखानावर पूर्ण विजय मिळविल्यानंतर विजापूर, पन्हाळा आणि कोकणात दंडाराजापुरीकडे युध्द मोहीमा काढल्या. यावेळी महाराज स्वत: फौज घेऊन पन्हाळा, कोल्हापूर व मिरज प्रांतावर चाल करुन गेले. त्यांनी केवळ १८ दिवसातच पन्हाळा घेऊन मिरजेच्या किल्ल्यास वेढा घातला. परंतु सिद्दी जौहरने महाराजांचा पाठलाग करुन २ मार्च १६६० रोजी पन्हाळ्यास वेढा घातला. त्याचा वेढा लवकर उठेना म्हणून महाराजांनी १३ जुलै १६६० च्या रात्री पन्हाळ्याहून विशाळगडास पलायन केले.

**<u>शिवाजी कोकणच्या स्वारीवर –</u>**

पन्हाळ्याच्या वेढ्यातून मुक्त झाल्यानंतर महाराजांनी जानेवारी १६६१ मध्ये कोकणावर चौफेर मोहिम काढली. कारण आदिलशाही आणि मुघल यांची युती होण्यापूर्वीच त्यांना कोकणचे राजकारण उरकावयाचे होते. पश्चिम किनारपट्टीवर इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी, सुर्वे, दळवी, लखम सावंत इत्यादी शत्रू महाराजांच्या विरुध्द पुन: पुन: डोके वर काढीत होते. या सर्वांना साम, दाम, दंड, भेद या नीतीने वठणीवर आणावयाचे होते. त्यामुळे महाराजांनी उत्तर कोकणावर चाल केली आणि उंबरखिंडीत मुघलांना चोपून काढले.

**<u>उंबरखिंडीची लढाई –</u>**

महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकले त्यावेळी शाहिस्तेखानाने पुणे व चाकणला तळ दिला होता. तेव्हा महाराजांनी पन्हाळगडच्या वेढ्यातून निसटून मुघलाशी युध्द करण्याची तयारी चालू ठेवली. पावसाळा संपल्यानंतर शाहिस्तेखानाने कोकणच्या मोहिमेवर कारतलबखानास पाठविले. या मोंगली सैन्यात रायबागीण ही शूर स्त्री होती. ती उदारामाची बायको होती. या सैन्याने कोकणातील कल्याण, भिवंडी, चौल हा भाग ताब्यात घेतला. महाराजांनी मुघलांच्या या सैन्यात उंबरखिंडीत उतरु दिले. उंबरखिंड इतकी अरुंद होती की, तेथे एका वेळी एकच सैनिक जाऊ शकत होता. मुघल सैन्य खिंड उतरुन पायथ्याशी सपाट प्रदेशावर आले. ही जागा उंच डोंगरांनी वेढली होती. सभोवतालच्या घनदाट जंगलामुळे तेथे वाऱ्याची झुळूकही येत नव्हती. अशा सपाट प्रदेशाच्या सर्व बाजूंस महाराजांनी आपले सैन्य लपवून ठेवून एकदम रणभेदीचा आवाज केला. यावेळी महाराजांचे सैन्य दृष्टीस न पडल्यामुळे मुघलांचे सैन्य गोंधळून गेले. तेव्हा रायबागिणीने कारतलबखानास महाराजांना शरण जाण्याचा सल्ला दिला.[१०] त्याप्रमाणे मुघल सैन्य शरण येताच महाराजांनी त्यांच्याकडून खंडणी घेऊन त्यांस परत जाऊ दिले.[११] त्यामुळे महाराजांचे उत्तर कोकणावर वर्चस्व स्थापन झाले.

**<u>शिवाजी–इंग्रज यांची कोकणात चुरस –</u>**

अफजलखानाच्या वधानंतर महारांनी दोरोजीस दक्षिण कोकणवर पाठविले. कारण दाभोळ येथे अफजलखानाने

आपली तीन गलबते ठेवली होती. खानाच्या वधानंतर विजेचा या नात्याने शिवाजीची मालकी त्या गलबतावर होती. तेव्हा दोरोजीने दाभोळवर हल्ला केला. त्यावेळी महमूद शरीफ हा दाभोळचा सुभेदार होता. दोरोजीच्या हल्ल्याची वार्ता समजताच सुभेदाराने राजापूरला गलबते पाठवून इंग्रजांचा आश्रय घेतला. दोरोजीने राजापूरावर हल्ला करुन इंग्रजांचा माल जप्त केला आणि गिफर्डला कैदेत टाकले. रेव्हिंग्टन हा तेथील अधिकारी पळून गेला. पुढे त्याने कित्येक दिवस महाराजांच्याजवळ गिफर्डच्या सुटकेची रदबदली चालू ठेवली. तेव्हा महाराजांनी गिफर्डची सुटका केली. अशा प्रकारे शिवाजी-इंग्रज वितुष्ट काही काळ तरी मिटले.

महाराज पन्हाळगडच्या वेढ्यात अडकले त्यावेळी राजापूरच्या इंग्रजांनी पुन: शिवाजीविरुध्द उचल खाल्ली. इंग्रजांनी सिद्दी जौहरला तोफा व दारुगोळ्याचे सहाय्य केले. तेव्हा महाराजांनी मार्च १६६१ मध्ये तानाजी मालुसरे व पिलाजी निलकंठ यांच्या फौजा बरोबर घेऊन राजापूरावर हल्ला केला. तेथील इंग्रजांच्या मदतीस असलेल्या मुसलमानी फौजांचा पराभव करुन त्यांनी राजापूर लुटले. तेथील रेव्हिंग्टन व सात इंग्रज यांना महाराजांनी कैदेत टाकले. त्यानंतर मराठ्यांनी त्यांची वखार लुटून तेथील रोकड व मालमत्ता जप्त केली. त्यांनी जमिनीखाली पुरलेली संपत्ती उकरुन काढली. त्यानंतर महाराजांनी तेथील श्रीमंत व्यापाऱ्यांकडून खंडणी वसूल केली. इंग्रज कैद्यांच्या सुटकेसाठी ऑक्झिडेन या कंपनीच्या प्रेसिडेंटने महाराजांशी अनेकवेळा बोलणी लावली. परंतु महाराजांनी कैद्यांची सुटका करण्यासंबंधी टाळाटाळ केली. तेवढ्यात रेव्हिंग्टन हा राजापूरचच्या वखारीचा अधिकारी डिसेंबर १६६१ मध्ये आजारी पडून मृत्यू पावला. शेवटी महाराजांनी इंग्रजांच्याकडून खंडणी घेऊन त्यांची जानेवारी १६६३ मध्ये सुटका केली. याशिवाय इंग्रजांनी महाराजांना सिद्दीविरुध्द मदत करण्याचे अभिवचन दिले. अशाप्रकारे दक्षिण कोकणात महाराजांच्या स्वराज्य विस्ताराला अडथळे निर्माण करणाऱ्या इंग्रजांना त्यांनी कडक शासन केले.

महाराज दाभोळ व राजापूर घेऊन सावंतवाडीस गेले. कारण वाडीचे लखम सावंत, पालवणचा जसवंतसिंग, शृंगारपूरचे सुर्वे व कुडाळचे सावंत हे महाराजांना वारंवार त्रास देत होते. यावेळी महाराजांना बांदा व वेंगुर्ला प्रदेशात लखन सावंतांनी रोखून धरले. परंतु महाराजांनी त्याचा पुन: पराभव केला. त्यामुळे त्याने महाराजांचे वर्चस्व मान्य केले. विजापूरकरांचे संरक्षण मिळण्याची शक्यता नसल्यामुळे तेथील जहागीरदारांनी महाराजांचे वर्चस्व स्वीकारले आणि त्यांनी खंडणी व चौथाई देण्याचे कबूल केले. यातल्या सूर्यराव जहागीरदाराने महाराजांचा विश्वासघात केल्यामुळे महाराजांनी पालवणवर स्वारी करुन त्यास कडक शासन केले. त्यानंतर महाराजांनी खारेपाटण, शृंगारपूर व मुधोळ ही महत्वाची ठाणी घेतली. अशाप्रकारे सन १६६१ च्या दक्षिण कोकण मोहिमेत दाभोळ, प्रभानवल्ली, राजापूर, शृंगारपूर, मुधोळ, सावंतवाडी, संगमेश्वर, चिपळूण ते गोव्यापर्यंत आपले वर्चस्व स्थापन केले. त्यानंतर महाराज संगमेश्वर, महाड, कल्याण, भिवंडीमार्गे राजगडास जून १६६१ मध्ये पोहोचले.

**शिवाजीची कुडाळ प्रांतावर स्वारी –**

महाराजांनी पुण्यास शाहिस्तेखानावर छापा (५ एप्रिल १६६१) घातल्यानंतर जून १६६३ पर्यंत स्वराज्याची

व्यवस्था लावली. तोपर्यंत कोकणात लखम सावंत सुर्वे व डच यांनी महाराजांविरुध्द हालचाली सुरु केल्या. तेव्हा महाराजांनी चार हजार सैन्य बरोबर घेऊन मे १६६३ मध्ये कुडाळ प्रांतावर स्वारी करुन तो प्रांत घेतला.[१२] त्यानंतर त्यांनी वेंगुर्ला घेऊन डच लोकांना लुटले. त्यामुळे शृंगारपूरच्या सुर्व्यांना महाराजांचा शह बसला. यावेळी आदिलशहा कर्नाटकात बहिलोलखानाचे बंड मोडण्यात गुंतल्यामुळे त्याने महाराजांना कुडाळ व वेंगुर्ला हे दोन प्रांत जहागीरी म्हणून दिले. याच सुमारास महाराजांनी राजापूर, विजयदुर्ग, देवगड व मालवण येथील खाड्यात नवी जहाजे बांधून आपले आरमार भक्कम केले.

शाहिस्तेखानाचा पराभव झाल्यानंतर औरंगजेबाने आदिलशहाकरवी महाराजांना कोकणातून हुसकून लावण्याचे प्रयत्न सुरु केले. आदिलशाहाने खवासखानास कोकणवर पाठविले. त्याला बाजी घोरपडे जाऊन मिळाले. या स्वारीचा पूर्व इशारा शहाजीने महाराजांना दिला होता. तेव्हा या दोघांची युती होण्यापूर्वीच महाराजांनी बाजी घोरपड्याच्या मुधोळ या ठाण्यावर हल्ला करुन त्यांस ठार मारले.

बाजी घोरपडे ठार झाल्यानंतर खवासखान वेंगुर्ल्यास आला आणि त्याने ते शहर जाळले. त्यानंतर तो महाराजांच्यावर चाल करुन आला. परंतु महाराजांच्या एका फौजेने त्यास अडचणीत गाठून पराभूत केले. या उलट महाराजांनी आपले सैन्य विजापूरकरांच्या घाटमाथ्यावर पाठवून हुबळी व इतर शहरे लुटली. त्यामुळे त्याला कोकण सोडून घाटमाथ्यावर जाणे भाग पडले. परिणामी कोकण प्रांतावर पुन: महाराजांचे प्रभुत्व स्थापन झाले. त्यांनी याचवेळी सिंधुदुर्ग व हर्णे किल्ले बांधून पूर्ण केले.

**<u>शिवाजीची बसरुरवर स्वारी –</u>**

बसरुरचे (बेदनूर) राज्य शिवाप्पा नायकाच्या ताब्यात होते. त्याने सन १६६० मध्ये गोकर्ण-महाबळेश्वरपासून ते नीलेश्वरापर्यंतचा मुलूख आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. तो सन १६६० मध्ये मृत्यू पावला. त्याच्यानंतर त्याचा भद्राप्पा नावाचा मुलगा गादीवर बसला, परंतु तो सन १६६४ मध्ये एकाएकी मृत्यू पावला. त्यामुळे बसरुरच्या राज्यात गोंधळ निर्माण झाला.

बसरुरचे राज्य गोव्याच्या दक्षिणेस असून त्याच्या समुद्रकिनाऱ्यावर कारवार, अंकोला आणि बार्सिलोर ही बंदरे होती. याशिवाय या राज्यात बार्सिलोरचा व गांगुळीचा किल्ला हे दोन किल्ले होते. तेथील बाजारपेठा प्रसिध्द होत्या. या प्रदेशावर पोर्तुगीज, डच व सावंत याचा डोळा होता. परंतु त्यांना महाराजांची धास्ती वाटत होती. या परिस्थितीचा फायदा घेऊन महाराजांनी ८ फेब्रुवारी १६६५ रोजी स्वत: आरमारानिशी जाऊन बसरुरवर स्वारी केली.[१३] याच दिवशी पोर्तुगालच्या चार्लस् राजाने इंग्रजांना मुंबई हे बेट आंदण म्हणून भेट दिले.

बसरुरच्या स्वारीत महाराजांना पांच लाखाची लूट मिळाली. परंतु सभासदाने, ''महाराजांना या स्वारीत सुरतेच्या लुटीएवढी संपत्ती मिळाली,''[१४] असे म्हटले आहे. परत येताना त्यानी शेरखान सुभेदार, इंग्रज व इतर व्यापाऱ्यांकडून खंडणी वसूल केली. महाराजांनी स्वत: आरमारातून जाऊन केलेली ही शेवटची स्वारी होय. परंतु या

स्वारीचे आरमारी महत्व जाणून त्यांनी आरमार हे आपल्या स्वराज्याचे राज्यांग बनविले. त्यासाठी त्यांनी स्वराज्यातली अर्धी संपत्ती खर्च केली. त्यांनी नजीकच्या काळात खांदेरी, अलीबाग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, मालवण, ठाणे, कुलाबा इत्यादी जलदुर्गांची रांगच पश्चिम समुद्र किनारपट्टीवर उभी केली.

**शिवाजी व आदिलशहा यांचा तह –**

महाराजांनी आग्र्याच्या सुटकेनंतर (१९ ऑक्टोबर १६६६) कोकणवर स्वारी केली. कारण आदिलशहाने बहिलोलखानास कोकणात पाठवून तेथे महाराजांचा प्रदेश जिंकण्यास प्रारंभ केला होता. तेव्हा महाराजांनी बहिलोलखानाचा पराभव करुन त्यास कोकणातून पळवून लावले. परंतु सन १६६७ मध्ये शिवाजी व आदिलशहा यांच्या तह होऊन त्याने महाराजांच्याकडे 'आदिलशाही कोकण' ठेवण्याचे मान्य केले. त्या मोबदल्यात त्याने महाराजांच्याकडून खंडणी घेण्याचे मान्य केले. सारांश, महाराजांनी दक्षिण कोकणवर आदिलशाहीचे नामधारी वर्चस्व मान्य करुन दोघातला संघर्ष संपुष्टात आणला.

**शिवाजीची बारदेशावर स्वारी –**

पोर्तुगिजांनी गोव्यात हिंदूंच्यावर सक्तीने धर्मांतर करण्याबाबतचे हुकूम काढले होते. तसेच त्यांनी लखम सावंत व केशव नाईकया महाराजांच्या शत्रूंना आश्रय दिला होता. डचांनीसुध्दा महाराजांना पोर्तुगीजांच्या विरुध्द चिथावणी दिली होती. अशा अनेक कारणांमुळे महाराजांनी २० नोव्हेंबर १६६७ रोजी पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेल्या बारदेशवर स्वारी केली.[१५] त्यांनी तेथील चार पाद्र्यांची मुडकी तोडून तो मुलूख उध्वस्त केला. त्यामुळे पोर्तुगीजांनी सक्तीच्या धर्मांतराचे आदेश मागे घेऊन सावंत व केशव नाईक यांना आश्रय देण्याचे बंद केले.

**शिवाजीची गोव्यावर स्वारी –**

नोव्हेंबर १६६८ मध्ये महाराजांनी अष्टमी व राजापूरामार्गे गोव्यावर स्वारी करण्याचा बेत रचला होता. परंतु या स्वारीचा सुगावा पोर्तुगीजांना लागल्यामुळे त्यांनी शिवाजी विरुध्द लढण्याची तयारी केली. त्यामुळे महाराजांचा गोव्यावर स्वारी करण्याचा प्रयत्न फसला. तेव्हा महाराजांनी कोकणची व्यवस्था लावून रायगडास प्रयाण केले.

**सिद्दीवर स्वारी –**

जंजिरा हा दुर्ग अरबी समुद्रात एका मोक्याच्या जागी होता. त्यामुळे त्याचे आरमारी व व्यापारी महत्व वाढले होते. हा दुर्ग फत्तेखान सिद्दीच्या ताब्यात होता. जंजिऱ्यावर मोंगल, इंग्रज, पोर्तुगीज इत्यादींचा डोळा होता. परंतु अद्यापी कोणत्याच सत्तेला जंजिरा घेण्यात यश आले नव्हते. महाराजांनी मात्र जंजिऱ्या भोवतालचा दंडाराजापुरी, तळे, घोसळे व बिरवाडी हा प्रदेश घेतला होता. परंतु त्यांनी १६५८, ५९, ७०-७१, ७५, ७६ व ७८ या साली जंजिऱ्यावर युध्द मोहिमा काढूनसुध्दा त्यांना जंजिरा घेता आला नाही. याचे शल्य त्यांना शेवटपर्यंत बोचत राहिले. या दुर्गाचे महत्व ओळखून महाराजांनी सन १६७० मध्ये जवळजवळ जंजिरा जिंकलाच होता. परंतु महाराजांना शरण येत असलेल्या फत्तेखानाविरुध्द सिद्दी संबूळ व सिद्दी कासम यांनी क्रांती करुन त्यास कैदेत टाकले. त्यामुळे महाराजांना

हा दुर्ग शेवटपर्यंत घेता आला नाही.

आली आदिलशहाच्या मृत्यूनंतर (२४ नोव्हेंबर १६७२) विजापूरच्या गादीवर शिकंदर हा त्याचा पांच वर्षाचा मुलगा आला. त्याने सुरुवातीस महाराजांच्या विरुध्द चढाईचे धोरण स्वीकारले. परंतु महाराजांनी त्याला प्रत्येक युध्द आघाडीवर नामोहरम केले. महाराजांनी १६७४ पर्यंत सर्वच शत्रूंवर विजय मिळवून महाराष्ट्रात सार्वभौम स्वराज्य निर्माण केले. त्यांचा विजापूरकर, मोंगल, पोर्तुगीज व सिद्दी यांना धाक बसला. कोकणावर त्यांचा पूर्ण अंमल बसला. अशाप्रकारे स्वराज्याची कार्यसिद्दी पूर्ण झाल्यानंतर महाराजांनी स्वत: 'छत्रपती' होण्यासाठी राज्याभिषेक करवून घेतला. त्यामुळेच परकीय सत्ता आणि स्वजन त्यांना 'राजा' मानू लागले.

**<u>सारांश –</u>**

मोंगलांशी झालेल्या तहानुसार उत्तर कोकणातील कल्याण प्रांत आदिलशाहीकडे आलेला होता. इ.स.१६५६ मध्ये आदिलशहा मृत्यू पावल्यामुळे आदिलशाहीत गोंधळ माजला होता. त्या गोंधळाचा शिवाजीने फायदा घेऊन इ.स.१६५७ मध्ये त्याने आपल्या तुकड्या कोकणात रवाना केल्या व कल्याण आणि भिवंडी ही दोन्ही ठिकाणे जिंकून तेथे आपले अधिकारी नेमले. समुद्र व खाड्यांनी वेढलेल्या कोकणच्या प्रदेशावर आपला ताबा ठेवण्यासाठी शिवाजीने आपले आरमारी सामर्थ्यही उभारले. कुडाळच्या लखम सावंतास त्याने आदिलशाहीविरुध्द मदत करुन त्याच्या मोबदल्यात त्याने फोंडा किल्ला व त्याच्या सभोवतालचा प्रदेश हस्तगत केला. अरबी समुद्रात मोक्याच्या जागी असलेला जंजिरा किल्ला घेतला. मालवण जवळ सिंधुदुर्ग बांधला. इ.स.१६६० मध्ये शाहिस्तेखान मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करण्याच्या जिद्दीनेच महाराष्ट्रात आला होता. त्यावेळी शिवाजी पन्हाळ्यावर अडकल्याचा फायदा घेऊन शाहिस्तेखानाने व काही स्वकीयांनी शिवाजीच्या कोकणातील प्रदेशावर हल्ले केले. त्यामुळे एकीकडे शाहिस्तेखानाशी मुकाबला व दुसरीकडे कोकणातील प्रदेशांचा बंदोबस्त ही दोन्ही कामे त्याला उरकावयाची होती. त्यासाठी त्याने खानाशी बोलणे लावले, त्याच्याशी मुकाबला करण्याची शक्य तो तजवीज करुन शिवाजी स्वत: १६६१ मध्ये कोकणात उतरला. त्याला कोकणात जंजिरेकर सिद्दीचा समाचार घ्यावयाचा होता. आदिलशाही प्रदेशाचे लचके तोडावयाचे होते. सुर्वे, दळवी, सावंत इ. स्वकीयांना समजावयाचे होते व इंग्रजांना धडा शिकवावयाचा होता. त्यामुळे तो तातडीने कोकणात उतरुन त्याप्रमाणे त्याने १६६१ ते १६६३ च्या दोन वर्षात संधीसाधू स्वकीयांचा बंदोबस्त केला. राजापूरची वखार लुटून त्याने इंग्रजांना धडा शिकविला. बराचसा आदिलशाही प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणला. परंतु सिद्दीस मात्र वठणीवर आणण्यांस त्यांना फारसे यश आले नाही.

### २-ii) छत्रपती संभाजी (१६८० ते १६८९)

छ.संभाजी हा मराठ्यांच्या इतिहासातील वादग्रस्त पुरुष आहे. छ.संभाजी हा शिवाजीचा थोरला मुलगा. त्याचा जन्म १४-५-१६५७ रोजी पुरंदरवर झाला. सुव्यवस्थित राज्य कारभाराची आणि गडकोटांची व्यवस्था असलेल्या एक करोड होन उत्पन्नाच्या, पण शत्रुने वेढलेल्या अशा स्वराज्याचा वारसा संभाजी राजांकडे आला.

तत्कालीन परिस्थितीत थोरला मुलगा या नात्याने संभाजी हा स्वराज्याच्या गादीचा खरा वारस होता. तथापि न्याय्य पध्दतीने तो शिवाजीच्या मृत्यूनंतर लगेच सुखासुखी गादीवर आला असे झाले नाही. मात्र शिवाजी महाराजंच्या राज्यभिषेकाच्या वेळी (६-६-१६७४) छत्रपतींचा वारस म्हणून युवराज शंभूराजांना योग्य तो मानमरातब व सन्मान प्राप्त झाले. मराठ्यांच्या गादीचा वारस म्हणून युवराजांना ब्रिटीश साम्राज्याचा वकील हेन्री ऑक्सेंडननेही मौल्यवान नजराणे बहाल केले. तथापी येवढे असूनही शिवाजीनंतर संभाजीस छत्रपतींच्या गादीवर बसता आले नाही. याला कदाचित पूर्वी १६७८ मध्ये संभाजी मुघलांना जाऊन मिळाले होते व त्यामुळे शिवाजीच्या अष्टप्रधान मंडळाला त्यांच्याविषयी वाटणारा अविश्वास कारणीभूत असावा. तसेच सोयराबाईच्या संभाजीस अधिकार नसावा, राजारामास असावा ह्या वृत्तीतून अखेर हा वारसा हक्काचा प्रश्न उद्‌भवला असावा. शिवाजी महाराजांनीही हा प्रश्न स्वत: निर्यायक रितीने सोडविला नव्हता. उलट त्यांनी वारसा हक्काचा प्रश्न अष्टप्रधान मंडळावर सोपविला होता.[१६]

म्हणजे संभाजीस कायदेशीर छत्रपतीपद मिळण्यासारखे असतानाही ते त्याला त्वरीत मिळाले नाही याला तीन कारणे संभवतात. १) छ.शिवाजीचा स्पष्ट आदेश नसणे २) छ.संभाजीची वागणूक ३) सोयराबाईची महत्वाकांक्षा.

त्या महत्वाकांक्षेपोटीच एप्रिल १६८० च्या शेवटच्या आठवड्यात राजारामास गादीवर बसवून त्याचे नांवे कारभारास प्रारंभही झाला. परंतु जून १६८० पर्यत संभाजीने काहींना लालूच दाखवून तर काहींना क्रूर शिक्षा करुन आपला पक्ष निर्माण केला. याकामी त्यास सेनापती हंबीररावांची मिळालेली साथ फार महत्वाची होती. जुलै १६८१ पासून संभाजी सर्वाधिकार म्हणून कारभार पाहू लागले. जानेवारी १६८१ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला. काही पाठिंबा मिळवून रायगडावर थेट धडक मारुन मंत्रिमंडळास बाजूस सारुन स्वत:स स्थानापन्न करण्यात संभाजीने जी धडाडी दाखविली आणि जे शौर्य गाजविले ते कायदेशीर वारस असलेल्या राजपुत्राला शोभण्यासारखेच होते. येथपर्यत त्याने काहीही गैर केले असे म्हणता येणार नाही आणि त्या प्रसंगी त्याने कोणास काही शिक्षा केल्या असतील तर तेही मनुष्य स्वभावाला धरुनच झाले असे मानावे लागेल. काही असले तरी १६८१ च्या अखेरीपासून संभाजीने आपले शासन अगदी पक्के केले आणि पुढे सात-आठ वर्ष त्याने सर्व सत्ताधीश असा छत्रपती म्हणून राज्य केले.

**<u>संभाजी व शहाजादा अकबर –</u>**

प्रस्तुत मुद्यावर आतापर्यत सरेदसाई, वा.सी.बेंद्रे, डॉ.कमल गोखले, इ. नी बरेच लेखन केले आहे. अलिकडेच प्रकाशित झालेल्या छ.संभाजी स्मारक ग्रंथाचे संपादक डॉ.जयसिंगराव पवारांनीही या संबंधात आपले विचार व्यक्त केले आहेत. त्या सर्वांच्यात या अकबर प्रकरणात मतभिन्नता आढळते. रियासतकार लिहीतात, ''मनुष्य जोडण्याची कला व चातुर्य संभाजीकडे असते तर औरंगजेबावर मात करण्यास ही उत्कृष्ट संधी होती. असे असता शहजादयाला त्याच्याकडून पाठबळ मिळाले नाही.''[१७]

वा.सि.बेंद्रे यांच्या मताप्रमाणे, ''शहजादा अकबराचा मोगली परचक्रास शह देण्यात संभाजीने पुरेपूर उपयोग करुन घेतला.''[१८] डॉ.सौ.कमल गोखले लिहीतात, ''त्याच्याशी वागताना महाराष्ट्राच्या राजाने कुठे नमते घेतले

नाही की त्याच्यापुढे मान वाकविली नाही. त्याला कधीही अनावश्यक महत्व दिले नाही. मात्र शक्य असेल तेवढा तेवढा त्याचा उपयोग करुन घेतला.''[१९] वरील सर्व विद्वानांच्या मतांचा अर्थ संभाजीची या प्रकरणात भलावण करण्याचा दिसतो. मात्र एक गोष्ट नक्की की, या अकबर प्रकरणामुळे मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्वाची गोष्ट म्हणजे अकबराचा पाठलाग करण्यासाठी प्रथम औरंगजेबाचा दुसरा मुलगा आझमशहा आणि पाठोपाठ स्वत: औरंगजेब दक्षिणेत उतरले आणि पुन्हा एकदा जीवन मरणाचा मोगल-मराठा संघर्ष सुरु झाला. मोगल मराठा संघर्षातच अखेर संभाजीचा वध झाला. तथापी ते सर्व पाहण्या अगोदर संभाजीला मोगलांखेरीज इतर कोणाकोणाशी कसकसे सामने द्यावे लागले ते पाहणे उचित होईल.

**संभाजी व जंजिऱ्याचे सिद्दी –**

जंजिऱ्याचे सिद्दी हे शिवकालापासून मराठ्यांचे कट्टे वैरी होते. सभासद त्यांचे वर्णन करताना, ''घरात जैसा उंदीर, तैसा महाराजांकडे राज्यास सिद्दी''[२०] असे म्हणतो. औरंगजेबाच्या प्रोत्साहनामुळे सिद्दीने संभाजीविरुध्द कुरापती सुरु केल्या. त्याच सुमारास इंग्रजांचेही त्यास सहाय्य मिळाले. त्यामुळे तो मराठी मुलुखात लुटालूट करु लागला. तेव्हा संभाजीने उंदेरी बेट जिंकण्याचे ठरविले. मराठ्यांची २२ गलबते व ३००० नाविक दल सज्ज होते. पण ऑगस्ट १६८० चा हा प्रयत्न फसला. नंतर मराठ्यांनी १८-७-१६८१ ला सिद्दीवर हल्ला चढविला. सिद्दीने तोही हल्ला परतवून लावला. त्यानंतर काही काळ संभाजी-सिद्दी लढे चाललेच. सिद्दीला कधी इंग्रजांची तर कधी औरंगजेबची मदत होत असे. त्यातच मराठ्यांना एकाच वेळेस सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज आणि सर्वात मोठे मुघल असे अनेक शत्रु होते. त्या सर्वांसमोर टिकाव लागणे अशक्य झाले. काही असले तरी बेंद्रे म्हणतात त्याप्रमाणे सिद्दीच्या लढ्यात जरी अपयशाचे धनी व्हावे लागले तरी मराठ्यांची त्यामुळे आरमार क्षेत्रात व्याप्ती व प्रगती होऊ लागली. याच अनुभवाने तयार झालेले कान्होजी आंग्रे यांनी आपल्या चिकाटीने व मेहनतीने याही आरमारी युध्दकलते मराठ्यांच्या आरमारी युध्दकलेत आरमारास श्रेष्ठत्व प्राप्त करुन दिले.[२१] बेंद्रेंच्या या मतापेक्षा डॉ.गोखले यांचे संभाजी-सिद्दी प्रकरणावरचे मत अधिक ग्राह्य आणि वास्तव असे आहे. त्या लिहीतात, ''सिध्दीचा उपद्रव शिवाजी महाराजांपासून चालू होता. तसाच तो संभाजी राजांच्या नंतरही चालू होता. संभाजी राजांनी या निमित्ताने नाविक दलात वाढ केली. पण सिद्दी प्रकरणाचा निर्णय लावण्यात दोन्हीही पिता-पुत्रांना अखेरपर्यंत यश आले नाही,[२२] हे मात्र खरे.

**संभाजी व पोर्तुगीज –**

संभाजी सत्तेवर आल्यावर अल्पावधीतच मराठे-पोर्तुगीज संबंध बिघडू लागले होते. ३०-१-१६८१ रोजी तानाजी राम यास गोव्याचा व्हिसेराई लिहीतो, ''संभाजीराजे यांच्या अरेरावीमुळे प्रस्तुत शांतता आणि सलोखा टिकणे कठीण झाले आहे. मला त्यांची वागणूक असह्य झाली असून युध्द सुरु करावे की काय याचा मी विचार करीत आहे. कारण मिळमिळीत तहापेक्षा ढळढळीत युध्द बरे असे मला वाटू लागले आहे.''[२३]

एकीकडे अशी युध्दाची भाषा करणारे पोर्तुगीज संभाजीशी तहाच्या वाटाघाटी करण्याची भाषाही करतात हे

त्यांच्या १७-२-१६८३ च्या पत्रावरुन दिसते. या पत्रात गोज्याच्या व्हिसेराईने संभाजीचा कोकणातील सुभेदार अण्णाजी पंडित यास लिहीले, ''आपण संभाजीराजे यांचे विश्वासू सेवक आहात. आपण त्यांना आमच्याशी तहाच्या वाटाघाटी करण्यास प्रवृत्त कराल अशी आशा आहे.''[२४]

पण पोर्तुगीज वास्तवात संभाजी आणि औरंगजेब या दोघांनाही खुश ठेवण्याचे संधीसाधूपणे राजकारण करीत होते. तेव्हा पोर्तुगीजांच्या ह्या विश्वासघातकी कृत्याचा संभाजीस राग येऊन त्याने पोर्तुगीजांच्या डहाणू, असेरी, सैबण आणि तारापूर या ठिकाणांवर हल्ले केले. तारापूरचे ठाणे मराठ्यांनी आठ दिवस लढविले. पोर्तुगीजांनी या प्रकरणाचा बदला म्हणून येसाजी गंभीर याला नजरकैदेत ठेवले. पण त्याचबरोबर पोर्तुगीजांच्या चौल येथील कॅप्टनने संभाजीच्या वरच्या चौकीच्या ठाण्यावर तोफा डागून त्याचा काही भाग उध्वस्त केला.[२५]

**<u>फोंड्याचा संग्राम (नोव्हेंबर १६८३) –</u>**

मराठ्यांची उत्तर कोकणातील आगेकूच थांबवण्यासाठी गोव्याचा गव्हर्नर कोंदि-दि-आल्वोर याने मराठ्यांच्या फोंड्याच्या किल्याला १-११-१६८३ रोजी वेढा घातला. किल्लेदार येसाजी कंक आणि त्याचा मुलगा कृष्णाजी यांनी ८०० शिबंदीसह किल्ला मोठ्या नेटाने लढविला. त्याचवेळेस संभाजीचे तेथे आगमन झाले. त्यांच्या आगमनाने दोघांचा हुरुप वाढला. त्याच बरोबर मराठा सैनिकांना हुरुप चढला. दररोज होणाऱ्या हार्नीमुळे पोर्तुगीज गव्हर्नर हताश झाला. १०-११-१६८३ ला तो वेढा उठवून गोव्याला निघून गेला. ११-११-१६८३ ला तो राजधानीत परतला. तो थेट जेसुईटांच्या मठात जाऊन तब्बल चार दिवस राहिला. त्या काळात त्याने कुणाचीच भेट घेतली नाही.[२६]

**<u>संभाजीची गोव्यावरील स्वारी –</u>**

दि.२४-११-१६८३ रोजी संभाजीच्या सैन्याने जुवे बेट घेतले.[२७] शत्रुचे हाल झाले. पण संभाजीने गोवा बेटावर स्वारी केली नाही. गोवा शहर संभाजीच्या स्वारीपासून मुक्त झाले. परंतु व्हिसेराईने मराठ्यांची एवढी दहशत खाल्ली की, त्याने गोव्याची राजधानी मुरगांव बंदरात नेण्याचे ठरविले. दि.२५-१-१६८४ रोजी व्हिसेराईने गोव्याच्या बिकट अवस्थेचे वर्णन केले आहे व म्हटले आहे मोगल निघून गेले तरी संभाजीच्या स्वारीचा धोका पुन्हा आहेच. हे राज्य आमच्या हातून निसटून जाण्याची भिती आहे.[२८] वरील पत्रावरुन संभाजीची धास्ती पोर्तुगीजांनी घेतली हे स्पष्ट होते. तथापी संभाजीने गोवे शहर घेण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु पोर्तुगीजांच्या साष्टी आणि बार्देश प्रांतात आणि ठाणे जिल्ह्यातील पोर्तुगीज वसाहतीत मराठ्यांच्या फौजा होत्या. चौलचा वेढा चालूच होता. अशा परिस्थितीत औरंगजेब पुत्र शाहआलम मराठ्यांच्या प्रदेशात शिरला. परिणामी पोर्तुगीज आणि मराठे यांच्यात एक करार घडून आला. संभाजीच्या वतीने त्या करारात कवी कलशने भाग घेतला.[२९] संभाजीचा पोर्तुगीजांना एवढा वचक वाटत होता की, ते त्याला सार्वभौम राजा मानीत होते. शिवाजी महाराजांना ते शिवाजी राजे म्हणून संबोधित तर संभाजीच्या नावामागे 'छत्रपती' हे अभिधान लावीत.[३०] स.शं.देसाई म्हणतात, ''संभाजीने

पोर्तुगीजांना नरमाईचे धोरण स्वीकारावयास लावले ते तलवारीच्या बळावर. तो जर आणखी काही वर्षे जगता, तर पोर्तुगीजांना ठाणे जिल्ह्यातून आणि गोव्यातून हाकलून लावण्यात यशस्वी झाला असता. परंतु पोर्तुगीजांचे नशीब बलवत्तर होते हेच खरे.''[३१]

गोव्यापासून माघार घेत असता मराठ्यांनी पोर्तुगीजांच्या साष्टी आणि बारदेश या प्रांतावर हल्ले चढविले व तेथील खेड्यांची व ठाण्यांची लूटमार केली.[३२] गोव्यावरील या स्वारीत मराठ्यांनी पोर्तुगीजांची अनेक चर्चेस जाळून टाकली व अनेक स्त्री-पुरुषांना कैद केले.

**मराठा-पोर्तुगीज कराराच्या वाटाघाटी -**

संभाजी महाराजांनी माघार घेतल्यावर मराठा पोर्तुगीज यांच्या दरम्यान वाटाघाटी सुरु झाल्या. उभयपक्षांत शहाजादा अकबर मध्यस्ती करत होता. मराठ्यांच्या बाजूने कवीकलश वाटाघाटी चालवित होता. जानेवारी, फेब्रुवारी १६८४ मध्ये फोंडा किल्ल्यावर या वाटाघाटी होऊन खालील कलमांचा करार करण्यात आला.[३३]

१) संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांकडून जे प्रदेश व किल्ले जिंकून घेतले असतील ते त्यातील युध्द सामानासह पोर्तुगीजांना परत करावेत.

२) एकमेकांची पकडलेली जहाजे एकमेकांनी परत करावीत.

३) एकमेकांचे पकडलेले कैदी परत करावेत.

४) वसई प्रांतातील व दमणच्या प्रदेशातील चौथाई संभाजी महाराजांकडे देत जावी. त्या मोबदल्यात मराठ्यांनी या प्रदेशाच्या संरक्षणाची जबाबदारी स्विकारावी.

५) एकमेकांच्या प्रदेशात एकमेकांना पूर्वीप्रमाणे व्यापार करता यावा.

६) पोर्तुगीज तोफखान्याच्या संरक्षणाखाली मोगली जहाजांनी अन्नधान्याची वहातूक करण्याची परवानगी दिली जावू नये. जेथे पोर्तुगीज तोफखाना नसेल तेथे हे कलम लागू होणार नाही.

७) पोर्तुगीजांच्या आश्रयाखाली दक्षिण कोकणातील बंडखोर देसायांना त्यांचा गुन्हा माफ करण्यात यावा.

८) मराटा पोर्तुगीज सीमेवर मराठ्यांनी किल्ले बांधू नयेत.

यानंतर उभय राज्यांत सुरळीत पत्रव्यवहार सुरु झाला. आपण तहाच्या कलमांचा आदर करु तसा संभाजीनेही करावा असे पोर्तुगीज व्हाईसरायने लिहीले. वर उल्लेखिलेला करार पक्का करण्यासाठी व्हाईसरायने मार्च १६८४ मध्ये एक शिष्ट मंडळ संभाजी महाराजांकडे रायगडावर पाठविले. तेथे पोर्तुगीजांनी अंजदीव बेटाचा कब्जा सोडावा व संभाजी राजांना नजराणा द्यावा अशा आणखी दोन कलमांचा आग्रह मराठ्यांनी धरला. मराठ्यांचे म्हणणे की, पोर्तुगीज वकीलांनी वाटाघाटीच्या ओघात आपणांस तशा प्रकारचे वचन दिले होते. तर पोर्तुगीजांचे म्हणणे त्याच्या उलट होते.[३४] अशा परिस्थितीत करार न होता तो फिसकटला. शिष्टमंडळ गेल्यानंतर संभाजी राजांनी रंगाजी लक्ष्मीधर व सिदोजी फरझंद असे दोन वकील गोव्यास पाठविले. परंतु तेथेही वाटाघाटींचा घोळ संपला नाही. व्हाईसराय

ह्या नव्या अटी मानण्यास तयार झाला नाही. शेवटी हा करार पक्का न होता उभयपक्षी पुन्हा संबंध बिघडू लागले.

दक्षिण कोकणात फारशी कामगिरी न करता मोगल शहाजादा शहा आलम परतला होता. दक्षिण कोकणात असता त्याची पोर्तुगीजांशीही वितुष्ट आले होते. आपण आल्यामुळे मराठ्यांनी गोव्यासमोरुन माघार घेतली आणि अशाप्रकारे आपण पोर्तुगीजांचे रक्षण केले म्हणून आपणांस पोर्तुगीजांनी खंडणी दिली पाहिजे असे त्याचे म्हणणे होते. परंतु पोर्तुगीजांनी त्याला दाद दिली नाही. शहाजादा निघून गेल्यावर मराठ्यांनी जिंकून घेतलेला प्रदेश पुन्हा जिंकून घेण्याचा पोर्तुगीजांनी प्रयत्न केला. परंतु मराठा सैनिकांनी त्यांना चांगलाच प्रतिकार केला. त्यांचे ४००-५०० सैनिक मराठ्यांनी कापून काढले. अशाप्रकारे पोर्तुगीजांना अपयश आले. यावेळी मराठ्यांचे हल्ले परतवून पोर्तुगीज प्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी पोर्तुगीज व्हाईसरायने आपल्या मायदेशाहून कुमक मागविली होती.

**<u>कोकणातील देसायांना पोर्तुगीजांची चिथावणी –</u>**

गोव्याच्या आसपासचे दक्षिण कोकणातील देसाई हे मोठे उपदव्यापी मंडळी होती. कुडाळचा खेमसावंत हा त्यांचा पुढारी होता. याशिवाय साखळी, डिचोली, पेडणे आणि फोंडे या परगण्यातील देसाई ही त्याच्या सोबत होते. या देसायांनी फेब्रुवारी १६८५ मध्ये मराठी सत्तेविरुध्द बंड पुकारुन पोर्तुगीजांचा आश्रय घेतला. सुरक्षिततेसाठी त्यांनी आपली बायका-पोरे गोव्यात पाठविली. कारवारच्या देसायांनीही अशीच बंडखोरी करुन मराठ्यांचा कारवारचा किल्ला जिंकून घेतला. त्यांच्या कुटुंबानाही पोर्तुगीजांनी आपल्या प्रदेशात आश्रय दिला. अशाप्रकारे दक्षिण कोकणातील देसायांच्या बंडखोरीमागे पोर्तुगीजांचा हात होता. २४ जानेवारी १६८६ रोजी आपल्या राजास लिहीलेल्या पत्रात गोव्याचा व्हाईसराय लिहीतो, आमच्याशी केलेला तह संभाजीने कृतीत न आणण्याचे ठरविल्यामुळे आम्हाला त्याच्याशी युध्द चालू ठेवणे प्राप्त झाले. त्यासाठी कोकणातील बऱ्याचशा देसायांशी आपण संगनमत करुन त्यांना संभाजीविरुध्द बंड करण्यास प्रवृत्त केले. आपली व या देसायांची कित्येक महिने बोलणी चालू राहून शेवटी ८ फेब्रुवारी १६८५ रोजी आपण या देसायांशी गुप्त करार केला. त्यानुसार १२ फेब्रुवारी १६८५ या दिवशी त्यांनी उठाव केला व एकाच दिवशी निरनिराळ्या भागात छापा घालून पुष्कळ लूट मिळविली.[३५]

**<u>पोर्तुगीज-खेमसावंत करार –</u>**

वर उल्लेख केलेल्या करारात पुढील महत्वाची कलमे होती.

१. बांद्यापासून अंकोल्यापर्यंतचा जो प्रदेश हस्तगत होईल त्यातील दोन हिश्शे पोर्तुगीजांना व एक हिस्सा सावंतास मिळावा.

२. कुडाळपासून चौल पर्यंतचा प्रदेश जो कोणी घेईल त्यास पोर्तुगीजांनी आरमारासह मदत करावी. याबद्दल त्यांस हस्तगत झालेल्या सदर प्रदेशाचा एक हिस्सा द्यावा. राहिलेले दोन हिस्से तो प्रदेश घेणाऱ्यास मिळावेत.

३. पोर्तुगीजांनी सावंतांच्या मदतीस शत्रूशी झगडण्यासाठी योग्य असे आरमार द्यावे. शिवाय या आरमारास माणसे, शस्त्रे व दारुगोळा पोर्तुगीजांनी स्वखर्चाने पुरवून ज्या प्रदेशामध्ये सावंत खुष्कीच्या मार्गाने जाईल त्या प्रदेशाच्या

किनाऱ्यावर हे आरमार फिरते ठेवावे. आरमाराच्या मदतीशिवाय पोर्तुगीजांनी सावंतास या युध्दाकरिता शक्य तितका दारुगोळा फुकट पुरवावा. पोर्तुगीजांनी संभाजीशी सलोखा करु नये. तसेच सावंतांनी संभाजीच्या राज्यात असणाऱ्या इंग्रज, फ्रेंच अथवा डच यांच्या वखारीस कोणतीच इजा करु नये.[३६]

वरील करारावरुन हे स्पष्ट होते की, हा करार स्पष्टपणे संभाजी महाराजांविरुध्द होता व तो मराठी मुलूख काबीज करण्यासंबंधी होता. सावंतांनी भूदलाच्या मदतीने मराठी प्रदेश काबीज करावा व त्यास लागेल ती आरमाराची व दारुगोळ्याची व पैशाची मदत पोर्तुगीजांनी द्यावी आणि सावंतांनी जिंकलेल्या मुलखाची वाटणी करावी असे हे एकूण कराराचे स्वरुप दिसते. या करारावर भाष्य करताना डॉ.पिसुर्लेकर म्हणतात की, हा करार जरी गोवेकर पोर्तुगीज व कुडाळकर खेमसावंत यामध्ये झाला असला तरीही सावंत हा कोकणातील इतर देसायांचा पुढारी म्हणून त्याच्याशी व्हाईसरायने सदर करार केला असावा. दक्षिण कोकणातील सर्व देसायांमध्ये खेमसावंत याच्याजवळ अधिक सैन्य होते. केशव प्रभू याच्या माहितीप्रमाणे सावंताच्या पदरी १६८४ मध्ये २००० सैनिक होते.[३७]

**<u>पोर्तुगीज प्रदेश काबीज करतात –</u>**

दक्षिण कोकणातील बंडखोर देसाई व पोर्तुगीज यांची युती झाल्यामुळे त्यांनी मराठी मुलुखावर वारंवार हल्ले करुन मराठ्यांची मोठी हानी केली. तसेच त्यांनी गोव्याच्याआसपासचा सर्व मुलूखही जिंकून घेतला. जानेवारी १६८६ च्या एका पत्रात गोव्याचा व्हाईसराय लिहीतो की, गोवा प्रांतात आता फोंड्याशिवाय दुसऱ्या ठिकाणी आता संभाजीचा अंमल राहिलेला नाही. एवढेच नव्हे तर १६८३ च्या युध्दात मराठ्यांनी उत्तर कोकणात जो पोर्तुगीजांचा प्रदेश जिंकून घेतला होता तोही आता पोर्तुगीजांनी पुन्हा काबीज केला. मराठ्यांनी पोर्तुगीजांची अशेरी किल्ला जिंकून घेतला होता तो पोर्तुगीजांनी ऑक्टोबर १६८७ मध्ये पुन्हा हस्तगत केला.

इ.स.१६८६ सालपासून स्वराज्यात घुसणाऱ्या मोगली फौजांचा जोर दिवसेंदिवस वाढत गेला. मराठी फौजांना अनेक आघाड्यांवर लढावे लागत होते. त्यामुळे पोर्तुगीज-देसाई यांच्या युतीकडे लक्ष देण्यास व त्यांचा समाचार घेण्यास मराठ्यांकडे मनुष्यबळ आणि साधने अपुरी पडत असणार.

ऑगस्ट १६८८ मध्ये पोर्तुगीजांच्या आश्रयाने रहाणाऱ्या खेमसावंत, रामदळवी, दुलबा नाईक इ. मंडळींनी पोर्तुगीजांच्या परवानगीने मुघलांची चाकरी स्विकारली.[३८] पोर्तुगीज व मुघल यांचा संभाजी हा समान शत्रू असल्याने त्यांच्यात मैत्री निर्माण होणे स्वाभावीक होते. शिवाय सर्वत्र विजयी होणाऱ्या मुघली फौजांशी हातमिळविणी करणे हे पोर्तुगीजांच्या फायद्याचे ठरणार होते. आपली बायका-पोरे गोव्यातच ठेवून ही देसाई मंडळी बेळगावचा मोगल सुभेदार बहादूरखान याला भेटली. बहादूरखानाने त्यांचा सन्मान करुन त्यांना मोगली चाकरीत घेतले. इ.स.१६८९ च्या जानेवारीत मुघली चाकरी स्विकारण्याच्या मोबदल्यात खेमसावंतास कुडाळ प्रांताच्या सरदेशमुखीचे बादशाही फर्मान प्राप्त झाले. हे फर्मान बहादूरखानाने सावंताच्या हाती दिले. याच सुमारास दुलबा नाईक व इतर देसायांनी फोंड्यावर हल्ला करुन तो किल्ला जिंकला आणि तो मुघलांच्या ताब्यात दिला. (जानेवारी १६८९). फोंड्याचा किल्ला जिंकल्यामुळे

मराठ्यांचा गोव्याच्या आसपासचा अंमल पूर्ण नाहिसा झाला. अशाप्रकारे कोकणातील देसाई मराठ्यांच्या स्वराज्याचा द्रोह करुन दक्षिण कोकणात मराठी मुलुखातील ठाणी व किल्ले मोगलांसाठी जिंकून देत होते. दरम्यान फेब्रुवारी १६८९ मध्ये संभाजी राजे पकडले गेले व त्यांची कारकीर्द संपली.

**संभाजी-औरंगजेब युध्द -**

छ.संभाजी महाराजांना त्यांच्या ८/९ वर्षाच्या कारकीर्दीत अतीशय महत्वाचा लढा द्यावा लागला तो म्हणजे औरंगजेबाशी. छ.संभाजी आणि मुघल हा अतिशय असमान असा लढा होता. पण औरंगजेबाचे हे आव्हान संभाजीने स्विकारले.

११-११-१६८१ रोजी बादशहा औरंगाबादेस पोहोचला. त्यापूर्वीच त्याच्या मुघली फौजांनी मराठी राज्यावर अनेक बाजूंनी चढाई आरंभीली होती. २२-३-१६८२ रोजी औरंगजेबाने औरंगाबादेत आपली छावणी केली. त्याच्या आज्ञेवरुन शहाबुद्दीन (निजाम उल् मुल्क) चा बाप यान रामसेजच्या किल्ल्याला वेढा घातला. पण मराठ्यांच्या कडव्या प्रतिकारामुळे त्याला लवकरच तो काढावा लागला.

इ.स.१६८३ मध्ये मराठ्यांवर चौफेर हल्ले करण्याची एक योजना बादशहाने आखली. १०-८-१६८३ रोजी त्याने आझमला विजापूरकरांकडून मराठ्यांना होणारी मदत बंद पाडण्यासाठी तिकडे रवाना केले. तर कोकण जिंकण्याच्या मोहीमेवर राजपुत्र मुअज्जम आणि शहाबुद्दीन यांना पाठविले. यावेळी संभाजी गोव्यावरील स्वारीच्या कामगिरीवर होता. ती मोहीम त्याने रद्द केली व तो मुअज्जमच्या फौजेवर छुप्यारितीने हल्ले करु लागला. अल्पावधीतच त्याने त्याला बेजार केले. मराठ्यांनी यावेळेस शाही फौजेचे कसे हाल केले होते ते सांगताना खाफीखान लिहीतो, ''महर्गता इतकी वाढली की, कधीकधी ३-३, ४-४ रुपये देऊनही एक शेर गव्हाचे पीठ मिळेनासे झाले. फौजेतील माणसांपैकी जे मृत्यूच्या दाढेतून वाचले त्यांच्या शरीरातील अर्धे प्राण शिल्लक राहिल्यासारखे होते. प्रत्येक श्वासागणिक त्यांना वाटे की, तेवढेच आयुष्य लाभले हीच खैर. एकाही सरदाराच्या तबेल्यात एकही स्वारीयोग्य घोडा राहिला नाही. मग बिचाऱ्या सामान्य स्वाराची काय कथा!''[३९]

मुअजम्मने २/३ महिन्यांच्या कोकणातील मुक्कामात मालवण, वेंगुर्ले, कुडाळ ही गावे उध्वस्त करण्या व्यतिरिक्त काही कामगिरी केली नाही. धान्य टंचाईमुळे त्रस्त होऊन त्याने पावसाळ्यापूर्वी कोकण सोडण्याचे ठरविले. रामसेजच्या घाटातून परतणाऱ्या त्याच्या फौजेच्या हलाखीचे वर्णन मनुचीने असे केले आहे, ''मुघल सैन्यात रोगाची इतकी साथ पसरली की, सात दिवसात या रोगाने पछाडलेला प्रत्येक मनुष्य गेला. अशारितीने सैन्यातील १/३ माणसे मृत्युमुखी पडली. हा रोग माणसांनाच झाला असे नाही तर हत्ती, घोडे, उंट इ. जनावरेही त्याला बळी पडली. त्यामुळे सगळी हवा दूषित झाली. रस्ता अरुंद आणि अडचणीचा असल्यामुळे रसदही नीट येईनाशी झाली. उन्हामुळे आणि तहानेमुळे अनेक लोक मृत्युमुखी पडले.''[४०]

कोकणात जाणाऱ्या शहाबुद्दीनालाही कोकणातून असेच हात हलवीत माघारी यावे लागले. खानदेश, वऱ्हाड ते

कर्नाटकपर्यंत मराठी सैन्याच्या अनेक लहान सहान टोळ्यांशी मुघल फौजांच्या लहान मोठ्या चकमकी उडतच होत्या.

**विजापूर राज्याचा शेवट (१२-९-१६८६) -**

औरंगजेब दक्षिणेत आल्यापासून विजापूरच्या मुलखात त्याची फौज उद्योग करीतच होती. कारण ती राज्ये (विजापूर-गोवळकोंडा) शिया पंथीय होती. १६-२-८३ मध्ये सम्राटाने राजपुत्र आज्ञमला विजापूरवर आक्रमण करण्यासाठी पाठविले. मुघल इ.स. १६८४ मध्ये त्याने विजापूर राज्यातील मंगळवेढे व सांगोळे ही स्थळे काबीज केली. १६८५ मध्ये बादशहा विजापूरास पोहोचला. विजापूरच्या मदतीला संभाजीने कबजीस पाठविले. गोवळकोंड्याची फौजही विजापूरच्या मदतीस आली. परंतु औरंगजेबाच्या सामर्थ्यापुढे सर्व प्रयत्न निष्फळ होवून अखेर १२-९-१६८६ रोजी शिकंदर शहा शरण गेला आणि विजापूरचे राज्य संपले.[४१]

**गोवळकोंड्याची अखेर (१२-९-१६८७) -**

गोवळकोंड्याचा शासक अब्दुल हसन हा विजापूरकरास मदत करीत असे. ती बंद पाडण्यासाठी औरंगजेबाने विजापूरची मोहीम सुरु असतानाच गोवळकोंड्यावरील मोहीम सुरु केली होती. औरंगजेबाने गोवळकोंड्याच्या किल्ल्यास वेढा दिला. त्यात प्रवेश मिळविण्यासाठी त्याने फितुरांचा उपयोग करुन घेतला. २१-९-१६८७ रोजी किल्ल्याचे दरवाजे उघडून मुघलास आत घेतले. पुत्र आजमशहास आत पाठवून औरंगजेबाने अब्दुल हसन कुतुबशहास पकडून आणविले आणि दौलताबादच्या किल्ल्यात नेऊन अटकेत ठेवले. गोवळकोंड्यातून सुमारे १० कोटींची संपत्ती बादशहास मिळाली.

अशाप्रकारे दक्षिणेतील ह्या दोन शिया पंथीय शाह्या औरंगजेगबाने नष्ट केल्या व त्याची नजर पुन्हा संभाजीकडे मराठ्यांकडे वळली.

**संभाजीची अखेरची झुंज -**

मराठ्यांना मदत करणाऱ्या दक्षिणेतील दोन्ही मुस्लिम राज्यांना जिंकल्यानंतर आपण संभाजीला सहज जिंकू या विचाराने औरंगजेबाने आपले सर्व लक्ष आता महाराष्ट्राकडे वळविले. जिंकलेल्या दोन्ही राज्यातील अनेक सरदार व फौजाही आता त्याच्या दिमतीला होत्या. वा.सी.बेंद्रे लिहीतात, ''इ.स.१६८८ मध्ये स्वराज्याची स्थिती पुढीलप्रमाणे होती. कोकणात मोंगलांचा शिरकाव होऊ शकला नव्हता. घाटावरील मैदानी भागात मोंगलानी बऱ्याच भागात आपली ठाणी बसविली होती. चाकण, शिरवळ, वाई, सुभे, बारामती, इंदापूर, कोल्हापूर या आणि इतर ठिकाणी मोगल सुभेदार नेनले गेले होते. मराठ्यांशी त्यांच्या चकमकी चालू होत्या. उत्तर कर्नाटकात मराठे आणि विजापूरचे काही जुने सरदार एकत्र होऊन मोगलांशी लढत होते. मराठ्यांचे मोठे बळ म्हणजे किल्ले. पन्हाळगड, विशाळगड, पुरंदर, सिंहगड, तोरणा, प्रतापगड व रायगड इ. किल्ले शाबूत होते. ते लढविण्याची संभाजी राजांनी जय्यत तयारी केली होती.'' परंतु खरे पाहता या काळातील संभाजीच्या हालचालींची फारशी माहिती मिळत नाही. ऑक्टोबर १६८७ मध्ये संभाजीचा शूर सेनापती हंबीरराव मोहीते हा सर्जाखानाशी वाईनजिक झालेल्या लढाईत तोफेचा गोळा

लागून ठार झाला. त्याचवेळी शिर्क्यांनी बंड केले व ते मोगलांना मिळाले. हे वृत्त कळताच संभाजी खेळण्याला गेला. बंडाचे पारिपत्य केल्यावर संभाजी कवी कलशासह रायगडला जाण्यास निघाला. रस्त्यात संगमेश्वर येथे त्याचा मुक्काम होता. तेथेच मुकर्ईत खानाने संभाजीस व कलशास पकडले.

**संभाजीचा मृत्यू (११-३-१६८९) -**

संभाजी व कवी कलश यांना मोगल छावणीनजीक आणल्यावर कसे वागविले गेले त्याचे वर्णन खाफीखानने केले आहे. ''इराणच्या पध्दतीप्रमाणे त्यांना डोक्यावर लाकडी फळ्यांच्या लांब टोप्या घालण्यात आल्या. त्याच्या अंगावर विदुषकी टोप्या घालण्यात आल्या. त्यांचा सारखा छळ करण्यात येत होता. सारखे नगारे वाजत होते. संभाजी आणि कवी कलशांच्या शरीरात पेंढा भरण्यात आला. दख्खनमधील प्रसिध्द अशा सर्व शहरातून आणि गावातून ती प्रेते नगारे, कर्णे, शिंगे इ. वाद्यांच्या गजरात मिरविण्यात आली.''[४२]

याशिवाय म.रा.चिटणीस बखर आणि इश्वरदास नागर यांनी छ.संभाजीच्या मृत्यूचे वर्णन केले आहे. चिटणीस बखरीत म्हटले आहे, ''औरंगजेबाने संभाजीला सांगितले, तू धर्मचर वर्तन कर. यावर संभाजीने मुलगी देत असाल तर विचार करु असे उत्तर दिले.''[४३]

डॉ.कमल गोखले व वा.सि.बेंद्रे यांना हे मान्य नाही. इश्वरदास नागर म्हणतो, ''संभाजी हा गर्विष्ठ होता. त्याने बादशहा संबंधी घाणेरडे शब्द उच्चारले. त्याची निंदानालस्ती केली. तेव्हा बादशहाच्या आज्ञेने डोळे काढले. तो वाकला नाही. पुढे वधस्थानाकडे नेले. तेथे त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करण्यात आले.''[४४]

डॉ.गोखले लिहीतात, ''मराठ्यांच्या रुपाने उभे राहणारे हिंदवी स्वराज्य नष्ट करण्यासाठी औरंगजेबाने या ३२ वर्षाच्या राजाला हालहाल करुन ठार मारले. नियतीने औरंगजेबाच्या हाताने मराठ्यांच्या राजाला नाहीसे केले. पण त्याच औरंगजेबाला हिंदवी स्वराज्याची नाश करण्याची महत्वाकांक्षा मात्र सफल करु दिली नाही.''

**संभाजीच्या कार्याचे मूल्यमापन -**

जुन्या बखरकारांनी संभाजीच्या अवगुणासंबंधी केलेल्या अतिरेकी वर्णनामुळे संभाजीबद्दल अनेक गैरसमज रुढ झाले होते. तो रंगेल होता. मदिरा व मदिराक्षीचे त्याला व्यसन होते. त्याला दूरदृष्टी नव्हती. वगैरे. पण बेंद्रे आणि गोखले यांनी अनेक पुरावे गोळा करुन पूर्वीच्या आरोपांचे खंडन केले आहे.

संभाजी सत्तेवर आला त्यावेळेस त्याचे वय जेमतेम २३ वर्षाचे होते. तरीही त्याने पोर्तुगीजांची फजीती केली. औरंगजेबाचा प्रतिकार केला. मर्यादित साधनांसह त्याने नऊ वर्षे जी अखंड झुंज दिली ती नि:संशय उत्कृष्ट होती. श्री.बेंद्रे लिहीतात, ''एकट्या संभाजीने हिंदीव स्वराज्यासाठी दीर्घकाळ दिलेल्या लढ्याचा विचार केल्यास महाराष्ट्राची अखिल हिंदुस्थानात व परदेशात गाजलेली खरी कर्तबगारी, उज्वल संस्कृती व तेजस्वी राष्ट्रीय संघटना यांच्या खऱ्या कसोटीचा आदर्श संभाजी महाराजांच्याच कारकिर्दीत दिसून येतो.''

सेतू माधवराव पगडी म्हणतात, ''आपले प्राण पणाला लावून त्याने नऊ वर्षेपर्यंत स्वराज्य सुरक्षित ठेवले

आणि औरंगजेबाची आक्रमणे हाणून पाडली, हे संभाजीचे खरे व्यक्तीमत्व होय.''

डॉ.गोखले लिहीतात, ''संभाजी राजांसारखा राजा नाहीसा केला म्हणजे मराठी राज्य चटकन गिळंकृत करता येईल ही बादशाहाची कल्पना फोल ठरली. ते शत्रुला शरण गेले नाहीत. त्यांचा देह औरंगजेबाच्या पाशवी वृत्तीला बळी पडला. पण त्याच बलीदानातून आणि हौतात्म्यातून मराठी राज्य चालले हे भारतीयांना केव्हाही विसरता येणार नाही.'' संभाजीच्या वधावर भाष्य करताना डॉ.जयसिंगराव पवार म्हणतात, ''हुतात्म्याचे कार्य मरणाने सुरु होते. कारण आपल्या बलीदानाने तो आपल्या लाखो देशबांधवांना स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी चेतना देत असतो. संभाजी महाराजांचे कार्य ज्यांच्या मृत्यूने संपले नाही. तसे ते संपेल या आशेने औरंगजेबाने त्यांना ठार केले. पण त्याच्याआशेची निराशा झाली. महाराष्ट्रात संभाजी महाराजांचे कार्य दुप्पट चौपट वेगाने वाढले.'' डॉ.अ.रा.कुलकर्णी म्हणतात, ''संभाजी राजाला इतिहासाच्या दरबारात काही स्थान देत असता निखल व शास्त्रशुध्द पुराव्याने जे सिध्द होईल त्याचाच विचार करावा लागेल. संभाजी राजांच्या ९ वर्षाच्या काळात औरंगेबाने दक्षिणेतील आदिलशाही व कुतुबशाही ही मुसलमानी राज्ये स.१६८६-८७ मध्ये गिळंकृत केली. पण मराठ्यांपुढे मात्र त्याला पगडी उतरवावी लागली. संभाजी राजाने धिरोदत्तपणे मृत्यूला कवटाळल्यामुळे मराठ्यांना प्राणपणान लढण्याची प्रेरणा मिळाली आणि औरंगजेबाचे स्वप्न तर केव्हाच साकार झाले नाही. पण मराठी सत्ता मात्र 'वर्धिष्णु विश्ववंदिता' बनली. 'मरणाने अमर' झालेल्या संभाजी राजांच्या या लढ्यातील वाटा हीच त्याची थोर देशसेवा आणि तोच त्याचा इतिहासाच्या दरबारातील स्थान ठरविण्याचा निकष.''

वरील विद्वानांपेक्षा रिसायतकारांचे मत भिन्न आहे. ते लिहीतात, ''सर्व हिंदुस्थान व विशेषत: राजपुत गांधील माशीच्या पोळ्याप्रमाणे बादशहाचा चावा घेण्यास टपले होते. परंतू त्यांचा पुरस्कार करण्यास संभाजीची इच्छा झाली नाही हाच त्याच्या बुध्दीचा कोतेपणा होय. संभाजी स्वत: शूर होता. परंतु रणांगणावरचे डावपेच त्यास कळत होतेसे दिसत नाही. संभाजीची एवढी मोठी हिंमत सात-आठ वर्षात काहीच दुष्य करामत न करिता अखेर शत्रुच्या निर्घुण शस्त्रास अमानुषतेने बळी पडली.''

सर्वसाधारपणे सरदेसाई सारखे मत प्रा.आठवले यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणतात, ''संभाजी शूर होता, स्वाभिमानी होता हे खरे, पण एवढ्यावर शिवाजीने मारला तेवढा पल्ला मारता येत नाही हेही तेवढेच खरे. इ.स. १६८० मध्ये शिवाजी वारला तेव्हा सगळे आबादी आबाद होते असे नाही. पण शून्यापासून सुरुवात करुन शिवाजीने एका व्यवस्थित मुलकी राज्यव्यवस्थेवर असे एक स्वराज्य निर्माण केले होते. ते संभाजीच्या हाती आले होते. या तयार तख्तावर संभाजी बसला होता. स्वराज्याचे कार्य पुढे नेणे संभाजीचे काम होते. तेवढी कुवत आणि तळमळ संभाजीत नव्हती. १६८० मध्ये स्वराज्य दिमाखात उभे होते. इ.स. १६८९ मध्ये अवघे स्वराज्य मुघलांनी व्यापले होते. बादशहाने मराठ्यांच्या घरात घुसून मराठ्यांच्या छत्रपतीचा खून केला. हे असे चित्र स्वच्छ दिसत असताना संभाजीची कारकिर्द अपेशी नाही तर काय म्हणायची?''

संभाजीची कारकीर्द अपयशी मानणारे आठवले म्हणतात संभाजीने जगून जे कदाचित कधीच मिळविले नसते ते मरुन मिळविले.'' तसेच ते असेही मान्य करतात की, संभाजीचा वध झाला. शिवाजीने स्थापलेल्या स्वराज्याचा पहिला वारस गेला म्हणजे स्वराज्य संपले असे होत नव्हते. शिवाजीने जे जे सांगितले होते आणि जे जे दिले होते त्याची स्मृती ताजी होती. संभाजीच्या कारकिर्दीत मोंगलांसारखे शत्रु घरात घुसून मुक्काम ठोकून बसले होते हे खरे. पण त्यांच्या राजवटीतही स्वराज्याच्या शासनाची घडी बरीचशी कायम ठेवली गेली होती. स्वत: संभाजी आणि त्याचे अधिकारी हे वसुली, न्यायदान वगैरे राजाने करावयची कामे तशा धामधुमीतही करीत राहिले होते. त्यामुळे रयतेला मराठ्यांचे राज्य संपले असे वाटण्याचे कारण नव्हते. मराठ्यांचे स्वराज्य आहे एवढेच नव्हे तर मराठ्यांच्या भूमित शिवाजीने दिलेली स्वराज्य स्वधर्मासारखी ध्येये ही धगधगत आहेत हे संभाजीच्या मरणाने गर्जुन सांगितले गेले होते. तेव्हा सरदार अधिकारी आणि सर्वसामान्य जनही परकियांच्या आणि परधर्मियांच्या सत्तेपुढे सहजासहजी शरणागती पत्करणे शक्य नव्हते.'' संभाजीच्या कारकिर्दीचा आतापर्यंत अगदी धावता आढावा घेऊन त्याच्या कारकिर्दीविषयी विद्वानांची मते पाहिली असता एक गोष्ट निश्चित स्पष्ट होते की, <u>प्रत्यक्ष साम्राज्य विस्तार असा संभाजीच्या कारकिर्दीत झाला नाही. त्याच्यावर आलेली संकटे त्याला तसे प्रयत्न करु देऊ शकली नाहीत. पण आलेल्या अनेक संकटांना त्याने ज्या धैर्याने तोंड दिले त्यामुळेच मराठी राज्य टिकून राहिले व ते तसे टिकून राहिले म्हणूनच पुढे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राजारामास स्वराज्याकडून साम्राज्याकडे जाण्याचे प्रयत्न करता आले. तेव्हा संभाजीने अनेक जीवन मरणाच्या प्रसंगात स्वराज्य टिकवून ठेवले व अंतीमत: त्याच्यासाठी व धर्मासाठी स्वत:च्या प्राणाचे बलीदान केले हीच त्याची भावी मराठी साम्राज्याचा विस्तारासाठीची कामगिरी असे म्हटल्यास वावगे ठरु नये.</u>

**<u>छत्रपती राजाराम –</u>**

छ.संभाजीच्या मृत्यूनंतर स्वाभाविकच राजाराम छत्रपती पदावर आला. त्यावेळी त्याचे वय १९ वर्षांचे होते. त्याचा जन्म २४-२-१६७० रोजी झाला. १६८९ ते १७०० हा राजारामाचा कालखंड विलक्षण धामधुमीचा होता. तरीही छत्रपती या नात्याने मराठ्यांच्या राज्य विस्ताराचे धोरण त्याच्या डोक्यात होते हे स्पष्टपणे दाखविणारे त्याच्याच हातचे पत्र उपलब्ध आहे. त्या पत्रात तो म्हणतो, ''महाराष्ट्र धर्म पूर्ण रक्षावा हा तुमचा संकल्प स्वामींनी जाणून उभयातंस जातीस व फौजखर्चास सहा लक्ष होनांची नेमणूक चालविण्याचा निश्चय करुन दिधला असे. पैकी रायगड प्रांत व विजापूर, भागानगर व औरंगाबाद काबीज केल्यावर दर कामगिरीत पाऊण लाखाप्रमाणे एकंदर तीन लाख आणि बाकीचे तीन लाख प्रत्यक्ष दिल्ली घेतल्यावर द्यावयाचे असा निश्चय केला असे. एक निष्ठपणे सेवा करावी. स्वामी तुमचे बहुतेक प्रकारे चालवितील.''[४५] प्रा.ग.ह.खरे यांनी ही एका लेखात राजारामाच्या बनारस वगैरे मंदीरांच्या सुटकेविषयी लिहीले आहे. तसेच त्याच्या दोन सैनिकांनी नर्मदा पार केल्याचे म्हटले आहे.[४६] एक गोष्ट निश्चित की, मराठे नर्मदा पार झाले ते राजाराम महाराजांच्या काळातच! कारण १६९९ मध्येच कृष्णा सावंत यास राजारामाने १५००० घोडदळासह उत्तरेकडे स्वारीस पाठविले होते. कृष्णा सावंताने नर्मदा पार करुन धामुनीच्या प्रदेशात स्वारी

केली. मराठ्यांच्या इतिहासातील नर्मदा पार करुन मोगली मुलुखावर धाड घालणारा पहिला मराठी वीर म्हणजे कृष्णा सावंत होय.[४७]

अर्थात असे असले तरी अगदी गादीवर आल्याबरोबर राजारामाला नर्मदा ओलांडण्याचा अगर दिल्ली घेण्याचा विचार करता येण्यासारखा नव्हता. कारण संभाजीच्या वधानंतर अल्पावधीतच औरंगजेबाने झुल्फीकारखानास रायगड कब्जात आणण्यासाठी रवाना केले. त्याने २५-३-१६८९ रोजी रायगडला वेढा घातला. अशावेळी येसूबाईने राजारामाने रायगड वर राहण्याचा धोका पत्करु नये असे सुचवून राजारामास रायगडावरुन मोकळे केले. १६८९ च्या एप्रिलमध्ये राजाराम रायगडावरुन निसटला.

**राजारामाचे जिंजीस प्रयाण –**

जिंजी हे ठिकाण मद्रासहून ६० मैलांवर होते. येथील किल्ला अजिंक्य म्हणून प्रसिध्द होता. २६-९-१६८९ रोजी राजाराम जिंजीस जाण्यास निघाला. या प्रवासात त्याच्या बरोबर बहिर्जी घोरपडे, रुपाजी भोसले, संताजी जगताप, प्रल्हाद निराजी, खंडोबल्लाळ चिटणीस, नीळकंठ मोरेश्वर पेशवे, मानसिंग मोरे इ. लोक होते. रस्त्यात त्यास बहिरजी व मालोजी घोरपडे येऊन मिळाले. बादशहाला मराठ्यांची योजना कळल्यावर त्याने त्यांचा पाटलाग करण्याची आशा केली. जिंजीला जाणाऱ्या राजारामाला पकडण्यासाठी मोंगलांनी सगळीकडून नाकेबंदी केली होती. बेळगव येथील मोगल सरदार बहादूरखान पोर्तुगीजांना कळवतो की, ''राजाराम कर्नाटकात पळून जाण्याची बातमी असल्यामुळे त्याच्या मार्गातील सर्व वाटा पोर्तुगीजांनी रोखून धराव्यात व तो जर सापडला तर त्यास कैद करावा किंवा मारुन टाकावा.''[४८]

गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरने याबाबतीत कोणासच सामील व्हावयाचे नाही असे ठरविले होते. त्याने बहादूरखानाला कळविले, ''आपल्या मुलखामध्ये राजाराम आल्यास इकडून तो सुटून जाणार नाही अशी आपण व्यवस्था केलीच आहे. पण तो या बाजूस येईल असे वाटत नाही.''[४९]

राजाराम जिंजीकडे रवाना झाल्याचे कळताच बादशहाने त्याच्या पाठलागावर अब्दुलखानास पाठविले. त्याने तुंगभद्रेजवळ सुभानगड येथे राजारामावर छापा घातला. या छाप्याच्या प्रसंगी बर्हिर्जी घोरपडे याने महाराजांना अक्षरश: खांद्यावर उचलून पळवले व सुरक्षित स्थळी नेले. त्यानंतर त्यांनी भिकारी, बैरागी, यात्रेकरु व्यापारी, अशांचे भिन्न रुप घेऊन पायी प्रवास सुरु केला.

अखेर एक महिन्यात पाचशे मैलांचा प्रवास करुन राजाराम महाराज नोव्हेंबर १६८९ मध्ये जिंजीला सुखरूप पोहोचले. त्यांचे मुख्य श्रेय प्रल्हाद निराजी, बहिर्जी घोरपडे, सेनापती पानसंबळ, खंडोबल्लाळ, रुपाजी भोसले यासारख्या निष्ठावंत सेवकांना दिले पाहिजे.

राजाराम कर्नाटकात जाताच तिकडचे सत्ताधीश एक होऊन आपल्या फौजा, धन व नजराणे घेऊन त्यास सामील झाले. हेतू हा की सर्वांनी मिळून मुसलमानांचा समाचार घ्यावा. याचप्पा नाईक व इस्माईलखान मका हे दोन

इसम तिकडे प्रबळ होता, ते सुध्दा या मंडळीस सामील झाले. झुल्फीकारखान जेव्हा जिंजीवर चालून गेला तेव्हा त्याची सारखी कुचंबणा झाली आणि शेवटी जरी जिंजीचा किल्ला त्याने मराठ्यांच्या हातून जिंकून घेतला, तरी कर्नाटक प्रांत काही संपूर्णपणे मोगल बादशाहीत दाखल झाला नाही. दक्षिणेतील या कर्नाटकी प्रदेशावर मराठे आपला हक्क अखेरपर्यंत सांगत होते. [५०]

## जिंजीचा वेढा –

सप्टेंबर १६९० मध्ये झुल्फिकारखान जिंजीला पोहोचला व किल्याला वेढा देऊन बसला. मराठ्यांची जिंजीच्या आजूबाजूचा प्रदेश जाळपोळ करुन उध्वस्त केला होता. त्यामुळे खानाच्या फौजेला रसद मिळणे कठीण जाऊ लागले. मराठ्यांचा जोर कमी करण्यासाठी झुल्फिकारखानाने बादशहाकडे अधिक सैन्याची मदत मागितली. बादशहाने लगोलग शहाजादा कामबक्ष आणि वजीर आसदखान यांना त्यांच्या मदतनीस रवाना केल्या. याचवेळी मोंगलांकडे गेलेले नागोजी माने, माणकोजी पांढरे, कागलकर घाटगे इ. सरदार जिंजी येथे पुन्हा राजारामाला येऊन मिळाले.

झुल्फिकारखानाच्या मदतीला कामबक्ष, आसदखान आल्याचे पाहून रामचंद्र पंताने जिंजीवरील मुघलांची पकड ढिली करण्यासाठी १५००० फौज देऊन धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांना पाठविले. मध्यंतरी इस्माईलखान मका, झुल्फिकारखानाला मिळाला होता. धनाजीने जिंजीला पोहोचताच इस्माईल खानावर हल्ला करुन त्याला पराभूत केले. संताजीने अलिमर्दानखानास पराभूत केले. खानाने राजारामाकडे त्याला वांदेवाशाला जाऊ देण्याची प्रार्थना केली. ती मान्य होताच तो वांदेवाशला गेला.

## जिंजीवर मुघलांचा अधिकार –

१६९८ मध्ये झुल्फिकारखानाने जिंजीला टाकलेल्या वेढ्याचे काम ७ वर्षे झाली तरी चालू होते. सात वर्षे झाली तरी तो वेढा चालूच होता. त्यामुळे तो मराठ्यांना तर आतून वश नसावा ना अशी शंका खुद्द सम्राटाला येऊ लागली होती. किल्ला ताबडतोब जिंका असा त्याने खानाला हुकूम सोडला. नोव्हेंबर १६९८ मध्ये खानाने वेढ्याचे काम पुन्हा सुरु केले पण राजारामास अगोदरच बाहेर पडू दिले व किल्ला ताबडतोब ताब्यात घेतला. राजाराम महाराज २२ फेब्रुवारी १६९८ रोजी विशाळगडावर पोहोचले.

## राजारामाच्या स्वराज्यातील हालचाली –

राजाराम जिंजीस होता तोपर्यंत मराठ्यांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडू हे तीनही प्रदेश होते. परंतु तो जिंजीवरुन बाहेर पडल्यामुळे कर्नाटकातील हालचाली आपोआपच बंद पडल्या.

१६९० ते १६९८ या काळात अहमदनगर, मराठवाडा, बागलाण, खानदेश इ. भागातही मराठ्यांचा फेरफटका सुरु झाला. बागलाण आणि खानदेश या प्रदेशात येसाजी व खंडोजी दाभाडे खानदेशात नेमाजी शिंदे व विश्वासराव पवार, वऱ्हाडमध्ये परसोजी भोसले इ. लष्करी हालचाली चालू होत्या. कोकण पट्टीवर कान्होजी आंग्रेने आपला दबदबा निर्माण केला होता म्हणून राजाराम महाराजांनी प्रसन्न होऊन त्याला सरखेल हा किताब दिला.

इ.स.१६९८ मध्ये धनाजी जाधव आणि नेमाजी शिंदे यांनी खानदेशात घुसून बऱ्हाणपूर, नंदूरबार, इ. शहरे लुटली. एवढेच नव्हे तर कृष्णा सावंत १५००० फौजेनिशी नर्मदा पार झाला व धामधूम माजवून परत आला.[५२] त्याच सुमारास दक्षिणेकडे हुबळीच्या प्रदेशात हिंदूराव घोरपड्याने मोठी धामधूम माजविली.[५३] स्वत: राजारामाने अनेक मराठा सरदारांसमवेत मुलूखगिरी केली. सुरतेवर धाड घालण्याचेही मनसुबे आखले तथापि मार्च १७०० मध्येच सिंहगड येथे वयाच्या केवळ ३० व्या वर्षी राजाराम महाराजांचा मृत्यू झाला आणि सर्वच राजकारण बदलले.

**छत्रपती राजाराम आणि पोर्तुगीज –**

छ.संभाजी आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये रक्तरंजीत प्रदीर्घ युध्द झाल्याने उभयपक्षांमध्ये राजनैतिक संबंध विकोपास गेले होते. राजारामास औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूंशी सामना द्यायचा असल्याने पोर्तुगीजांशी मिळते जुळते धोरण पत्करणे त्याला भाग पडले. संभाजीचे पोर्तुगीजांशी युध्द चालूच होते तेव्हा पोर्तुगीजांनी त्याला शह देण्यासाठी औरंगजेबाचे लांगुलचालन सुरु केले. परंतु संभाजीच्या मृत्यूनंतर किंवा त्यापूर्वी मुघल मराठ्यांचा मुलूख घेऊन पोर्तुगीजांचे शेजारी म्हणून आले. तेव्हा त्यांचे सानिध्य त्यांना तापदायक वाटू लागले.

पोर्तुगीजांप्रमाणेच कोकणातील बंडखोर देसाई संभाजीच्या मृत्यूनंतर मुघलांविरुध्द बिथरले. विशेषत: औरंगजेबाने संभाजीला हालहाल करुन ठार मारल्याने ते त्याच्यावर संतप्त झाले. मणेरी, साखळी, डिचोली, फोंडे, चंद्रवाडी इ. महालातील देसाई स्वामीचे राज्य देवा-ब्राह्मणांचे विश्रामस्थान असे मानून मुघलांशी लढण्याकरिता राजारामाच्या सैन्यात भरती झाले. फक्त वाडीकर भोसले हे पूर्वीसारखे छत्रपती घराण्याचे विरोधक म्हणून राहिले. गोव्याचा व्हाईसराय दख्खनमधील राजकीय घडामोडींचा आढावा घेऊन दिनांक १६ जानेवारी १६९१ रोजी पोर्तुगालच्या राजास लिहीतो, कोकणातील मोगल बादशहाची पकड ढिली पडल्याने व त्याच्या सरदाराने त्याच्याकडे मागितलेली कुमक न आल्याने तेथल्या देसायांना बादशहाची सत्ता झुगारुन देवून राजारामाशी संधान जुळविले आहे. किंबहुना राजारामानेच त्यांना बादशहाविरुध्द चिथावणी दिली असे म्हटले तरी चालेल. त्याचे कारण हे की हे देसाई आणि राजाराम हे एकाच धर्माचे आहेत. त्यात पुन्हा मुसलमानांच्या अरेरावीने आणि उर्मटपणाने ते चिडून गेले आहेत. मुसलमानांनी हिंदू स्त्रिया आणि मंदीरे भ्रष्ट केली असल्याने त्यांच्याविरुध्द त्यांनी उठाव केला असल्यास नवल नाही. सर्व देसायांनी एकवटून फोंड्याचा सुभेदार सरबजखान व सरदार अब्दुल राजाखान या दोघांविरुध्द बंड केले. अब्दुल राजाखान हा कुडाळला होता. त्याला तेथून डिचोलीला पळून जावे लागले. त्याला आणि सुभेदार सरबजखान याला राजारामाची भिती वाटत होती.[५४]

मराठ्यांनी फोंड्याच्या जवळपासचे खेडी लुटली व फोंड्यास वेढा घातला. मोगलांपाशी घोडदळ नाही, जे काही थोडेफार आहे ते मरुन गेले आहे. अब्दुल राजाखान याने आपली बायकामुले आणि मौल्यवान वस्तू नदीतील एका बेटावर सुरक्षिततेसाठी पाठवून दिले आहे. याबाबतीत आमच्याकडून त्याला मदत झाली

एका बाजूने आम्ही बादशहाच्या प्रजाजनांना आमच्या राज्यातून बाहेर जाण्यास वाट देत आहोत तर दुसऱ्या

बाजूने राजारामाशीही धूर्तपणाने वागत आहोत. त्याने व्हीसेराई दो-रुद्रीगू-दी कॉस्त व व्हिसेराई दो मिगेल-द-अल्मैद या दोघांना पत्रे पाठवून आपले पिते शिवाजीराजे यांचे आमच्याशी जसे मैत्रीचे संबंध होते तसेच संबंध आम्ही आपणाशी ठेवावेत अशी विनंती केली. त्यांच्या पत्रास आम्ही उत्तर धाडले असून त्यांचेशी मैत्रीचे संबंध ठेवून असे त्याला कळविले आहे.

असे कळते की राजारामाच्या सैन्याने आणि देसायांनी फोंडे आणि डिचोली हे दोन्ही प्रांत काबीज केले आहेत. आमच्या राज्याला मुसलमानांपेक्षा हिंदूचा शेजार बरा असे आम्हाला वाटते. मुसलमानांवर कधीच विश्वास ठेवू नये त्यांना वचनाची चाड नसते ते उर्मट आणि भांडखोर असतात. तथापी असे असले तरी आम्ही मात्र दोघांशीही आमचे संबंध तटस्थतेचे आहेत असा आभास निर्माण करतो. त्यांच्याशी असलेले मतभेद आम्ही कधीच उघड करीत नाही. आम्ही नेहमीच जागरुक आणि तयारीने असतो. आम्ही हत्यारबंद असून आमची ठाणी सुरक्षित आहेत.[५५]

राजारामाने जिंजीस प्रयाण केले तेव्हा मोगल अधिकाऱ्यांनी पोर्तुगीजांना इशारा दिला होता की राजाराम गोवा मार्गे कर्नाटकात निसटण्याचा संभव आहे. तरी तो तिकडे गेला असल्यास त्याला अटक करावी. व्हिसेराईने मुघल सरदार मातबरखान याला पत्रोत्तरी कळविले की, राजाराम गोवा मार्गे कर्नाटकात निसटू नये म्हणून चौक्या, पहारे बसविण्यात येत आहेत.[५६]

राजारामने जिंजीस निघतेवेळी व्हिसेराइला पत्र पाठवून पोर्तुगीजांशी सलोख्याचे संबंध ठेवण्याची इच्छा दर्शविली होती. पोर्तुगीजांनाही राजारामाविषयी सहानुभुती वाटत होती. कारण मोगलांचा शेजार त्यांना नकोसा वाटत होता. त्याच्या अरेरावीचे अनुभव त्यांना कळू लागले होते. तर संभाजीच्या कारकिर्दीत पोर्तुगीजांच्या दुटप्पीपणामुळे मराठे दुखवले गेले असल्याने पोर्तुगीजांची कळ काढण्याची संधी ते दवडत नव्हते. या संबंधी गोव्याचा व्हिसेराइ १६९० साली कधीतरी रामचंद्रपंत अमात्य यांना लिहीलेल्या पत्रात मराठा सरदारांविरुध्द तक्रार करताना म्हणतो तुमचे लष्करी सुमेदार युध्दनौकांसह आमच्या समुद्रात संचार करीत आहेत. त्यांच्या हालचालींवर आपण नियंत्रण ठेवले पाहिजे. न झाल्यास तुमचा आमचा एकोपा होणे कठीण आहे.

व्हिसेरायने १६९१ सालच्या जानेवारी महिन्यात पोर्तुगालच्या राजास लिहीलेल्या पत्रात दख्खनमधील राजकीय घडामोडींचा आढावा घेतला आहे. तो म्हणतो मुघल बादशहाचे वास्तव्य सांप्रत विजापूर येथे आहे. मुघलांनी जिंजी आणि तंजावर घेतल्याची बातमी आहे. ही राज्ये मराठ्यांची आहेत. परंतू मुघलांचा जोर दक्षिणेत होताच मराठ्यांनी कोकणात उचल खाल्ली आहे. कारण कोकणात मुघलांचा बंदोबस्त नाही. मराठ्यांचा कोकणातील प्रदेश गोव्याच्या हद्दीला भिडलेला आहे. ४ वर्षामागे मुघल बादशहाने हा प्रदेश काबीज केला होता. मराठ्यांनी कोकणातील प्रदेश फिरुन घेतला इतकेच नव्हे तर त्यांनी फोंड्याच्या किल्ल्यावरही कब्जा केली आहे. आमच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास बलाढ्य मुघल बादशहापेक्षा मराठ्यांचा शेजार बरा असे आम्हाला वाटते.[५७]

वरील धोरणास अनुसरुन गोव्याचे पोर्तुगीज मराठ्यांना मदत करीत असावेत. त्यांचा संशय मुघल सरदार

मातबरखान याला आल्याने या दगलबाजीविरुध्द पोर्तुगीजांना धडा शिकविण्यासाठी त्यांनी १६९२ मध्ये पोर्तुगीजांच्या ठाणे जिल्ह्यातील प्रदेशात सैन्य घुसविले. मोगल आणि पोर्तुगीज यांच्या अनेक झटापटी झाल्या. पण मोगलांसमोर निभाव न लागल्याने पोर्तुगीजांनी वसईच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. मोगलांनी अनेक पोर्तुगीज स्त्रिया आणि मुले धरुन नेली.

मातबरखानाने बादशहाची परवानगी न घेता वरील कारवाई आपल्या अखत्यारीत केल्याने त्याचे हे कृत्य बादशहाला विदीत करण्यासाठी व्हिसेराइने एक दूत बादशहाकडे धाडला.

बादशहाने पोर्तुगीजांची तक्रार ऐकून घेतली व पोर्तुगीज प्रदेशात आक्रमण केल्याबद्दल मातबरखानास दोषी ठरवून २ लक्ष रुपयांचा दंड केला. ही रक्कम त्याने नुकसान भरपाई म्हणून पोर्तुगीजांना द्यायची होती. त्याचप्रमाणे मातबरखानाने जी पोर्तुगीज बायका-मुले पकडून नेली होती ती सोडून देण्याचाही हुकूम बादशहाने त्याला दिला. दिनांक १६ नोव्हेंबर १६९३ रोजी व्हिसेराईने कोकणचा सुभेदार रायाजी शामराज याला मराठा सैनिकांनी बारदेशमध्ये शिरुन लुटालूट केल्याबद्दल तक्रार करुन पत्र लिहीतो.[५८] त्यात तो म्हणतो मागे रामचंद्र पंडीत व संभाजी घोरपडे यां दोघांना पत्रे पाठवून आपण आमचे मित्रअसल्याचे कळविले होते. परंतु आज चित्र वेगळे दिसत आहे. तुमच्या सैनिकांनी घाट उतरुन आमच्या राज्यात शिरुन लुटालूट केली. हे कृत्य शत्रुत्वाचे असल्याने तुमच्यावर विश्वास कसा ठेवावा हे कळेनसासे झाले आहे. मी चौलच्या कॅप्टनला पत्र पाठवून कुलाबा आणि खांदेरी घेण्याची आज्ञा केल्याचे पाहून आपण गडबडून गेला असाल. मला आपणांस कळवावयाचे आहे की आम्ही पोर्तुगीज लोक सबळ कारणाखेरीज आमच्या मित्रांकडील संबंध तोडीत नाही. तुमच्या सैनिकांनी बारदेशमध्ये शिरुन लुटालूट केल्याबद्दल तुम्ही त्यांना शासन केले पाहिजे. तुम्हाला युध्द हवे असल्यास आमची त्याला तयारी आहे. तुम्हाला युध्द नको असल्यास ते तुम्ही कृतीने सिध्द केले पाहिजे.

मराठा सैनिकांनी बारदेश प्रांतात शिरुन लुटालूट केल्याचा बदला म्हणून किंवा आणखी काही कारणाने म्हणा पोर्तुगीजांनी मराठ्यांच्या अंमलाखालच्या आचरे बंदरात शिरुन जाळपोळ केली. त्यांनी बंदरातील सात होड्या जाळून टाकल्या व एक हिंदू देवालय मोडून टाकले. या घटनेचा उल्लेख करुन व्हिसेराइने एक जुना मोगल वकील शेखमहंमद याला २९ नोव्हेंबर १६९४ रोजी लिहीले, 'आपणास माहित आहेच की शिवाजीशी (मराठ्यांशी) आमचे युध्द झाले तेव्हापासून त्यांचा आणि आमचा तह झालेला नाही. त्यांना आम्ही आमच्या बंदरात कधीच येऊ दिले नाही. इतकेच नव्हे तर प्रत्येक ठिकाणी त्यांच्या आणि आमच्या चकमकी उडतात. मग त्या जमिनीवर असो वा समुद्रावर. गेल्यावर्षी त्यांनी आमच्या काही युध्दनौका पकडल्या म्हणून त्यांच्या एका बंदरात आमच्या युध्दनौका शिरल्या व त्यांनी तेथील अनेक नौका जाळून टाकल्या.[५९] शिवाय त्यांचे खेडे आणि एक प्राचीन देऊन त्यांनी जाळून टाकले. मी चौलच्या कॅप्टनला त्यांची शक्य ती हानी करण्याची सुचना देत आहे. वरील पत्रात पुढे असे लिहीले की, तद्नंतर मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये चकमकी झडतच राहिल्या असाव्यात असे वाटण्यासरखा पुढील मजकूर सापडतो. हे पत्र त्याने

१५ जून १६९५ रोजी कोकणचा सुभेदार गणेश रघुनाथ यांस लिहीले होते. त्यांत त्याने म्हटले होते. रामचंद्र पंडीत यांनी कोकणचा कारभार बघण्यासाठी आपली नेमणूक केल्याची कळून आनंद झाला. आपली कामगिरी यशस्वी होवो ही शुभेच्छा. आमच्या मैत्रीची आपण अपेक्षा करता आपणाला मी कळवू इच्छितो की पोर्तुगीजांची मैत्री ज्यांना हवी असते त्यांना ती मिळाल्यावाचून रहात नाही. आपणालाही ती मिळू शकते. परंतु आश्चर्याची गोष्ट ही की रामचंद्र पंडीत हे या राज्याच्या मैत्रीची अपेक्षा करीत असता दुसऱ्या बाजूने त्यांच्याकडून शत्रूत्वाची कृत्ये कशी घडतात? त्यांच्या सुभेदारांच्या युध्दनौका आमच्या पाण्यात संचार करुन आमच्या नौकांना उपद्रव देतात. त्यावरुन त्यांची आमच्या मैत्रीची अपेक्षा प्रामाणिक नसावी असा संशय येतो. ज्याला एखाद्याची मैत्री हवी असते त्यांचे शत्रुत्व करुन ती मिळते का?[६०]

रामराजे यांनाही आमची मैत्री हवी आहे पण ते आमच्या शत्रूंशी मैत्रीने वागतात. ही गोष्ट आम्हाला विसंगत वाटते. रामराजे यांच्याशी मी मैत्री करण्यास तयार आहे. पण त्यांच्या सरदारांनी आमच्याशी शत्रुत्व करण्याचे सोडून दिले तरच ते शक्य आहे. त्यांनी आमच्या नौकांचा पिच्छा पुरवण्याचे सोडून दिले नाही तर या लुटारुंना मी योग्य ते शासन केल्यावाचून रहाणार नाही.

सत्याजी राणे याने आमच्या राज्यात शिरुन अनुचित कृत्य केल्याने त्याला कैद करण्याचा हुकूम मी केला. परंतु आमच्या राज्यात लूटमार करण्यामागे त्याचा हात नव्हता हे सिध्द झाले तेव्हा तो निरपराध म्हणून त्याला सोडून देण्यात आले. तो आता तुमच्या राज्यात शिरल्याची बातमी आहे. त्याने तिकडे गडबड केली असल्यास तुम्ही त्याला शासन करु शकता.[६१] त्यानंतर १५ दिवसांतच रायाजी पंडीत याचे निधन झाले असावे असे वाटते. कारण २५ जून १६९५ च्या पत्रांत व्हिसेराई लिहीतो की, ''रायाजी पंडीत याच्या निधनाने तुमची आणि आमची मैत्री तुटेल अशी भिती वाटत होती. परंतु तुम्ही ज्या अर्थी आश्वासन देता की, मैत्री चालूच राहील त्याअर्थी मला आपणांस सुचवावयाचे आहे की तुमच्या सुभेदाराची जी गलबते आमच्या पाण्यात धुमाकूळ घालीत आहेत त्यांना आवरले पाहिजे. असे घडले तर आमच्या मैत्रीचा तुम्हाला प्रत्यय आल्यावाचून रहाणार नाही. आम्ही ज्यांना मित्र मानतो त्यांचेशी आम्ही कधीच प्रतारणा करीत नाही.''[६२]

दिनांक २ किंवा ३ मार्च १७०० रोजी रामारामाचे सिंहगडावर निधन झाले. त्याच्या मृत्यूपूर्वी २ वर्षे पोर्तुगीज आणि मुघलमराठे यांचे संबंध सलोख्याचे होते, असे दिसते.[६३]

**राजारामाच्या कामगिरीचे मुल्यमापन –**

प्रस्तुत विषयाच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास राजारामाचे कार्य फार महत्वाचे मानावे लागेल. कारण त्याच्याच कारकीर्दीत मराठे नर्मदा पार झाले. उत्तरेवर आपले लक्ष त्याने केंद्रित करण्याचा विचार व्यक्त केला होता. १६९९ च्या कृष्णा सावंताच्या नर्मदा पार होण्याने तो विचार एकप्रकारे प्रत्यक्षात आला असेच म्हणावे लागेल. ताराबाईच्या काळातही मराठे उत्तरेकडे गेले. पुढे शाहूच्या काळात पेशवा या नात्याने बाळाजी विश्वनाथ भट आणि

त्याचा मुलगा बाजीराव यांनी थेट दिल्लीवर धडका मारल्या. त्याची सुरुवात राजाराम महाराजांच्या काळातच झाली हे निश्चित.

राजारामाला हे एवढे शक्य झाले त्याचे कारण त्याचा स्वभाव. रियासतकार लिहीतात, ''राजारामाची कारकीर्द म्हणजे कर्ती माणसे निपजविण्याची खाण, राष्ट्राभिमान शिकविण्याची उत्तम शाळा व पराक्रम आणि किर्ती गाजविण्याची उत्तम रंगभूमी असे म्हटल्यास वावगे ठरु नये.'' सेतूमाधवराव पगडींच्या म्हणण्याप्रमाणे राजाराम महाराजांनी शेकडो कुटुंबांना राष्ट्रकार्याकडे वळविले. त्याच्या उदार धोरणामुळे शेकडो मराठे पुढे आले व त्यांनी डोंगराएवढी कामगिरी केली.[६४] वा.सि.बेंद्रे लिहीतात जनता सुदृढ राहिली तर राजाला राज्य सांभाळता येते हे त्याने आपल्या कारकीर्दीत मराठ्यांचे हरण झालेले राज्य घेऊन दाखवून दिले. रियासतकार लिहीतात, ''नाना प्रकारच्या अडचणीतून मार्ग काढून मराठा मंडळाने स्वार्थत्यागपूर्वक बादशाहीशी जो लढा दिला त्याला इतिहासात स्वातंत्र्याचे युध्द असे नांव मिळाले आहे. त्यामुळे राजारामाची व्यक्तीश: बडेजाव झाली नसली तरीही राष्ट्राची बडेजाव झाली आणि मराठ्यांचा भावी इतिहास इतका उज्वल बनला की, त्याचे श्रेय छत्रपती या नात्याने राजारामास मिळणे प्राप्त झाले.''[६५]

अर्थात असे असले तरी राजारामाच्या काळातील मराठ्यांच्या प्रदेश विस्ताराला किंवा स्वातंत्र्य लढ्याला दुसरीही एक बाजू आहे. शिवाजीची स्वराज्य कल्पना शिल्लक राहिली पण त्याने घालून दिलेले कित्येक शिरस्ते मोडले जाऊ लागले. राजारामाच्या कारकीर्दीत कित्येकांनी सर्वस्वाचा त्याग केला हे खरेच पण त्याच काळात फितुरही निघाले. पराक्रम केवळ जहांगिरीच्या आणि वतनाच्या लोभाने झाले हाही त्या काळच्या घडामोडीतील एक महत्वाचा भाग आहे. राजारामाच्या कारकीर्दीवर भाष्य करताना प्रा.जयसिंगराव पोवार म्हणतात, ''मराठी सत्तेच्या भावी नाशाची बीजे याच काळात रुजली गेली. मराठी सत्तेचा वृक्ष पुढे चांगलाच फोफावला हे खरे. परंतु तो फोफावत असताना सरंजामशाहीच्या रोगाचे विषही त्याच्या फांद्याफांद्यातून पसरत होते. शेवटी ते विषच मराठी सत्तेच्या नाशास कारणीभूत ठरले.''[६६]

राजारामाच्या कारकीर्दीनंतर राज्यकारभाराची जबाबदारी त्याची पत्नी महाराणी ताराबाई हिच्याकडे आली. तिने अत्यंत प्रतीकूल परिस्थितीत मराठ्यांचे राज्य राखले एवढेच नव्हे तर तिच्या कारकीर्दीत मराठ्यांच्या सेना माळव्यात कालबाग पर्यंत पसरल्या होत्या. न जाणो मराठी फौजा आग्र्यावरही घसरतील असे बादशहाला वाटले. इतकी धास्ती बादशहाला तिची वाटू लागली होती. तथापी तिने केलेल्या कार्याची माहिती पहाण्या अगोदर राजारामाच्या कारकीर्दीत ज्याने आपल्या पराक्रमाने मोघलांना दे माय धरणी ठाय करुन सोडले अशा संताजी घोरपडेची दखल घेणे विषयाच्या अनुषंगाने आवश्यक वाटते.

**<u>संताजी घोरपडे –</u>**

संताजी घोरपडेची डोळ्यात भरण्यासारखी कामगिरी राजाराम महाराजांच्या काळातील असली तरी छ.संभाजीच्या काळात आणि शककर्ते शिवाजी महाराजांच्या काळातच त्याच्या कामगिरीला सुरुवात झाली असली

पाहिजे. सर्वसाधारणपणे इ.स.१६४२ मध्ये त्याचा जन्म झाला असावा. शिवाजीच्या काळातील त्याच्या पराक्रमाची हकीकत मिळतेच असे नाही. कदाचित शिवाजीच्या काळात त्याला दुय्यम स्थान असावे पण संभाजीच्या काळात त्याच्या पराक्रमाला सुरुवात झाली यात शंका नाही. कारण १६८२ साली संभाजीने संताजीला जी एक सनद दिली आहे त्यात म्हटले होते ''पठाण, मुसलमान, बेरड वगैरे लोक ठाणी घालवून ७००० घोड्यांची फौज घेवून आले असता कोणाचेही सहाय्य नसता तुम्ही काटकरांची वगैरे १२००० जणांची फौज जमवून ३ महिने लढाई करुन जो उद्योग केलात तो राज्याला चांगलाच फायद्याचा ठरला. सर्व सरकारात चाकरी हिमतीने आणि इमानाने केले व आपला प्राण रक्षण करुन आमचा प्राण रक्षण केला हे समजून राज्यातील चौथाई मुलूख तुम्हाला इनाम करुन दिला असे.''[६७]

यानंतर संभाजीच्या कारकीर्दीत संताजीने दक्षिणेकडे काही पराक्रम गाजविले परंतु त्याची कारकीर्द गाजली ती छ.राजाराम महाराजांच्या कारकीर्दीतच. ऑगस्ट १६८९ मध्ये औरंगजेबाची छावणी तुळापूरवर असताना त्यावर छापा घालून त्याच्या तंबूचे कळस कापण्याचे धाडस संताजीनेच केले होते. संताजीच्या या कामगिरीबद्दल राजाराम महाराजांनी त्याला ममलकत - मदार, बहिर्जीस हिंदूराव आणि मालोजीस अमीर-उल-उमराव व विठोजीस हिंमत बहाद्दर असे किताब बहाल केले होते. [६८]

राजाराम महाराज जिंजीस गेले त्यावेळेस संताजीने मुघलांना कोल्हापूर भागातच गुंतवून ठेवले होते. अनेक ठिकाणी संताजीने मुघल फौजांचा दणदणीत पराभव केला होता. तसेच मुघलांच्या अनेक मातब्बर सरदारांना नमविले होते. सन १६९१ मध्ये राजाराम महाराजांनी त्याला सेनापती पदावर नेमले.[६९]

सेनापती म्हणून संताजीने अनेक पराक्रम गाजविले. त्यात दोड्डेरीची लढाई महत्वाची मानली जाते. त्यात त्याच्या पराक्रमाचा कळस झालेला दिसतो.[७०] तो पराक्रमी होता हे नि:संशय. लढवैय्या होता यातही शंका नाही. पण माणसे घेऊन सर्वांना बरोबर घेऊन जाणे हे त्याला कधीच जमले नाही. त्याची स्वभावप्रकृती म्हणजे अनेक प्रखर गुणदोषांचे विस्मयजनक रसायनच होते. शत्रूला धाक दाखविणारा हा संताजी आपल्या धन्याबरोबरही (राजाराम महाराज) यांच्याबरोबरही लढला. त्यातच पुढे त्याचे व धनाजी जाधवाचे वितुष्टही आले. त्या वितुष्टाचे पर्यवसन दिवसेंदिवस एकमेकातील द्वेष वाढण्यात झाले. त्यातूनच पुढे संताजीचा खूनही झाला.

संताजीचा खून ही मराठ्यांच्या इतिहासातील एक शोकांतिका होय. पण या शोकांतिकेस तोही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. तथापी सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणे, ''त्याचा मृत्यू ही भयंकर राष्ट्रहानी होय,[७१] या मताशी कोणीही सहज सहमत होईल.''

२-iv) **महाराणी ताराबाई –**

राजारामाचा मृत्यू ही मराठ्यांची जबरदस्त हानी होती. परंतू ती हानी भरुन काढण्यासाठी राजारामाची बायको ताराबाई पुढे सरसावली. राजारामाच्या पश्चात तीने आपला लहान मुलगा शिवाजी याला गादीवर बसवून

राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली.

ताराबाई ही शिवाजी व संभाजी यांच्या शूर सेनापती हंबीरराव मोहिते याची कन्या होय. तिचा जन्म सुमारे १६७५ मध्ये झाला. सन १६८४-८५ मध्ये तीचा राजाराम महाराजंच्या बरोबर विवाह झाला. १६८९ ते १७०० पर्यंत तीचे आयुष्य अत्यंत धावपळीत आणि दगदगीत गेले. तथापी याही काळात ती पतीबरोबर राहून राजकारणाचे अवलोकन करीत होती. आपपासांतील तंट्यांचे निवारण करीत होती. धनाजी जाधव आणि गिरजोजी यादव यांच्यातील तंट्याचा निवाडाही तीनेच केला होता. या तंट्यात तीने यादवाच्या बाजूने निकाल दिला होता. धनाजी जाधवासारख्या मातब्बर सेनापतीच्या राग-लोभाची पर्वा न करता अत्यंत निष्ठूरपणे तीने न्यायनिवाडा केला होता.[७२] त्यावरुन तिच्या स्वभाव वैशिष्ट्यावर प्रकाश पडतो. ताराबाई मुळातच कणखर वृत्तीची स्त्री होती हे राजारामाच्या काळातच सिध्द होऊन जाते. तिच्या कणखर वृत्तीवर प्रकाश टाकणारे हे तत्कालीन कवनही उपलब्ध आहे. त्यात कवी म्हणतो, ''राजारान विदेश दक्षण देशी, चंदावरी राहिला। रोगेक्षिण परंतू सुकृत बळे तारामती रक्षिला॥ ताराबाई धैर्य पुरुषा शुरत्व आणि बळे। घेऊनी नृप राम स्वामीसह तेजे प्राप्त झाले दळे॥[७३] औरंगजेबाकडील काफीखानदेखील ताराबाई राजाराम काळातच राज्य कारभार करीत होती असे म्हणतो. तो लिहीतो, ताराबाई ही राजारामची थोरली बायको. ती बुध्दीमान आणि शहाणी होती. सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार या बाबतीत नवऱ्याच्या हयातीतच तिचा मोठा लौकिक झाला होता.[७४]

अर्थात असे असले तरी इ.स.१७०० ते १७०७-८ पर्यंत तिची खरी कारकीर्द होय. २ मार्च १७०० रोजी राजारामाचा अचानक मृत्यू झाला. तथापी त्याने डगमगून न जाता तिने आपला पुत्र शिवाजी यांस गादीवर बसवून आपल्या हाती लष्कराची सर्व सूत्रे घेतली. मराठ्यांच्या बाजूवर तिने नेतृत्वाची उणिव भासू दिली नाही. इतकेच नव्हे तर तिने पतीपेक्षाही खंबीर नेतृत्व मराठ्यांना दिले असे प्राध्यापक जयसिंगराव पोवारांनी जे मत दिले आहे ते ग्राह्य धरण्यास तत्कालीन फारसी लेखक खाफीखान याचा पुरावा पुरेसा होईल. तो म्हणतो, राजारामाची बायको ताराबाई हिने विलक्षण धामधूम उडविली. त्यामध्ये तिच्या सैन्याच्या नेतृत्वाचे व मोहिमांच्या व्यवस्थेचे गुण प्रकर्षाने प्रकट झाले. त्यामुळे मराठ्यांचे आक्रमण आणि त्यांची धामधूम दिवसेंदिवस वाढतच गेली.[७५]

सन १६९९ ते १७०० या काळात बादशहाने सातारा व परळी असे दोन किल्ले जिंकले. तथापी त्या वेळेस मराठ्यांनी बादशहाशी जो प्राणपणाने लढा दिला त्याचे कौतुक ताराबाई करतात. १२ मार्च १७०१ च्या पत्रात विठोजी केसकराचे कौतुक करताना त्या लिहीतात, ''तुम्ही हमेशा कस्त करुन गनीमांस नतीजा पावविता एक-दोन वेळ मोर्चा मारिला औरंगजेबाला तरी ठेचगा द्यावा अशी उमेद धरिता म्हणून हे वर्तमान देवजी रघुनाथ व फडणीस यांनी विदीत केले. त्यावरुन तुमचा मुजरा झाला ऐसियांस तुम्ही एकनिष्ठ सेवक तैसेच आहा. याउपरी औरंगजेब आला तरी त्याचा हिसाब न धरीता स्वामीची जागा जनत करणे. स्वामी उर्जित हरबाग करतील दिलासा असू देणे.''[७६] ज्याप्रमाणे ताराबाई आपल्या सरदारांच्या कर्तृत्वाचे कौतुक करण्यास कसूर करत नव्हत्या त्याप्रमाणे फितुरांना परत बोलाविण्यासही

तयार रहात होत्या. पुणे येथील पुराभी लेखागारात असलेल्या एका अप्रकाशित पत्रावरुन फितुरांना त्या परत कशा बोलावित होत्या या गोष्टीवर प्रकाश पडतो. दिनांक २० मे १७०२ रोजीच्या त्या गोविंदकृष्ण देसाई आणि अप्पाजी माणकोजी अतकरे यांना लिहीलेल्या पत्रात म्हणतात, ''कोणाही गोष्टीचा शक न धरीता हुजूर येणे म्हणून परत बोलाविले आहे.''[७७]

राजारामाच्या काळाप्रमाणेच मोघल बादशहा औरंगजेब ताराबाईच्या काळातही दक्षिणेत तळ ठोकून बसला होता. मराठे आणि मोघल यांच्यात किल्ल्यांच्या बाबतीत पाठशिवणीचा खेळ चालूच होता. तथापी मराठ्यांच्या सत्तेचा विस्ताराबाबत ताराबाईनी आक्रमक धोरण स्विकारले. बादशहा जेव्हा विशाळगडाच्या पायथ्याशी वेढा घालून बसला होता तेव्हा ताराबाईनी आपल्या फौजा औरंगाबादच्या प्रदेशात पाठविल्या होत्या. त्यांचा मोड करण्यासाठी बादशहाने झुल्फिकारखानास धाडले पण खानासच पळवून लावून मराठे वऱ्हाडात घुसले.[७८]

कोकणात हिंदूराव घोरपड्यांनी धामधूम माजविली. त्याने फोंड्यास वेढा घालून फोंड्याचा किल्ला हस्तगत केला. ताराबाईच्या नेतृत्वाखाली कोकण आणि दक्षिणेत इतरत्र उठाव चालूच होते पण विशेषत: त्यांनी उत्तरेकडे आक्रमक पावले टाकली. कृष्णा सावंत हा मराठा वीर राजारामाच्या काळातच नर्मदा पार झाला होता. नर्मदा पार करणारा तो पहिला मराठा वीर असा त्याचा गौरव करण्यात आला.[७९] ताराबाईंनी मराठे राजरोसपणे माळव्यावर पाठविण्यास सुरुवात केली. त्या कामावर तिने नेमाजी शिंदेची नेमणूक केली. १७०२ मध्येच त्याने आपली पहिली स्वारी माळव्यावर करुन १७०३ मध्ये तो ५०००० फौजेनिशी पुन्हा माळव्यात घुसला. त्या वेळेस त्याच्याबरोबर केसोत्रीनल हा मराठा सेनानी होता. केसोत्रिमल म्हणजे शिवाजी महाराजांचा पेशवा मोरोपंत पिंगळे यांचा भाऊ. नेमाजी शिंद्याने माळव्यात गेल्यावर मराठ्यांच्या फौजा विभागल्या. त्यांची एक फौज उज्जैनच्या प्रदेशात गेली व तिथे त्यांनी धामधूम सुरु केली. दुसरी फौज सिरोंजवर गेली व तीने ते शहर लुटले. उलट नेमाजीचा पराभव झाला असे रियासतकार म्हणतात. १७०४ मध्ये मात्र मोहनसिंग रावळच्या सहाय्याने नेमाजी शिंद्याने विज्य मिळविला. तथापी लुफ्तुल्लाखान म्हणतो, ''आमच्या सैन्यामुळे त्याला चांगली तंबी मिळाली. शत्रुला काही लाभ न होता परत फिरावे लागले ही मोठीच गोष्ट झाली.[८०] येथे एक गोष्ट स्पष्टच आहे की, लुफ्तुल्लाखान आपल्या वरिष्ठांना खुष करतो आहे. बाकी काही नाही. उलट तत्कालीन परिस्थिती बारकाईने पाहिल्यास असे दिसते की, १६९९-१७०४ या अवधीत मराठे गुजराथ व माळवा या प्रांतात घुसले. द.सुभ्यात त्यांनी जागोजाग छावण्या घातल्या. खंडणी चौथाई वसूल करण्यास सुरुवात केली. सारांश मोंगलांची राज्ययंत्रणा मराठ्यांनी खिळखिळी करुन सोडली.[८१]

ताराबाईच्या कारकिर्दीत मराठे दक्षिणोत्तर पसरले होते. भीमसेन सक्सेना त्याचे वर्णन, ''सर्वत्र मराठे हे टोळ आणि मुंग्याप्रमाणे पसरले होते''[८२] असे करतो.

**ताराबाई आणि पश्चिम किनारपट्टी –**

राजाराम महाराजांनी कान्होजी आंग्र्याला सरखेल हे पद देवून मराठी आरमारच्या प्रमुख पदी नेमले होते.

13139
A

कान्होजी हा मोठा धाडसी आणि पराक्रमी होता. सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज या सागरी सत्तांशी संघर्ष करुन त्याने मराठी आरमाराचे सामर्थ्य वाढविले होते. सिद्दीसारख्या क्रूर आणि कडव्या शत्रूपासून पश्चिम किनाऱ्यावर मराठी मुलखांचे रक्षण करणे सोपी गोष्ट नव्हती. सिद्दीस इंग्रजांचे कळत नकळत मदतीचे धोरण होते. अशा परिस्थितीत ताराबाईच्या कारकीर्दीत त्यांचे इंग्रजांशी सलोख्याचे संबंध राहिले नाहीत. फेब्रुवारी १७०१ मध्ये ताराबाईनी रामचंद्र पंत अमात्यास सिद्दीविरुध्द पाठविले. त्यांच्याबरोबर २०००० मराठी लष्कर होते. या लष्कराने सिद्दीच्या प्रदेशात जाळपोळ आणि लुटालूट करुन ते परतले.[८३] तेव्हा सिद्दीने या गोष्टीचा बदला घ्यावयाचे ठरविले आणि त्याने आपल्या आरमारासह मार्च १७०१ मध्ये कुलाब्याला वेढा दिला. कुलाब्यास खुशकीच्या मार्गाने वेढा घालण्यासाठी पोर्तुगीजांनी सिद्दीस सहाय्य केले.[८४] कुलाब्याच्या सिद्दीच्या वेढ्यासंबंधी इंग्रजांनी म्हटले आहे की, सिद्दीने कुलाबा व खांदेरी वेढली आहे. त्याचे या वेढ्यात जरी पुष्कळ सैन्य गुंतले आहे तरीही मराठ्यांना त्याची बिलकुल कदर वाटत नसून त्यांची गलबते इकडून तिकडे त्याचप्रमाणे लूट करण्यासाठी बाहेर जावू शकतच आहेत.

अशा परिस्थितीत सिद्दीस कुलाबा जिंकता आला नाही. कान्होजी आंग्र्यांनी त्यांचा चांगलाच प्रतिकार केला. बरीच हानी पत्करुन सिद्दीला माघार घ्यावी लागली. इंग्रजांना वाटत होते की, मराठ्यांना पोर्तुगीजांचे सहाय्य आहे. वस्तुस्थिती तशी नव्हती. खरी वस्तुस्थिती अशी होती की मराठ्यांना कुलाबा लढवित असता इंग्रज अथवा पोर्तुगीज यापैकी कोणाचीच मदत झाली नाही. मराठ्यांनी आपल्याच स्वसामर्थ्यावरच कुलाबा लढविला आणि सिद्दीस परतवून लावले.

कान्होजी आंग्र्याच्या आरमाराची मुंबईकर इंग्रजांनी अशीच धास्ती घेतली होती. नोव्हेंबर १७०१ मध्ये मराठ्यांचा एक मोठा आरमारी काफीला मुंबई बंदराजवळ आला. मराठ्यांच्या आरमारी मोहिमेचे उद्दीष्ट इंग्रजांच्या लक्षात आले नाही. तथापी मराठ्यांनी मुंबईवर हल्ला चढविल्यास आपले संरक्षण करता यावे म्हणून इंग्रजांनी चांगली तयारी केली. आरमारी अधिकाऱ्यांना सज्ज रहाण्याचे हुकूम देण्यात आले. परंतू आपणहून मराठ्यांवर हल्ला करु नये असेही कळविण्यात आले. मात्र मराठ्यांनी आपली जहाजे पळविल्यास ती परत मिळवावी असेही सुचविण्यात आले. तथापी मराठे दुसरीकडेच निघून गेल्याने मुंबईकर इंग्रजांना मराठ्यांशी लढण्याचा प्रसंगच आला नाही.

मराठ्यांच्या वाढत्या आरमारी हालचालीमुळे मुंबईकर इंग्रज रात्रंदिवस तयारीने राहू लागले. डिसेंबर १७०२ मध्ये मराठ्यांनी इंग्रजांचे एक जहाज त्यांच्या कप्तानासह पकडून नेले. ते सर्व सोडून द्यावे म्हणून इंग्रजांनी कान्होजीस विनंती केली. परंतु ५००० रुपये दंड भरल्याशिवाय काहीच परत मिळणार नाही असे कान्होजीने उत्तर दिले. अशा परिस्थितीत कान्होजीच्या या कृत्याचा बदला घ्यावा असे इंग्रजांना वाटत होते. परंतु त्यांच्याकडे मोठे आरमार नसल्याने त्यांनी त्या परिस्थितीत तो अपमान सहन केला.

असे संबंध ताणले गेले असतानाच डिसेंबर १७०३ मध्ये मराठे व इंग्रज यांच्यात मैत्रीचा करार घडून आला. उभयपक्षांनी एकमेकांची पकडलेली जहाजे, माणसे एकमेकांना परत देण्याचे ठरले. तथापी हा करार फार दिवस

टिकला नाही. कारण २ महिन्याच्या अवधीत इंग्रजांची २ जहाजे कान्होजीने पकडून नेली. परिणामी उभयपक्षांचे संबंध पुन्हा दुरावले.

इंग्रजांच्या पत्रव्यवहारावरुन असे दिसते की, ते कान्होजी आंग्र्यास मराठी आरमाराचा प्रमुख असे न मानता ते त्यास मराठी आरमाराचा सरदार समजत होते. पोर्तुगीजांचाही असाच समज होता. परंतु आंग्र्यांच्या आक्रमणाबद्दल ताराबाईकडे पत्रव्यवहार करीत असता किंवा आंग्र्यांशी पत्रव्यवहार करीत असता मात्र त्याला ते मराठी आरमाराचा प्रमुख म्हणूनच लिहीत असत.

वरील संदर्भात वस्तुस्थिती अशी होती की, मराठे राज्याचे मुख्य धोरण ताराबाई कालात त्या स्वत:च ठरवित होत्या.

त्या धोरणाची अंमलबजावणी त्यांचे सरदार करीत होते. समुद्र किनाऱ्यावर आपले शत्रू कोण आणि मित्र कोण याची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यांनी कान्होजीला पूर्ण कृतीस्वातंत्र्य दिले होते. मोघल, सिद्दी पोर्तुगीज आणि इंग्रज या सर्वांना जरब बसविण्याचे व किनाऱ्यावरील मुलखाचे संरक्षण करण्याचे जबाबदारीचे काम ताराबाईंनी कान्होजींवरच सोपविले होते. समुद्र किनाऱ्यावरील सागरी सत्तांचे राजकारण ताराबाई जाणत होत्या. त्यामुळेच जेव्हा इंग्रजांनी ताराबाईकडे कान्होजीविषयी तक्रार करणारी अनेक पत्रे दिली. तेव्हा इंग्रजांना त्यांच्याकडून काही उत्तरच मिळाले नाही. याचा उघड अर्थ असा होतो की ताराबाईंना कान्होजीचे आरमारी धोरण मान्य होते.

## ताराबाई आणि सिद्दी –

सिद्दींचा प्रमुख सिद्दी याकूतखान हा सन १७०४ मध्ये मरण पावला. त्याच्या जागी बादशहाने आपल्या तर्फे माणूस नेमण्याचा प्रयत्न केला. परंतू सल्लागाराने त्याला सल्ला दिला की सिद्दी याकूत याच्या तालमीत तयार झालेले लोकच या डोंगराळ भागाचा आणि रायरीच्या फौजदारी व किल्लेदारी यांचा बंदोबस्त राखू शकतील. समुद्राच्या मक्केच्या यात्रेचे मार्ग तेच सुरक्षित ठेवू शकतील इतरांच्याकडून ते होणार नाही. बादशहाने सल्ला मानला आणि याकूतखानाचा वारस म्हणून सिद्दी अंबर यास नियुक्त केले.[८५]

सिद्दी मुघलांचे इमाने इतबारे सेवा करीत होता. त्याच्या बलदंड जंजिऱ्यामुळे त्याच्या आरमाराचे संरक्षण होत होते. मराठ्यांनी हा जंजिरा घेण्याचा अनेकवेळा प्रयत्न केला. तथापी त्यात त्यांना यश मिळाले नाही. त्यामुळे पश्चिम किनाऱ्यावरील या कट्टर शत्रूचे निर्दालन मराठ्यांना करता आले नाही. मराठी मुलुखावर सिद्दींचे हल्ले होतच राहिले. कोकणात मोहिमा करणाऱ्या मुघलांच्या लष्कराला सिद्दी मदत करीत असे. त्यामुळे कोकणात मुघलांचा तो मोठा सहाय्य करता बनला. काफीखान म्हणतो, सिद्दी याकूतने बादशहाच्या हुकूमाची कधीच अवज्ञा केली नाही. मराठ्यांचा मोड करण्यात आणि समुद्राच्या वाटा सुरक्षित ठेवण्यात त्याने उत्कृष्ट कामगिरी केली. मुघलाची लहान-मोठी जहाजे त्याच्याकडे होती. खुशकीवर आणि दर्यातून तंबी पोहोचविण्यात त्याच्याकडून जी कामगिरी झाली ती इतरांकडून होणे शक्यच नाही असे सर्व समजून होते.[८६]

**मराठे आणि पोर्तुगीज –**

शिवाजी महाराज, छ.संभाजी आणि राजाराम या तिघांच्याही कारकीर्दीत मराठ्यांशी पोर्तुगीजांचे असलेले संबंध फारसे मैत्रीचे नव्हते. शिवाजी महाराजांनी सन १६६७ मध्ये आणि संभाजी महाराजांनी सन १६८३ मध्ये गोव्यावर स्वारी केली होती. तरीही पोर्तुगीज मराठ्यांशी दुटप्पी धोरणाने वागत होते. याचे अनेक दाखले मिळतात. उदा. सन १६९१ मध्ये आपल्या राजास पाठविलेल्या एका पत्रात गोव्याचा व्हाईसराय म्हणतो, ''एके बाजूने आम्ही बादशहाच्या प्रजाजनांना आमच्या राज्यातूनच बाहेर जाण्यास वाट देत आहोत, तर दुसऱ्या बाजूने राजारामाशीही धूर्तपणाने वागत आहोत. अशारितीने बादशहाचे अधिकारी आणि राजाराम या दोघांचाही विश्वास आम्ही संपादन केला आहे. दोघेही आम्हाला मानतात व आम्ही त्याचे मित्र आहोत असे ते समजतात.''[८७]

असे असले तरी मराठ्यांपेक्षा मोघलांचे सामर्थ्य मोठे आहे याची जाणीव पोर्तुगीज सतत ठेवीत आले होते. म्हणून त्यांची कुरापत ते सहसा काढत नसत. उलट मराठे तसेच सावंत या दोघांविरुध्द ते मोघलांना मदत करीत असत. अर्थात याचा अर्थ असा नाही की त्यांना मराठ्यांशी शत्रूत्व हवे होते. मराठ्यांशी गुप्त स्वरुपाची मैत्री असावी असे त्यांना वाटे. परिणामी उत्तरेकडील आपल्या प्रदेशांवरील मराठ्यांचे हल्ले थांबविण्यासाठी त्यांना मराठ्यांशी युध्दबंदीचा करार घडवून आणला. मराठे मैत्रीचा तह करुया असे म्हणत होते. परंतु मोघल बादशहाच्या भितीने पोर्तुगीज मराठ्यांशी उघडपणे मैत्रीचा तह करावयास धजले नाहीत. परंतु पोर्तुगीज मराठा संबंध १७०१ च्या दरम्याने थोडेसे निवळले. उभयपक्षी मैत्रीचा पत्रव्यवहार सुरु झाला. पण याच सुमारास मराठ्यांच्या आरमारातील एक जहाज पोर्तुगीजांची मालकी असलेल्या अंजेदीव बेटाजवळ बुडाले. जहाज आणि त्याच्यावरील सामानसुमान समुद्राच्या तळाशी गेले तरी त्याच्यावरील खलाशी वाचून अंजेदीववर आश्रयासाठी गेले. ही बातमी ताराबाईना समजताच त्यांनी गोव्याच्या व्हाईसरायला त्यांची सुटका करण्याविषयी लिहीले. पोर्तुगीजांनीही मराठी खलाशांची सुटका करुन त्यांना मराठी राज्यात पाठवून दिले. (फेब्रुवारी १७०२)[८८]

लवकरच काही दिवसांनी पोर्तुगीजांचे एक जहाज वाईट हवामानामुळे मालवणच्या बंदरात आश्रयाला गेले. मालवणचा मराठा सुभेदार बुऱ्हाणजी मोहिते याने त्या जहाजास अडकवून ठेवले. मराठ्यांशी असलेल्या आपल्या मैत्रीत अनुसरुन ते लवकर मुक्त करावे असे व्हाईसरायने दोनदा कळविले. बुऱ्हाणजीनेही आपण ते जहाज लवकरच मुक्त करु असे आश्वासन दिले.[८९] परंतु त्याने प्रत्यक्षात तशी काहीही हालचाल केली नाही. बुऱ्हाणजीच्या वर्तनाचा राग येऊन व्हाईसरायने त्यास धमकीचे पत्र लिहिले. शिवाय आपण जर जहाज लवकर सोडले नाही तर ते मिळविण्याचा मार्ग आम्ही स्विकारु, तो मार्ग आपणाला खचितच रुचणार नाही तरी प्रकरण त्या थरापर्यंत जाऊ देऊ नये.

अशाचप्रकारे पोर्तुगीजांची आणखी दोन जहाजे राजापूरच्या बंदरात शिरली होती. ती मात्र मराठ्यांनी मुक्त केली. परंतु मालवणच्या बंदरात असलेले पोर्तुगीजांचे जहाज बुऱ्हाणजी मोहित्याने मुक्त केले नाही. ९ मार्च १७०३ रोजी व्हाईसराय कृष्णाजी अनंत यास लिहीतो, ''सिंधुदुर्ग किल्ल्यातील मराठ्यांच्या सैनिकांनी आमचे जहाज पकडून

दोन पाद्री आणि इतर चार लोक यांना किल्ल्यात कैद करुन ठेवले आहे. एके ठिकाणी आमचे आणि तुमचे संबंध चांगले आहेत. तर दुसरीकडे ते शत्रूत्वाचे आहेत हे असे काय त्याचा उलगडा होत नाही. मला आपणाकडून या गोष्टीचा खुलासा हवा आहे म्हणजे मलाही माझ्या बुध्दीप्रमाणे वागता येईल.'' [९०]

पोर्तुगीजांच्या म्हणण्याप्रमाणे सर्व मराठे अंमलदार त्यांच्याशी स्नेहाने वागत असता बुऱ्हाणजीच असा का वागत होता किंवा तो खरोखरीच मराठी राज्याच्या पोर्तुगीजांशी असलेल्या धोरणाविरुध्द वर्तन करीत होता की काय याचा उलगडा होत नाही. पोर्तुगीज जहाजांनी मराठ्यांचा परवाना घेतला पाहिजे ही त्याची मागणी त्याच्या वर्तनाच्या बुडाशी असावी असे वाटते.

सन १७०२ च्या ऐन पावसाळ्यात हिंदूराव घोरपड्यांनी कोकणात उतरुन भिमगडावर हल्ला चढविला आणि तेथील हवालदार आणि इतर अधिकारी यांना कैद केले. हिंदूरावाच्या या स्वारीने पोर्तुगीज साशंक झाले परंतु त्यांना कोणताच त्रास न देता हिंदुराव परत फिरला. [९१]

ऑक्टोबर १७०२ मध्ये मराठ्यांनी फोंड्यावर स्वारी केली. या स्वारीत हिंदूराव घोरपडे आणि कृष्णाजी अनंत हे सरदार असावेत. फोंडा हा गाव व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश जिंकून त्यांनी फोंड्याच्या किल्ल्यास वेढा दिला. तेव्हा पोर्तुगीजांनी फोंड्याच्या किल्लेदाराकडे कुमक पाठवावी म्हणून बेळगावचा सुभेदार सईफखान याने पोर्तुगीज व्हाईसरायला विनंती केली. परंतु शत्रू सुसज्ज व संख्येने मोठा असून त्याने सर्व रस्ते रोखून धरले आहेत या सबबीवर व्हाईसरायने फोंड्याकडे कुमक पाठविण्यास नकार दिला. तथापी मोंगलांशी शत्रूत्व नको म्हणून फोंड्याकडे थोडासा दारुगोळाही त्याने पाठवून दिला. [९२]

फोंडा महाल गोव्याच्या जवळ असल्याने त्या ठिकाणी मुघलांच्या ऐवजी मराठ्यांची राजवट आली तर ती पोर्तुगीजांना हवीच होती. मराठ्यांनी फोंडे महाल काबीज केल्यावर पोर्तुगीजांशी शांततेचे संबंध ठेवण्याची त्यांनी इच्छा प्रदर्शित केली होती. त्यासंबंधी व्हाईसराय पोर्तुगालच्या राजास लिहीतो की, शिवाजीराजे (ताराबाई) यांनीही फोंडे घेतल्यावर पत्र पाठवून आपल्या वाडवडिलांप्रमाणे आमच्याशी शांततेचे संबंध ठेवण्याची इच्छा प्रदर्शित केली. याबाबतीत मी राज्य सल्लागारांचे म्हणणे ऐकून घेऊन शिवाजीराजे यांना उत्तर पाठविले. त्यांना मी कळविले की त्यांना जर आमच्याशी खरेखुरे मैत्रीचे संबंध ठेवायचे असतील तर मीही तशी मैत्री ठेवीन. कारण मैत्रीचे संबंध ठेवण्यासाठी दोनीही बाजूंनी इच्छा असावी लागते. महाराजांच्या हितसंबंधांना बाधा न येता व नवीन तह न होता जुन्या तहानुसार शिवाजीशी जर आमचे मैत्रीचे संबंध जुळत असतील तर तेआमच्या फायद्याचे आहेत. कारण मोघलांनी मराठ्यांची जी ठाणी घेतली होती ती त्यांनी परत घेण्यास प्रारंभ केला आहे. या पत्रावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की पोर्तुगीजांना यावेळेस मराठ्यांशी खरोखरच मैत्रीचे संबंध हवे होते. त्याचबरोबर मराठ्यांनाहीउगीचच कुरापत काढण्याची इच्छा नव्हती.

फोंडा महाल काबीज झाला तरी मराठ्यांना फोंड्याचा किल्ला घेता आला नाही. फोंड्याच्या मोगल किल्लेदाराने पोर्तुगीज आणि खेमसावंत दोघांनाही मदतीस बोलाविले. खेमसावंत आपले सैन्य घेऊन मोगलांच्या मदतीला गेला

आणि स्वत:च किल्ला गमावून बसला. खरे म्हणजे मुघलांच्या मदतीस जाण्यासाठी सावंताला पोर्तुगीजांनीच अंतस्थ प्रोत्साहन दिले होते. सावंतांशी पोर्तुगीजांशी संबंध बिनसल्यावर या कृत्याविषयी पोर्तुगीज व्हाईसराय निराळेच विधान करु लागला. २८ सप्टेंबर १७०३ रोजी हिंदूराव घोरपड्याला लिहीलेल्या पत्रात तो म्हणतो, ''खेमसावंत हा एक बदमाष माणूस आहे. त्याला नेस्तनाबूत करण्याच्या कामात जर आपणास मदत हवी असेल तर ती मी देण्यास तयार आहे.''[९३]

याच सुमारास खेमसावंतांच्या ताब्यात कुडाळ. पेडणे, डिचोली, साखळी आणि मणेरी हे पांच महाल आले होते. त्यांनी आपले आरमार उभारुन समुद्रावरही चाचेगिरी सुरु केली होती. पोर्तुगीज जहाजावरही त्याने हल्ले करण्याचे धाडस दाखविल्याने पोर्तुगीजांना त्याचा बंदोबस्त करणे त्यांचा निकडीचे झाले होते. त्यांनी सावंताच्या ताब्यात असणाऱ्या डिचोली किल्ल्यावर मोहीम काढून किल्ला काबीज केला. हा किल्ला हे देसाई अथवा मराठे यांच्या ताब्यात जाऊ नये म्हणून राज्य सल्लागार मंडळाच्या शिफारशीनुसार व्हाईसरायने तो जमिनदोस्त करुन टाकला. ह्या संदर्भात सुप्रसिध्द इतिहास संशोधक पांडुरंगराव पिसुर्लेकर म्हणतात, ''डिसेंबरमध्ये खेमसावंत याचा डिचोलीचा किल्ला विजरयीने जिंकून घेवून मोडून टाकला. डिचोलीमध्ये व त्या शहरापासून ३ कोसपर्यंत त्याने जाळपोळ केली. डिचोली येथे आपण एकसुध्दा इमारत ठेवली नाही अशी त्याने फुशारकी मारली. कायतानो डि मेलू दि कायस्त्रू याने लिहिले आहे की, खेमसावंत हा प्रतिशिवाजी होवू नये याकरिता त्याचे अशारितीने आपणास गर्वहरण करावे लागले.[९४]

या युध्दात मराठे खेमसावंताविरुध्द मोहीम काढण्याची भाषा काढत होते. परंतु प्रत्यक्षात काहीच हालचाल करीत नव्हते. कारण सावंताने ताराबाईशी स्नेह जमवून त्यांची पोर्तुगीजांविरुध्द मदत मिळविली होती.

पोर्तुगीज दफ्तरात शिवाजीराजे (ताराबाई) रामचंद्रपंत अमात्य, हिंदूराव घोरपडे, कृष्णाजी अनंत, बुऱ्हाणजी मोहिते, कान्होजी आंग्रे इ. लिहीलेली पत्रे आढळतात. त्यावरुन पश्चिम किनाऱ्यावरील मराठ्यांच्या आरमारात कान्होजी आंग्रे, दाऊतखान आणि बुऱ्हाणजी मोहिते हे तीन मोठे आरमारी अधिकारी असल्याचे स्पष्ट होते. बुऱ्हाणजी मोहित्याशी पोर्तुगीजांचे फारसे पटले नाही. तथापी कान्होजी आणि दाऊतखान यांच्याशी मात्र त्यांचे संबंध बरे होते असे दिसते.

इ.स.१७०४ मध्ये मराठा पोर्तुगीज संबंधात एक मानापमानाचे प्रकरण उपस्थित झाले. पोर्तुगीजांनी आपला वकील छत्रपतींकडे का पाठविला नाही याबद्दल रामचंद्रपंत अमात्य आणि बुऱ्हाणजी मोहिते या दोघांनी विचारणा केल्यावर व्हाईसरायने लिहीले की आपण गोव्याचा व्हाईसराय म्हणून आलो असता शेजारच्या सर्व राजेरजवाड्यांनी पत्र पाठवून आपले स्वागत केले. तसे मराठ्यांच्या राजाने केले नाही. म्हणून आपण मराठ्यांकडे आपला वकील पाठविला नाही. तो पुढे म्हणतो की झाली ही गोष्ट बरीच झाली. कारण पोर्तुगीज वकील मराठ्यांच्या दरबारात आला असता तर मुघल बादशहाला मराठा-पोर्तुगीज मैत्रीचा सुगावा लागला असता.[९५]

गोव्याच्या व्हाईसरायने आपल्या राजास लिहीलेल्या व राजाने त्यास धाडलेल्या पत्रातून पोर्तुगीजांची एतद्देषीय सत्तांविषयीची प्रामाणिक मते दिसून येतात. १० जानेवारी १७०४ च्या व्हाईसरायला लिहीलेल्या पत्रात पोर्तुगलचा

राजा म्हणतो मुघल व मराठे या दोघांनाही मदत देण्याचे जे धोरण त्यांनी (व्हाईसरायने) अवलंबिले आहे. ते बरोबर आहे. परंतू मुघलांना हे कळू न देण्याचे दक्षता घेतली पाहिजे. कारण मोगल बादशहा हा आशिया खंडातील बलाढ्य राजा असून तो नाराज होईल असे कोणतेच कृत्य आपल्या हातून घडून देता कामा नये. मराठ्यांशी चालू असलेली शांतता त्याबद्दलची वाच्यता न करता जितके दिवस चालू ठेवता येईल तितके दिवस चालू ठेवावे.

पोर्तुगीज मोगलांना अंतस्थ मदत करीत असले तरी मराठ्यांशी पत्रव्यवहार करीत असता ते पोर्तुगीज मराठा मैत्रीस उजाळा देण्याची भाषा करीत असत. बऱ्याचवेळा ते मराठ्यांच्या आरमारी अधिकाऱ्यांच्या हल्ल्याबद्दल तक्रार करताना दिसतात. ३ ऑक्टोबर १७०५ च्या ताराबाईंना लिहीलेल्या पत्रात व्हाईसराय म्हणतो, शिवाजीराजे यांस आपले वडील आणि आजोबा या दोघांशी आमची मैत्री होती. ती लक्षात घेऊन आमच्याशी मैत्रीचे संबंध ठेवण्याची आपली इच्छा आहे. ही मैत्री प्रस्थापित होण्याच्या मार्गात माझ्याकडून तरी अडथळा येणार नाही. अडथळा येतो तो मेलुंडीच्या किल्ल्यातील व खांदेरी-उंदेरी बेटातील अधिकाऱ्यांकडून. त्यांचे वर्तन जवळजवळ चाच्यांसारखे असते. आमच्या राज्याच्या प्रजाजनांची त्यांनी फार हानी केली आहे. हे प्रकार बंद झाल्याखेरीज आमच्या दोन्ही राज्यांमधील जुनीमैत्री प्रस्थापित होणार नाही व आमची बंदरे सुरक्षित होणार नाहीत.[९६]

मुघल बादशहाच्या मृत्यूनंतर मराठे आणि पोर्तुगीज यांच्यात मैत्रीच्या वाटाघाटी सुरु झाल्या. आवश्यक ते अधिकार देऊन आपण आपला वकील गोव्यास पाठवावा असेही व्हाईसरायने ताराबाईला कळविले होते.

अशाप्रकारे ताराबाई कालात मराठी सत्तेचे पश्चिम किनाऱ्यावरील आरमारी आणि व्यापारी सत्तांशी संबंध राहिले. इंग्रजांच्या हालचालींचा उद्देश प्रामुख्याने व्यापारी होता. तर पोर्तुगीजांचा राजकीय. इंग्रज आणि पोर्तुगीज दोघांनाही एतद्देशीय सत्तांशी मैत्री हवी होती. तर मुघल सम्राट औरंगजेबाशी शत्रूत्व नको होते. तसेच त्यांचेशी वारंवार संबंध येणारे मराठेही त्यांचे शत्रू बनणे त्यांच्या दृष्टीने हिताचे नव्हते. थोडक्यात म्हणजे परकीय सत्तांचे पश्चिम किनाऱ्यावरील राजकारण म्हणजे तारेवरील कसरत होती. ते मुघल आणि मराठे यांचेशी वागताना दुटप्पी धोरणाने वागत होते. तसे त्यांनी धोरण स्वीकारणेही अपरिहार्य होते. कारण मोघल किंवा मराठे यांच्यापैकी एका कोणाचीच बाजू त्यांनी सातत्याने घेतली असती तर पश्चिम किनाऱ्यावरील त्यांचे अस्तित्व टिकवून धरणे त्यांनाच अशक्य झाले असते. ते अर्थातच त्यांना परवडण्यासारखे नव्हते.

**<u>छत्रपती शाहू – बाळाजी विश्वनाथ – कान्होजी आंग्रे आणि पश्चिम किनारपट्टी –</u>**

छ.शाहू मुघलांच्या कैदेतून सुटून महाराष्ट्रात आल्यानंतर आणि रांगण्याच्या वेढ्यात यशस्वी झाल्यानंतर त्याने कोकण आणि कर्नाटक ताब्यात आणण्याचा विचार केला. पन्हाळ्यालाच असताना छ.शाहूने कर्नाटकातील सर्व पाळेदारांना पत्रे लिहून आपली सत्ता मानण्याचे आवाहन केले. ताराबाईच्या पाडावाकरीता शाहूने इंग्रजांकडे मदतीची विनंती केली. परंतु ती त्यांनी नाकारली.[९७]

४ नोव्हेंबर १७०८ रोजी धनाजी जाधव मृत्यू पावला. शाहूने त्याचा मुलगा चंद्रसेन जाधव याला सेनापती

पदावर नेमले. पण त्याचे मन शाहूकडे रहावे की ताराबाईकडे जावे असे दोलायामान झाले. अशा स्थितीत छ.शाहूला वाटू लागले की वारणेच्या पश्चिमेकडील सर्व मुलूख ताराबाईच्या स्वामीत्वाखाली सोडावा. त्याप्रमाणे महाराजांनी वारेणच्या पलीकडील प्रदेशातील आपल्या सैन्यास परत बोलाविले. शाहू महाराजांच्या या बदललेल्या धोरणाचा ताराबाईने फायदा घेतला. महाराजांनी आपल्या निर्णयानुसार पन्हाळा सोडला हे पाहून १७०८ च्या अखेरीस ताराबाई मालवणहून परतल्या आणि त्यांनी विशाळगड ताब्यात आणला. ताराबाईचे सल्लागार रामचंद्रपंत यांनी ताराबाईने कोल्हापूरास राजधानी करावी व शाहूने सोडलेल्या मुलखाचा बंदोबस्त करावा असे त्यांना पटवून दिले. ताराबाईला ते पटले आणि त्यांनी कोल्हापूरला आपली राजधानी केली.

ताराबाईने कोल्हापूरास गादी स्थापन केल्यावर वाडीकर सावंतांवर आपली वक्रदृष्टी फिरविली. सावंतांनी शाहूचा पक्ष घेतला. तर राणीने त्याला आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न केला व त्याचबरोबर त्याला वठणीवर आणण्यासाठी रामचंद्रपंतास पाठविले. पंतांनी लढाई करुन आपणांस हव्या तशा अटी त्याच्याकडून कबूल करुन घेतल्या. तर त्याचवेळेस शाहू महाराजांनी ताराबाईच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी परसोजी भोसल्यास पाठविले होते. परंतू त्यांनी त्याला ताबडतोब बोलावूनही घेतले.

अशा परिस्थितीत पश्चिम किनाऱ्याचे रक्षण विशेषत: कान्होजी आंग्रे याने केले. मराठ्यांच्या इतिहासात त्याचे कार्य विशेष महत्वाचे मानले जाते.

**<u>कान्होजी आंग्रे -</u>**

१६९८ मध्येच राजारामाने कान्होजीस सरखेल हा किताब दिला. त्यानंतर कान्होजीने पश्चिम किनारा रक्षणासाठी चांगलीच मेहनत केली. सुमारे २५ वर्षेपर्यंत ५ सामुद्रीकांशी निकराने लढून जे आरमारी विजय संपादिले ते इतिहासात विशेष स्मरणीय बनले असे जे रियासतकार म्हणतात[१००] ते योग्य होय. कारण पश्चिम किनाऱ्यावरील प्रत्येक सत्ताधीश स्वत:ला स्वतंत्र मानून कोणाचे नियंत्रण पाळीत नसे. मराठे आपणास शिवाजीच्या स्वराज्याचे मालक समजून इतरांवर अधिराज्य गाजवीत.

मुंबईचे इंग्रज नाविक सत्तेच्या जोरावर आंग्र्यांना विरोध करीत. पोर्तुगीजांची सत्ता खालावल्यामुळे ते कोणाशी तरी स्नेह जोडण्याचा प्रयत्न करीत. अशा परिस्थितीत पश्चिम किनाऱ्यावरील सर्व सत्ताधीशांना अंकीत बनविण्याचा उद्योग कान्होजीने चालवला आणि किनाऱ्याने संचार करणाऱ्या सर्व जहाजांवर व व्यापारी मालावर जकात घेण्याचा रिवाज पाडला. त्यासाठी प्रत्येक जहाजाने पैसे भरुन आपला परवाना घ्यावा असे त्याने ठरविले. तेव्हा त्याचा इंग्रजांशी तंटा स्वाभावीकच घडून आला. इंग्रज म्हणत आम्ही दर्याचे मालक आम्हीच सर्वांना परवाने देवू तर आंग्रे म्हणत आम्ही पश्चिम किनाऱ्याचे रखवालदार आमचे परवाने जो कोणी घेणार नाहीत त्यास आम्ही बेलाशक लुटून घेवू. इ.स.१७१२ च्या सुमारास[१०१] पोर्तुगीज आणि इंग्रज या दोघांशीही कान्होजीचा झगडा सुरु होवून त्याने त्यांची पुष्कळ जहाजे पकडून लुटली आणि भलीमोठी पैदास केली. पुढे बाळी विश्वनाथ आणि आंग्रे यांचा सन्मान्य समेट

घडून आल्यानंतर तर कान्होजीने छ.शाहू आणि पर्यायाने मराठी राज्य यांचे पश्चिम किनाऱ्यावर चांगलेच संरक्षण केले.

बाळाजी विश्वनाथाशी आणि पर्यायाने छ.शाहूशी समेट घडून आल्यानंतर कान्होजीने त्याद्वारे आपली आपल्या घराण्याची व मराठी आरमाराची मजबुती करुन घेतली. त्याच्या उद्योगाला एकंदर राज्याचा पाठिंबा मिळून सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज अशा सर्वांना कब्जात ठेवण्याचे सामर्थ्य त्याला प्राप्त झाले. इंग्रज त्याला दर्यावरील चोर असे संबोधित.

आंग्रे आणि सिद्दी यांचा कलह नेहमीचाच होता. राजपुरी खाडीच्या मुखावर पद्मदुर्ग किल्ला आहे त्याचा कब्जा घेवून सिद्दीने त्याची किल्ली १७१० मध्ये बादशहाला नजर केली. बादशहाने त्याचा गौरव केला. पुढे २-३ वर्षे सिद्दीला पोशाख पाठवून उत्तेजनही दिले, असे सरदेसाई लिहीतात. इ.स.१७१३ त कान्होजी शाहूवर चढाई करीत असताच सिद्दी याकूतने सुवर्णदुर्ग किल्ला जिंकला.

पण आंग्र्याला पेशव्यांचे सहाय्य मिळताच त्याने सिद्दीवर चढाई करुन सुवर्णदुर्ग आणि इत्तर स्थळे परत घेतली. त्याचबरोबर सिद्दीने शरण येवून पेशव्यांशी तहही केला आणि हे प्रकरण तात्पुरते मिटले. [१०२]

**<u>आंग्रे आणि इंग्रज युध्द –</u>**

आंग्रे आणि पेशवे समेट घडून आल्यावर मराठी राज्याची पश्चिम हद्द निश्चित व निर्धास्त होवून त्यास एका बाजूस भरीव आकार प्राप्त झाला व दुसऱ्या बाजूस आंग्र्यांचा कर्तव्यभाग स्पष्ट झाला. मराठी राज्याच्या पश्चिम किनाऱ्याची जबाबदारी आंग्र्यांकडे आली. हा किनारा सुरतपासून कारवारपर्यंत व्यापारी दृष्टीने आंग्र्यांच्या कक्षेत आला आणि मुंबईजवळील खांदेरीपासून विंगुर्ल्याजवळील यशवंतगड एवढा भाग तर प्रत्यक्ष त्याच्या मालकीचा बनला. या टापूतील बंदरे, खाड्या व जलदुर्ग यांजवर आंग्र्यांची सत्ता कायम बसली. कुलाबा आणि विजयदुर्ग ही मुख्य तटबंदीची स्थळे त्याचीअसून इतरांवर त्याचा शह चालू झाला. २० वर्षे खपून जे आरमार सिध्द केले त्याचा खरा उपयोग व्यापार व सत्ता वाढविण्याकडे त्याला करता आला. या आरमारात ३०/४० तोफांवर असलेली अनेक प्रचंड जहाजे असून त्यावर शूर आणि प्रविण दर्यावर्दी खलाशी धन्याचे हुकूम ताबडतोब उठविणारे जय्यत असल्यामुळे कान्होजी आंग्रे हा शत्रूंना कर्दनकाळ वाटू लागला. असे असले तरी इंग्रजांशी कलह वाढविण्याची कान्होजीची इच्छा नव्हती. बाळाजी विश्वनाथाशी समेट केल्याबरोबर इंग्रजांशी सख्य जोडण्याचे हेतूने त्यांचे वकील त्याने कुलाब्यास बोलावून कलह मिटविण्याचा प्रयत्न केला. समुद्रावर संचार करणाऱ्या व्यापारी जहाजांनी आपली दस्तके घेतली पाहिजेत तशा लेखी परवानगीशिवाय संचार केल्यास आपण लुटून जप्त करु अशी वहिवाट मराठी राज्याचा हक्क म्हणून कैक वर्षापासून आंग्र्यांनी आपल्या टापूत सुरु केले होते. त्याचे उलट इंग्रजांनी आपले ठाणे सुरु केल्यापासून त्यांच्या बंदरात जा-ये करणाऱ्या जहाजांवर त्यांनीआपली दस्तके लागू केली. अर्थात पश्चिम दर्याचे मालक कोण इंग्रज की आंग्रे हा वादाचा विषय असल्याने त्याचा निकाल बळी तो कान पिळी या न्यायाने लागत असे. इंग्रजांच्या वकीलांनी कुलाब्यास येऊन कान्होजीशी समेट ठरविला तो असा की इंग्रजांच्या खास जहाजांना कान्होजीने आपल्या बंदरात

उपद्रव देवू नये तसेच मुंबईच्या बंदरात खांदेरीपासून माहीमपर्यंतच्या टापूत आंग्र्यांची जहाजे जातील त्याला इंग्रजांनी अटकाव करु नये. एकमेकांनी एकमेकांच्या बंदरात जकात भरावी आंग्र्यांशिवाय कोणी मराठे सरदार इंग्रजांना उपद्रव देतील तर त्याचा बंदोबस्त आंग्र्यांनी करावा. [१०३]

हा ठराव अत्यंत मोघम होता. खुद्द इंग्रजांच्या व्यापारी जहाजांना आंग्र्यांनी कधीच अटकाव केला नाही. पण इंग्रजांच्या आश्रयाखाली वावरणारे सिद्दी व दुसरे अनेक व्यापारी इंग्रजांची दस्तके घेऊन आंग्र्यांची जकात चुकवीत. तो प्रकार त्याला मान्य नव्हता. युरोपातून आणलेल्या मालाची विक्री करणे व किनाऱ्याने चालणाऱ्या एतद्देशीय मालाचा व्यापार करणे यात मोठा फरक होता. हिंदी व्यापाऱ्यावर इंग्रज आपला ताबा बसवू लागले तो प्रकार आंग्र्यांना मानवला नाही. त्याचा मुख्य शत्रू व शेजारी जंजीरेकर सिद्दी इंग्रजांच्या कच्छपी लागून चढाई करी. त्याला कान्होजीने विरोध केला. इंग्रजांशी सख्य जोडून त्याने सिद्दीचाच समाचार घेतला.

पण इंग्रजांचा समेट हा निश्चित नव्हता. २६ डिसेंबर १७१५ रोजी चार्ल्स बून हा उपद्व्यापी गृहस्थ मुंबईच्या गव्हर्नर पदावर दाखल होताच इंग्रजांचे उग्र स्वरुप कान्होजीला जाणवू लागले.

पश्चिम किनाऱ्यावर आमच्या अनिरुध्द संचारास अडथळा करेल त्याची मी खोडकीच जिरवणार असा त्याने निश्चय जाहीर केला. २ वर्षाच्या आत ९ उत्कृष्ट लढाऊ जहाजे त्याने मुंबईच्या बंदरात तयार केली. त्या सर्वांवर मिळून १४८ तोफा व १२५० लढाऊ खलाशी होते. याशिवाय जमिनीवरुन लढण्यासाठी २५०० युरोपीयन व १५०० एतद्देशीय एवढी फौज मुद्दाम विजयदुर्ग वगैरेआंग्र्यांचे किल्ले पाडाव करण्यासाठी इंग्रजांनी तयार केले. कुलाब्याची दहशत इंग्रजांना तितकीशी नव्हती. पण विजयदुर्गास आंग्र्यांची जामियत प्रचंड असून तेथून सर्व किनाऱ्यावर आंग्र्यांला नाविक सत्ता गाजविता येत असे. ही चाचेगीरी साफ बंद पाडण्याचा निश्चय गव्हर्नर बूनने जाहीर केला. अशा परिस्थितीत १७ एप्रिल १७१८ रोजी इंग्रज आणि कान्होजी यांचे विजयदुर्गवर युध्द झाले. इंग्रजांचे २०० लोक मृत्यू पावले तर ३०० जखमी झाले आणि कान्होजी विजयी ठरला. अपयश पदरात घेवून इंग्रजांना मुंबईस परतावे लागले. [१०४]

परंतु या पराभवाचा वचपा घेण्यासाठी इंग्रजांनी २ नोव्हेंबर १७१८ रोजी आपल्या जंगी आरमारासह खांदेरीवर चाल केली. तेथे इंग्रजांचा इलाज चालला नाही. २४ नोव्हेंबर रोजी ते परत मुंबईला गेली. परंतू इंग्रजांनी विजयदुर्ग काबीज करण्याचा नाद सोडला नाही. १९ सप्टेंबर १७१९ रोजी इंग्रजांचे एक आरमार जय्यत तयारीनिशी त्या किल्ल्यावर चालून गेले. त्यानी आंग्र्यांची कित्येक जहाजे बुडविली. पण विजयदुर्ग त्याला धक्का लावताआला नाही. इंग्रजांचे आरमार लुटले गेले आणि पुन्हा त्यांना मुंबईस हात हलवीत जावे लागले. अशारितीने आपल्या एकट्याच्या आतून आंग्र्यांना वठणीवर आणता येत नाही हे पाहून मुंबईकरांनी गोवेकर पोर्तुगीजांशी वाटाघाटी करुन दोघांनी मिळून कुलाब्यावर स्वारी करण्याचा ठराव केला (२० ऑगस्ट १७२१) आंग्र्यांचा पाडाव केल्यावर कुलाबा पोर्तुगीजांनी व विजयदुर्ग इंग्रजांनी घ्यावा आणि उभयतांनी चौल येथे जमून तेथून एकदम कुलाब्यावर चढाई करावी असे ठरले. [१०५]

वरील तहाची माहिती कान्होजीला लागल्याने त्याने युध्दाची तयारी करुन छत्रपतींकडे मदतही मागितली.

२९ नोव्हेंबर १७२१ रोजी पोर्तुगीज आणि इंग्रज युध्दनौका चौल येथे एकत्र आल्या. उभयंतांच्या मिळून ६००० कसलेले खलाशी आंग्र्यांवर चढाई करण्यास सिध्द झाले.[१०६] इकडे शाहूने पिलाजी जाधवास व बाजीराव यास निकडीचे हुकूम पाठवून आंग्र्यांस सहाय्य करण्यास रवाना केले.[१०७] खुशकीकडून असा भयंकर हल्ला युरोपीयन नाविकांवर येवून त्याचा प्रतिकार करण्याचे साधन हाती नसल्याने त्यांची त्रेधा उडाली. १२ डिसेंबर १७२१ रोजी कुलाब्यावर हल्ला चढविला त्या प्रसंगात इंग्रजांचा नौकापती मॅथ्युज याला मराठ्यांनी जखमी केले. त्या पाठोपाठ बाजीरावाने त्वेषाची हातघाई केली त्यामुळे इंग्रज पळून गेले. त्यांचा तोफा व दारुगोळा मराठ्यांच्या हाती पडला. या पराभवामुळे इंग्रज आणि पोर्तुगीज यांचे वाकडे आले. या संधीचा फायदा घेवून बाजीरावाने पोर्तुगीजांशी स्वतंत्र तह केला व त्याने इंग्रजांपासून अलग केले. या युध्दातील यशाविषयी सरदेसाई म्हणतात, लढाई आणि राजकारण या दोनही कामात बाजीरावास पहिला बहुमोल अनुभव या प्रसंगात प्राप्त झाला.

यानंतर इंग्रजांचा जोर अगदीच थंडावला. कान्होजीलाही युध्द नको होते. त्याने समेटाचे बोलणे चालू केले. गव्हर्नर बून कारभार सोडून गेला. त्याचे जागी फिप्सची नेमणूक झाली. त्याने फिप्सला १७२४ मध्ये समजुतीचे पत्र लिहीले. त्यावर फिप्सचा जबाब मात्र उद्दामपणाचा आला. त्यामुळे त्यानंतर आंग्रे आणि इंग्रज या दोन सत्तात काही हर्षामर्षाचे प्रसंग घडले. परंतू एकूण इंग्रजांचे धोरण धूर्तपणाचे होते. आंग्रे आपणास निष्कारण जाच करतो म्हणून त्याचा प्रतिकार करणे आपल्या ओघास येते बाकी पेशव्यांशी अगर शाहूशी आपला विरोध नाही ही गोष्ट पत्रव्यवहाराने किंवा वकीलांचे मार्फत इंग्रज अधिकारी मुद्दाम पेशव्यांना वेळोवेळी कळविण्याची खबरदारी घेत असत.

अशाप्रकारे पश्चिम किनाऱ्यावर कान्होजीने आपली आणि पर्यायाने मराठ्यांचे सत्ता राखली. कान्होजीच्या पदरी शंकरोजी मोहिते, राणोजी गोळे, खंडोजी नाळकर, रोमाजीराव खराडे, कृष्णाजी मोड, हसनखान जमादार इ. मातब्बर सरदार जमा झाले होते. त्यांनी युध्दप्रसंग व श्रमसाहस करुन कोकणातील राज्य राखले याबद्दल शाहूने त्यांना पालखी आणि इनाम गाव देवून त्यांचा संतोष केला. ७ जुलै १७२९ रोजी कान्होजी मरण पावला. तोपर्यंत पाश्चात्यांचा इलाज पश्चिम किनाऱ्यावर काही चालला नाही हेच कान्होजीचे मोठे यश होय.

**<u>औरंगजेब बादशहाचा मृत्यू –</u>**

इ.स.१७०३ पासून मराठ्यांचा संचार झपाट्याने सुरु झाला. सुरत, बऱ्हाणपूर, वऱ्हाड, माळवा वगैरे ठिकाणी त्यांचा जोर इतका वाढला की, त्या बाजूने बादशहाला येणारी पैशांची व माणसांची मदत साफ बंद झाली. मराठे सर्वत्र दांडगाई करत होते. एक टोळी दिल्लीवर, तर दुसरी बंगाल्यात, ओरिसा, डाक्का, राजमहालकडे, तिसरी कर्नाटककडे तर चवथी सुरतेवर. इ.स.१७०६ मध्ये त्यांनी सुरत, भडोच गणदेवी लुटले. १७०६ मध्ये अशी अवस्था होती की कोणत्या मुलखात ते (मराठे) नाहीत अशी जागा नव्हती. एकूण काय तर बादशहाचे वय झाले होते. शिवाजीनंतर स्वराज्य संपले आता आपल्याला दक्षिणेत जावून मराठ्यांना जिंकणे अवघड नाही असे समजून तो दक्षिणेत आला आणि परत उत्तरेत जाऊच शकला नाही. मराठे संपले नाहीत उलट दिवसेंदिवस प्रबळ होत गेले, हे सगळे बादशहा

आपल्या डोळ्यांनी पहात होता. आणि अशा परिस्थितीत २०-२-१७०७ रोजी त्याने आपला देह ठेवला. खाफिखान लिहीतो या काळात पृथ्वीवर ही एक मोठी क्रांतीच झाली.[१०८]

**मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामाची समाप्ती –**

औरंगजेबाच्या मृत्यूबरोबरच मुघल मराठ्यांमध्ये पाव शतकापासून चालणारे हे प्रतिष्ठेचे युध्द संपले. हे युध्द म्हणजे मराठ्यांच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या संग्रामात त्यांच्याकडे शिवाजीसारखा अद्वितीय पुढारी नव्हता की उत्तम शस्त्रास्त्रे अथवा पुरेसे द्रव्य देखील नव्हते. परंतु शिवाजीच्या उच्च ध्येयामुळे प्रेरित झालेल्या राजाराम, ताराबाई, रामचंद्र पंत अमात्य, संताजी, धनाजी, प्रल्हाद निराजी, खंडोबल्लाळ चिटणीस, शंकराजी नल्हार सचिव, परशुराम पंत प्रतिनिधी इ. लोकांनी आसन्न मरण स्थितीत असलेली मराठेशाही सावरुन धरली. न्या.म.गो.रानडे लिहीतात, ''केवळ लुटारु व दरोडेखोर या युध्दात कधीही विजयी होऊ शकले नसते. मराठ्यांनी या युध्दात उच्च दर्जाचे शौर्य, परिश्रम, शासन कौशल्य, अदम्य आशावाद, अढळ विश्वास, बंधुत्वाची भावना व आत्मत्याग इ. श्रेष्ठ गुणांचा परिचय करुन दिला होता. त्यामुळे स्वातंत्र्य संग्रामाचा हा काळ महाराष्ट्राच्या इतिहासात अत्यंत गौरवशाली व ऐश्वर्याचा काळ समजला जातो.''[१०९]

पगडी लिहीतात, ''इ.स.१६८० ते १७०७ या काळातील मराठ्यांचा पराक्रम वेगळ्या स्वरुपाचा होता. औरंगजेब हा स्वराज्यात घुसला होता. सगळी साधनसामग्री त्याच्या बरोबर होती. सतत २५ वर्षे तो येथे आघात करत होता. मराठे त्याच्याशी नेटाने लढत होते. शेवटी युध्दात मोगलांना माघार घ्यावी लागली.''[११०]

रियासतकार देसाई मराठी राज्याचा विस्तार पुढे जो झाला त्याला वरील स्वातंत्र्य युध्द कारणीभूत झाल्याचे म्हटले आहे.[१११] हे सर्व मान्य करुनही हेही स्पष्टपणे म्हटले पाहिजे की, याच काळात वतनदारी फोफावली. राज्यापेक्षा वतनासाठी लोक पुढे आले. त्यांनी पराक्रम गाजविला तो राष्ट्रासाठी नसून वतनासाठी. अर्थात तरीही त्यामुळे मुसलमानांना आळा बसला व हिंदू आणि हिंदूंच्या स्त्रिया, मंदीरे इ. सुरक्षित राहिले हाही मोठाच फायदा म्हटला पाहिजे.

**ताराबाईच्या कार्याचे मूल्यमापन –**

मराठ्यांच्या नव्या राजधानीस सातार्‍यास औरंगजेबाचा वेढा बसला असता सिंहगडावर मराठ्यांचे छत्रपती राजाराम महाराज मृत्यू पावले आणि सर्व मराठी राज्य दु:खात बुडून गेले. स्वातंत्र्य युध्दाच्या काळातील संभाजी महाराजांच्या वधानंतर मराठी राज्याला बसलेला हा दुसरा हादरा होता. पण महाराणी ताराबाई अशा संकटमय परिस्थितीत पुढे आली. तिने पदर खोवला. राज्यसूत्रे आणि तरवार हाती घेऊन औरंगजेबाचे लष्करी आव्हान तिने स्विकारले व एका लहानशा राज्याची पंचवीस वर्षांची एक विधवा राणी मोगल पातशाहीशी लष्करी संघर्ष करण्यास उभी ठाकते आणि सतत सात वर्षे तो संघर्ष चालवून त्यास जेरीस आणते, ही आपल्या इतिहासातील एक असामान्य घटना होय. औरंगजेबाशी एकच निर्णायक लढा न देता त्या गनिमी काव्याचा उपयोग करुन त्यांनी त्याला अगतिक

करुन टाकले.

त्यांनी आपल्या सात वर्षाच्या काळात जो पत्रव्यवहार केला त्यातून त्याचा आत्मविश्वास दिसून येतो. प्रस्तुत विषयाच्याच संदर्भात ताराबाईच्या कार्यकर्तृत्वाचा विचार करावयाचा झाल्यास आक्रमक विस्तारवादी धोरण हे त्यांचे वैशिष्ट्य दिसते. औरंगजेब सह्याद्रीच्या कड्यावर धडका मारत असता त्याचे नितीधैर्य खचविण्यासाठी ताराबाईंनी त्याच्या लांबलांबच्या सुम्यात आपली लष्करे घुसविली. ताराबाई काळात मराठी फौजा वऱ्हाड, खानदेश, गुजराथ, माळवा, तेलांगण, कर्नाटक या मुलखात घुसल्या. आपल्या दक्षिणच्या मोहिमेची फळे आपल्या डोळ्यादेखत बादशहाला पहावी लागली. मराठ्यांच्या या धुमाकुळीने बादशहा अगदी वैतागून गेला. दीनवाणी बनला. कवी देवदत्त याने ताराबाईचे काव्यात्म मूल्यमापन केले आहे. तेच योग्य होय असे म्हटले पाहिजे. तो म्हणतो -[११२]

दिल्ली झाली दीनवाणी
दिल्लीशाचे गेले पाणी
ताराबाई रामराणी
भद्रकाली कोपली ॥
रामराणी भद्रकाली
रणरंगी क्रुध्द झाली
प्रलयाची वेळा आली
मुगल हो सांभाळा ॥

देवदत्त म्हणतो त्याप्रमाणे खरोखरच दिल्लीच्या सिंहासनाची लाज गेली होती. त्याची अप्रतिष्ठा झाली होती. मोंगलांच्या दृष्टीने हा प्रलयकालच होता. या प्रलयकालात मोंगलांची इभ्रत बुडत चालली होती आणि खुद्द मोगल बादशाहीच्या भव्य इमारतीवर या प्रलयाच्या लाटा धडकू लागल्या होत्या. त्याचे श्रेय ताराबाईला द्यायला काही हरकत असू नये.

**<u>धनाजी जाधव, कृष्णा सावंत आणि हिंदूराव घोरपडे -</u>**

संताजी घोरपडे प्रमाणेच धनाजी जाधवाने मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दात महत्वपूर्ण कामगिरी बजावली. तिची दखल घ्यायलाच हवी. राजारामाच्या कारकीर्दीत त्याच्या पराक्रमास धार आली. नाशिकपासून जिंजीपर्यंत एकसारख्या मोहिमा संताजी-धनाजी यांनी काढल्या होत्या. तथापी मराठ्यांच्या सेवेत तो शिवाजीपासूनच होता आणि शिवाजीच्या नजरेसही त्याचा पराक्रम आला होता. राजाराम जिंजीस गेल्यावर महाराष्ट्रात धनाजीने अजब पराक्रम करुन बादशाही फौजांवर विजय मिळविले होते. म्हणून राजारामाने त्याला जयसिंह राव हा किताब दिला होता.

१६९८ ते १७०० या काळात म्हणजे राजाराम जिंजीहून महाराष्ट्रात परत आल्यापासून ते त्याच्या अंतकाळापर्यंत धनाजीने मोघली फौजांशी अनेक लढाया देवून त्यांना घायकुतीस आणले होते. राजारामाच्या मृत्यूनंतर ताराबाईच्या काळातही धनाजीने आपल्या लष्करी मोहीमा बडोद्यापासून कारवारपर्यंत चालूच ठेवल्या होत्या. मोघलांची अनेक

नगरे मारली अनेक शत्रू सैनिक कैद करुन आणले, खुद्द बादशाही छावणीवरही हल्ले गेले. बादशाहीस हवालदील करुन सोडले. छ.शाहू मोघलांच्या कैदेतून सुटून आल्यावर धनाजी त्यास जावून मिळाला. ताराबाई-शाहू यांच्या युध्दात तो अचानक शाहूच्या बाजूने लढला. त्याच्या आगमनाने शाहू विजयी ठरला. १२ जानेवारी १७०८ रोजी शाहूने स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. त्यावेळेस त्याने ज्या नेमणूका केल्या त्यावेळेस धनाजीला त्याने सेनापतीपद दिले. परंतू पुढे अल्पावधीतच जून-जुलै १७०८ मध्ये मराठ्यांचा हा महान सेनापती स्वर्गवासी झाला.

कृष्णा सावंत हा मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दातील एक महत्वाचा माणूस. १६९९ मध्ये त्यानेच प्रथम नर्मदा पार करुन मराठी सत्तेच्या विस्ताराचा मार्ग मोकळा केला होता. असे तारीखे दिलकुशाचा लेखक भिमसेन सक्सेना म्हणतो.[११३] अशा या महत्वाच्या माणसाचा एकही उल्लेख मराठी कागदपत्रात मिळत नाही. वरील ग्रंथाच्या आधारेच यदुनाथ सरकार, वा.सी.बेंद्रे, सेतुमाधवराव पगडी, वि.गो.दिघे इ. नी आपापल्या ग्रंथांमध्ये कृष्णा सावंताच्या नर्मदा पार होण्याचा व नर्नदा पार करणारा तो पहिला मराठा वीर एवढाच उल्लेख केलेला आढळतो. त्यापेक्षा अधिक माहिती मिळत नाही. वाकसकरांनी आपल्या शिवचरित्रात कृष्णा सावंत शिवाजीस येऊन भेटल्याचा उल्लेख केलेला आहे.[११४] शिवाजीने त्याला कुडाळची देशमुखी देवून तेथे मुख्य नेमल्याचेही वाकसकरांनी म्हटले आहे. तथापी राजारामाच्या काळात नर्मदा पार करणारा कृष्णा सावंत हाच का हे नक्की सांगता येणे अवघड आहे. परंतू शिवाजीकडे १६६४ मध्ये आलेला कृष्णा सावंतच १६९९ मध्ये नर्मदा पार झाला असणे शक्य आहे.

कृष्णा सावंताने नर्मदा पार केली तरी हिंदूराव घोरपडेंनी प्रामुख्याने महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशात आपली चमक दाखविली. हिंदूराव घोरपडेचे मूळ नांव बहिर्जी. संताजीने तुळापूरच्या बादशाही छावणीवर हल्ला करुन तंबूचे कळस कापून आणले. त्या मोहीमेत बहिर्जी घोरपडे होता. घोरपडे बंधूंच्या कामगिरीवर खूष होवून राजाराम महाराजांनी बहिर्जीस हिंदूराव हा किताब दिला होता.[११५] भिमसेन सक्सेनाही त्याने दक्षिणेत धामधूम उडविल्याचे नमूद करतो व दख्खनी लोक त्याला हिंदूराव या नावाने संबोधित होते असे सांगतो.[११६] तथापी यापेक्षा अधिक माहिती त्याच्याविषयीची मराठी कागदपत्रांत मिळत नाही. जयसिंगराव पवारांनी आपल्या महाराणी ताराबाई या ग्रंथात एक-दोन पृष्ठांमध्ये हिंदूराव आणि कृष्णा सावंत यांची वेगळी दखल घेतलेली आढळते.

### २-v) **छत्रपती शाहूचे महाराष्ट्रात आगमन -**

इ.स.१७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला व बादशाही करिता त्यांच्या मुलांच्यात तंटे सुरु झाले. दक्षिणच्या सुभ्यांपैकी गोवळकोंडा आणि विजापूर हे दोन प्रांत कामबक्षकडे होते. आज्ञमकडे बाकीचा भाग होता. पण दिल्लीचे तख्त घेवून स्वत: बादशहा व्हावे असे प्रत्येकालाच वाटत होते. त्यामुळे कामबक्षने उत्तरेत प्रयाण केले. पण उत्तरेत प्रयाण केल्यावर दक्षिणेत मराठी अंमल निर्भयपणे सुरु होईल व पुढे मराठे उत्तरेत सुध्दा आपणांस त्रास देण्यास काही कमी करणार नाहीत हे आज्ञम जाणून होता. तेव्हा मराठ्यांस काही काळ तरी गुंतवून ठेवणे आवश्यक होते. तो उद्योग म्हणजे त्यांनी आपापसांत भांडत राहणे होय. आज्ञम हिंदूस्थानच्या वाटेवर असता त्याचा सरदार झुल्फिकारखान

याने मराठ्यांना आपापसांत झुंजत ठेवण्याची नामी युक्ती सांगितली. आझमशाहलाही युक्ती पसंत पडली. ती युक्ती म्हणजे बादशाही कैदेतील शाहू राजाची सुटका करणे होय. शाहूची अशी सुटका केल्यास तो ताराबाईशी दक्षिणेत जाऊन भांडून आपला हिस्सा घेईल. परिणामी मराठ्यांचे दोन पक्ष होतील व सहाजिकच मराठे सरदार विभागले जातील अशी त्याची युक्ती होती. ही युक्ती स्वाभाविकच आझमशाहाला पसंत पडली आणि त्याने ८ ते १७०७ च्या सुमारास शाहूस सोडले. त्यावेळी बादशहाची छावणी नेमाड प्रांतात होती.

शाहू सुटून महाराष्ट्रात आला त्यावेळेस त्याचा बादशहाशी एक तोंडी करार झाला. तो करार असा.मोगल साम्राज्याचा जहागीरदार म्हणून शाहूने शिवाजीच्या स्वराज्यावर राज्य करावे. २) गरज पडेल तेव्हा त्याने आपली फौज घेऊन बादशहाची चाकरी करावी ३) दक्षिणेतील सहा सुभ्यातून त्याने चौथाई व सरदेशमुखी वसूल करावी १३७ कैदेतून सुटका झाल्यापासून मराठी सरदारांना पत्रे लिहून आपल्या सेवेत रुजू होण्याचे आवाहन शाहू करु लागला होता. त्याच्या आवाहनाला महाराष्ट्रातील सरदारांनी व सेनानींही चांगलाच प्रतिसाद दिला. तथापि ताराबाईनी छत्रपती पदाचा खरा वारस कोण? असा सवाल केला व मुद्दा मांडला की, शिवाजी महाराजांचे राज्य त्यांच्या पुत्राने - संभाजीने धुळीला मिळविले नंतर राजाराम महाराजांनी अपार श्रमसायास घेऊन स्वपरामुमे नूतनच राज्य संपादिले [११७] तथापि ताराबाईचा हा मुद्दा किती फोल होता हें सिध्द करण्यास राजारामाचेच एक प्रकाशित पत्र पुरेसे आहे. ते पत्र शंकराजी नारायण यांस लिहिले आहे. पत्रात म्हटले आहे की, '' चिरंजीव (शाहू महाराज) कालेकरुन श्री देशी (स्वराज्यात) आणील ते (शाहू) मुख्य सर्व राज्यास अधिकारी आम्ही करिता तरी त्यांचे साटीच आहे. प्रसंगास सर्व लोकस तिकडेच (शाहूकडेच) पहाणे येईल व वागतील हे कारण ईश्वरीच नेमिले आहे.[११८] राजारामाच्या शब्दात प्रचंड स्वार्थत्याग भरलेला आहे. राज्याचा खरा वारस शाहूच होय यास राजारामाच्या वरील पत्रामुळे तरी अन्य पुराव्याची गरज नाही.

तथापि शाहू महाराष्ट्रात आल्यावर व्हावयाचे तेच झाले. ताराबाई शाहू झगडा झाला. त्यात ताराबाईकडील धनाजी जाधवासारखी माणसे देखील शाहूकडे आली. शाहू यादवीत विजयी ठरला. १२.०१.१७०८ रोजी त्याने स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. व अष्ट प्रधानांच्याही नेमणूका केल्या.

राज्याभिषेकापासून मृत्यूपर्यंत ४२ वर्षे शाहूची कारकिर्द झाली, म्हणजे मोघमपणे अर्धशतक पावेतो त्याची छाप मराठी शाहीवर पडलेली दिसते. आणि या काळात मराठशाहीचे जे रुपांतर झाले त्याचे जनकत्व शाहूकडे येते. राज्यकर्ता या नात्याने शाहूच्या उद्योगाचा जर कोणता विशिष्ठ व ठळक परिणाम झाला असेल तर तो हा एकच की, राज्यकारभारास लागणाऱ्या हरएक पेशात त्याने असंख्य माणसे नवीन तयार केली.

अशा असंख्य माणसांपैकी एक म्हणजे बाळाजी विश्वनाथ भट होय. मराठ्यांचा पुढचा सगळा इतिहास या भट घराण्याशी निगडीत आहे. भट घराण्यावर शाहू छत्रपती या नात्याने एवढा प्रसन्न झाला होता की, बाळाजी पासून मराठ्यांचे पेशवेपद त्या घराण्याकडे देण्याचाच शिरस्ता त्याने कायम केला.

**पेशवा पद –**

पेशवा पद हे मराठ्यांच्या इतिहासात काही शाहूच्या वेळेस एकाएकी निर्माण झाले व ते बाळाजी विश्वनाथ भट यांचेकडे आले असे नाही. बाळाजी पेशवेपदावर येण्यापूर्वी मराठेशाहीत एकूण ६ अधिकारी पेशवे पदावर होते. [११९]

**भट घराण्याकडे पेशवाई -**

बाळाजी विश्वनाथ भट ह्यांनी शाहू महाराजांच्या कारकिर्दीच्या प्रारंभी आणि त्यापूर्वीही अनेक पराक्रम केले होते. त्यामुळे बहिरोपंत पिंगळ्यांनंतर बाळाजी विश्वनाथ भट यांना १७ नोव्हेंबर, सन १९१३ रोजी शाहू महाराजांकडून सातारकर छत्रपतींच्या पेशवा पदाची वस्त्रे मिळाली. ऐतिहासिक पेशवाईचा हाच खरा प्रारंभ. [१२०]

**पेशवाईचा उत्कर्ष होण्याची कारणे –**

छत्रपती शाहूच्या अडचणी हे पेशव्याच्या उत्कर्षाचे प्रमुख कारण होय असे डॉ.एच.एम.सिन्हा म्हणतात, शाहू महाराष्ट्रात आला त्यावेळेस महाराष्ट्रात अशांतता होती. त्याला अनेक बिकट प्रसंगांना तोंड द्यावे लागत होते. परिस्थितीवर मात करण्याचे धाडस शाहूजवळ नव्हते तथापि त्याच्याजवळ गुणग्राहकता भरपूर होती. त्याने पेशव्याना अचूक हेरले. पेशव्यानेही त्याचे डळमळीत आसन स्थिर करुन मराठ्यांच्या कारभाराची व्यवस्था ठरविण्यात शाहूस मदत केली. म्हणून शाहूने त्यास पेशवेपदावर नेमिले. [१२०]

महाराष्ट्रातील बहुतेक सर्व मराठे सरदार अतिशय स्वार्थी व संकुचित वृत्तीचे झाले होते. परिस्थितीमुळे राजारामाने सुरु केलेल्या जहागिरी पध्दती मुळे मराठेशाहीत बराच मोठा सरंजामी वर्ग तयार झाला होता. शाहूच्या दरबारातील प्रतिनिधी, जाधव, दाभाडे, भोसले, आंग्रे हे सर्वच सरदार स्वार्थी होते. साहजिकच शाहूचा प्रामाणिक पेशव्यावर विश्वास जडला. अर्थात त्याचा अर्थ पेशवा बाळाजी विश्वनाथ भट स्वार्थी नव्हता असा याचा अर्थ नव्हे '' आंग्रे प्रकरण मिटवा मग तुम्हास पेशवे पद देऊ'' असे शाहू सांगतो त्यावर बाळाजी विश्वनाथ ''पेशवे पद अगोदर द्या, मग आंग्र्यांचा बंदोबस्ताचे काम करतो असे बाळाजी म्हणतो यावरुनच त्याचा पेशवापदाचा स्वार्थ लक्षात येतो. तथापी इतरांपेक्षा शाहूला बाळाजीच जास्त भरवशाचा माणूस वाटत होता हेच खरे.

खेडच्या लढाईत जरी शाहूने ताराबाईचा पराभव केला असला तरी तिचा पूर्ण मोड झाला नव्हता. कारस्थानी ताराबाई ने शाहूची बाजू लंगडी करण्याकरिता काही सरदारांना चिथावून त्याच्या प्रदेशात धुमाकूळ घालण्यास प्रोत्साहन दिले. तिनेच छत्रपतींच्या घराण्यात दुहीचे विष कालविले. आणि सातारा व कोल्हापूर या रुपाने मराठी राज्याची दोन शकले केली. राजघराण्यात प्रभुत्वाकरिता चाललेल्या या संदर्भात पेशव्यांना आपली सत्ता वाढविण्यासाठी आपोआपच संधी मिळाली. शिवाजीच्या मृत्यूनंतर अष्टप्रधान मंडळ जवळ जवळ नष्टच झाले होते. राजारामाने या व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करुन त्यात प्रतिनिधी हे नवे पद जोडले. त्यावेळी स्वातंत्र्यसंग्राम जोरात चालू असल्याने अष्ट प्रधानांपैकी अमात्य, सेनापती व प्रतिनिधी हे मंत्री विशेष कार्यमग्न होते. शाहूच्या कारकिर्दीत पेशवे सोडल्यास अष्टप्रधान मंडळातील अन्य व्यक्ती कर्तृत्वहीन होत्या. त्यामुळे पेशव्यांचे महत्व वाढले.

दक्षिण हिंदुस्थानात मराठ्यांचा कट्टर शत्रू म्हणजे हैद्राबादचा निजाम. त्याने शाहूवर अनेक गंडांतरे आणली. अशा उपद्व्यापी माणसांना पुरुन उरण्यासाठी शाहूला पेशव्यांसारख्याची गरज भासली. पेशव्यांनी ती गरज पूर्ण केली.

पेशव्यांच्या उत्कर्षाला त्यांची व्यक्तिगत पात्रताही कारणीभूत ठरली बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, बाळाजी बाजीराव हे सर्व पेशवे शूर, मुत्सद्दी, चारित्र्यसंपन्न व बुध्दीमान होते. शिवाय ते शाहूशीही स्वामीनिष्ठ होते. अशा सर्व अनुकूल परिस्थितीत पेशव्यांचा उत्कर्ष झाला. त्यांच्या उत्कर्षाबरोबरच मराठी सत्तेचाही विस्तार झाला. तो विस्तार विशेषत: उत्तरेकडे झाला. उत्तरेकडे जाणारा पहिला पेशवा म्हणजे बाळाजी विश्वनाथ त्याने १७१९ मध्ये दिल्लीच्या बादशहाकडून मराठ्यांसाठी ज्या सनदा आणल्या त्यामुळे त्याची किर्ती सर्वत्र पसरली. पण त्याही अगोदर पासून तो राजकारणात होता. किंबहुना हळूहळू तो वरच्या पदापर्यंत पोहचला.

**<u>बाळाजी विश्वनाथ भट (१७१३ ते १७२०) –</u>**

मुंबईच्या दक्षिणेस सावित्री नदीच्या उत्तरेस श्रीवर्धन म्हणून गाव आहे आणि दक्षिणेस वेळास हे एक खेडे आहे. बाळाजी विश्वनाथ भट यांचे घराणे श्रीवर्धनचेच होय. बाळाजी विश्वनाथ हा विसाजी पंताचा क्रमांक चारचा मुलगा होय. त्याचा जन्म सन १६६० मध्ये झाला असावा. बालवयात त्याने सिद्दीच्या जुलुमांच्या कथा ऐकल्या होत्या. राजा शिवाजी व त्याचे पराक्रम याविषयीही त्याने ऐकले होते व त्याची चाकरी करावी अशी त्याची महत्वाकांक्षा होती. परंतु प्रत्यक्षात त्याने राजारामाची कारकिर्द पाहिली असून रामचंद्रपंत अमात्याचा मराठ्यांचा कारभार व औरंगजेब बादशहाचा मोगल कारभार त्यास पूर्ण परिचित होता. राजारामाच्या कारकिर्दीतच तो पुण्याच्या सर सुभेगिरीवर होता. तो उत्तम वसुली अधिकारी होताच. परंतु तो उत्तम लष्करी अधिकारीही होता. भीमेच्या काठी औरंगजेबाची छावणी असताना (१६९५-९९) बाळाजीने औरंगजेबाच्या धाकट्या मुलीच्या (झेप-उन्निसा बेगम) वतीने गं.भा.येसूबाई यांची पुण्याचा सरसुभेदार या नात्याने उत्तम बडदास्त ठेवली होती. शाहू व बाळाची यांचा पहिला परिचय याच काळात झाला असावा. १५२ शाहूचे व त्याचे पुढील गोष्टीबद्दल सूतोवाच याच वेळी झाले असले पाहिजे. बाळाजीने आपली लष्करी चुणूक अहमदाबादवर हल्ला करुन व २ लक्ष १० हजार रुपये मिळवून इ.स. १७०७ मध्ये दाखवून दिली होती. अशाप्रकारे शाहूच्या आगमनापूर्वीच बाळाजीने आपले लष्करी सामर्थ्य दाखवून दिले होते. शाहूच्या सुटकेनंतर तो त्याला जावून मिळाला. त्यामुळे शाहूला त्याचा फारच उपयोग झाला. शाहूला बाळाजीने केलेली मदत व त्याचा पूर्वीचा पराक्रम पाहूनच शाहूने त्याला १७१३ मध्ये पेशवेपदाची वस्त्रे दिली. पेशवा म्हणून सत्तेवर आल्यावर बाळाजीने आंग्र्यांशी शाहूचा समेट घडवून आणला. त्यामुळे मराठी राज्याचा फायदाच झाला असे म्हटले पाहिजे.

कान्होजी प्रमाणे शाहूला विरोध करणारे मराठे म्हणजे खटावकर, निंबाळकर, चव्हाण इ. या सर्वांचाच बंदोबस्त बाळाजीला करता आला असे नव्हे, पण त्याने तसा प्रयत्न केला.

बाळाजीला कदाचित स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त करण्यात कमीअधिक यशापयश आले असेल तथापि बाळाजीची

मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत महत्वाची कामगिरी म्हणजे त्याची दिल्ली स्वारी व सनदांची प्राप्ती होय. प्रस्तुत शोध प्रबंधाच्या विषयानुसार तर तेच त्याचे महत्वाचे कार्य !

**मराठे दिल्लीत – सनदांची प्राप्ती –**

औरंगजेब बादशहा वारल्यानंतर त्याच्या मुलांच्यात गादीसाठी झगडे झाले. त्यात त्याचा थोरला मुलगा मुअज्ज़म विजयी झाला. त्याने बहादूरशहा किताब धारण केला व तो दिल्लीच्या तख्तावर बसला. पुढे १७-०२-१७१२ रोजी तो लाहोर येथे मरण पावला. त्याचा मुलगा जहांदरशहा गादीवर बसला. एक वर्षाच्या आत बहादूरशहाचा नातू फरुकसियर याने सय्यदांच्या सहाय्याने जहांदरशहाचा खून करुन ता. ११-०१-१७१३ रोजी बादशाही तख्त म्ळिविले. फरुकसियरची कारकिर्द १७१९ पर्यंत राहिली. बादशहीतील या घडामोडींकडे शाहूराजांचे नेहमी लक्ष असे. दिल्लीतील या घडामोडी व कारस्थानांनीच मराठ्यांना दिल्लीच्या राजकारणात ओढले.

फरुकसिअरला गादीवर बसविण्यात सय्यद हसन अली व सय्यद हुसेन अली यांनी महत्वाची भूमिका बजाविल्यामुळे सय्यद बंधूंचे बादशाही राजकारणात बरेच महत्व वाढले. परंतु लवकरच त्यांचे पटेनासे झाले. सय्यद बंधूंची जोडगोळी फोडण्याच्या दृष्टीने बादशहाने सय्यद हुसेन याला दक्षिणेच्या सुभेदारीवर रुजू केले. सय्यद हुसेनने मराठ्यांशी बादशहातर्फे एक करार केला. तो असा –

१) शिवाजीच्या वेळेचे स्वराज्य, तमाम गडकोटसुध्दा शाहूंचे हवाली करावे. २) खानदेश, गौंडवन, वऱ्हाड, हैद्राबाद, कर्नाटक या भागात मराठ्यांनी जिंकलेले प्रदेश मराठ्यांना मिळावेत. ३) द.चौथाई सरदेशमुखी मराठ्यांनी वसूल करावी. ४) शाहूने १५ हजार फौज मोगलांच्या मदतीस द्यावी. ५) कोल्हापूरच्या संभाजीस शाहूने उपद्रव करु नये. ६) मराठ्यांनी दरसाल १० लाख रुपये बादशहास खंडणी द्यावी. ७) येसूबाई वगैरेची सुटका करावी. [१२१]

या करारावर सरदेसाईंचे भाष्य असे ,''मराठा मंडळाचे लक्ष घरगुती भांडणातून काढून बाहेरच्या उद्योगात लावण्याचा बाळाजीचा मतलब सिध्दीस गेला, आणि मराठ्यांच्या उद्योगास नवीन क्षेत्र प्राप्त झाले. बादशाहीच्या तैनातीस आपली फौज देणे म्हणजे त्याच्या संरक्षणाची हमी आपल्याकडे घेतल्यासारखे होते. मात्र शाहूने बादशहास खंडणी कबूल केली याचा अर्थ शिवाजीच्या वेळेचे स्वातंत्र्य सोडून त्याने बादशहाची ताबेदारी पत्करली चौथाई सरदेशमुखीचे हक्क मिळाल्यामुळे बाहेर संचार करण्याची मोकळीक मराठ्यांना प्राप्त झाली. काम पडेल तिकडे बादशहाची सेवा करण्याचे त्यांनी पत्करिले. स्वहित सांभाळण्यासाठी आजूबाजूच्या सत्ताधीशांसंबधाने चढावाची राज्यपध्दती स्वीकारावी लागते तसा बहुतेक प्रकार मराठ्यांचा झाला. अर्थात या तहाने मराठेशाहीच्या कारभारास निराळे वळण लागले. नवीन जबाबदारी व नवीन कर्तव्ये उत्पन्न झाली. पूर्वीची व्यवस्था बदलली. नवीन मनु सुरु झाला. मराठशाहीचे हे रुपांतर बाळाजी पेशव्याने उपस्थित केले. आणि पुढील पुरुषांनी त्याच्या परिपोषाचा उद्योग केला. [१२२]

**मराठे दिल्लीत –**

सय्यद हुसेनने केलेला करार बादशहास मान्य नव्हता. त्याचे व दिल्लीतील सय्यद हुसेनचे वितुष्ट शिगेस

पोहोचले होते. डोईजड झालेल्या सय्यदचा काटा काढण्यासाठी बादशहाने मुरादाबादहून निजामी, पाटण्याहून सरबुलंदखान, गुजरातेतून अजितसिंग या सुभेदारांना बोलाविले. दिल्लीत या सुभेदारांच्या फौजा येऊ लागल्या. परिस्थिती ओळखून सय्यद हसन यास ताबडतोब दिल्लीत बोलाविले. मराठ्यांना त्यांनी मदतीस घेतले. दिल्लीस जाण्याचे हे कारस्थान छ.शाहू व बाळाजी यांनी अंगावर घेतले. सय्यद हुसेन व मराठे फेब्रुवारी १७१९ मध्ये दिल्लीस पोहचले. २९-०२-१७१९ रोजी सय्यद बंधूनी फर्रुखसिअरला पदच्युत करुन रफीउद्दीरजात यास बादशाही तख्तावर बसविले. दरम्यान झालेल्या दंगलीत मराठ्यांचे दोन हजार माणसे कापली गेली. पण मराठ्यांना बादशहाचे वतीन ०३-०३-१७१९ रोजी चौथाई व १५-०३-१७१९ रोजी सरदेशमुखीचा करार करण्यात आला. सरदेसाई म्हणतात, ''गुजराथ माळवा या प्रांताच्या सनदाही मिळवाव्या अशी शाहूची ताकीद बाळाजीस होती, पण ती सिध्दीस गेली नाही. तथापि, तो उद्योग बाजीरावाने पुढे पुरा केला.''[१२३]

सरदेसाई ज्या ताकदीचा उल्लेख करतात त्याचा पुरावा मात्र देत नाही शिवाय शाहू अशी ताकीद पेशव्यास देऊ शकत होता काय? हाही प्रश्नच आहे. तथापि मराठे १७१९ मध्ये दिल्लीपर्यंत पोहोचले व त्यांनी सनदा आणल्या हाच पराक्रम पुष्कळ मोठा होता यात शंका नाही.

या करारावर शेजवलकरांसारख्यांनी गुलामगिरीच्या सनदा[१२४] वगैरे केलेली टीका लक्षात घेऊनही या करारामुळे शाहूचे महत्व वाढले. मराठ्यांना चौथाई वसूलीच्या निमित्ताने मोगली प्रदेशावर ताव मारण्याचा मोका मिळाला. दिल्लीची बादशाही अंतस्थ कलहाने पोखरली असून ती आपल्या ताब्यात आणण्यास वेळ लागणार नाही हे मराठ्यांना कळून चुकले यात वाद होण्याचे कारण नाही. याचे श्रेय तत्कालीन परिस्थितीस जसे द्यावे लागेल तसेच बाळाजीच्या कर्तृत्वाला दिले पाहिजे. पुढे बाजीरावाने साम्राज्य विस्ताराच्या दृष्टीने बाळाजीपेक्षा अधिक पराक्रम केला यात शंका नाही. पण त्याचा पाया बाळाजी विश्वनाथने घातला हे विसरुन चालणार नाही. त्यादृष्टीने सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणे बाळाजी विश्वनाथ म्हणजे मराठी साम्राज्याचा संस्थापक होय, हे जसे खरे तसेच व्यक्तिश: बाळाजी हा अत्यंत कर्तबगार होता. अनेक उलाढाली करणे, कठीण प्रसंगांना न डगमगणे, धरलेला पक्ष सिध्दीस नेणे, विरोधी पक्षांची समजूत घालणे, याबाबतीत बाळाजी निष्णात होता. बाळाजीमुळेच शाहूचे आसन स्थिर झाले व त्याच्यावरील कठीण प्रसंग टळला व त्याच्या राज्याची घडी बाळाजीने बसवून दिली हेही खरे. शाहूने बाळाजीला दिलेली अतुल पराक्रमी सेवक ही पदवी योग्यच होती. तथापि बाळाजीचे कार्य प्राप्त परिस्थितीत योग्य होते तरी ते अखेरीस मराठी राज्यास अहितकारकच ठरले. एक गोष्ट मात्र खरी की, बाळाजीने गोंधळ आणि अव्यवस्था यातून मार्ग काढून शांतता निर्माण करुन काही काळ तरी मराठी राज्य वर्धमान बनविले, यात शंका नाही.

# संदर्भ टिपा


१) स.रा.गाडगीळ (संपादक), सभासद बखर, पुणे,१९६०, पृ. १०५

२) वा.सी.बेंद्रे, छत्रपती शिवाजी महाराज, मुंबई, १९७२, पृ. १६ उपरोक्त

३) दि.वि.काळे, छत्रपती शिवाजी महाराज (तृ.आ.) पुणे, १९७१, पृ. ९

४) गो.स.सरदेसाई, मराठी रियासत, खंड १ (नवी आवृत्ती) मुंबई, १९८८, पृ. ११७

५) स.रा.गाडगीळ (संपा.) उपरोक्त, पृ. १२

६) ग.ह.खरे (संपादक) ऐ.फा.सा. खंड ३, ले. १८

७) ग.ह.खेर, निवडक लेख, पुणे, १९७२, पृ. ६४/६७

८) प्र.न.जोशी (संपादक), आज्ञापत्र, पुणे, १९६९, पृ. ४० (दु.आ.)

९) व्ही.पी.पिंगुळकर, सावंतवाडी संस्थानाचा इतिहास, सावंतवाडी, १९११, पृ. ७-८

१०) भारतीय इतिहास आणि संस्कृती, पु. ५, वर्ष २ रे, पृ. ४९

११) कित्ता, पृ. ५१

१२) स.शं.देसाई, म.इ.सा., पो. द., भाग २, मुंबई १९७४, पृ. ७/८

१३) त्र्यं.शं.शेजवलकर, श्री शिवछत्रपती, मुंबई, १९६४, पृ. ३२१

१४) स.रा.गाडगीळ, (संपा.) उपरोक्त, पृ. ८८

१५) पा.सं.पिसुर्लेकर, पोमसं, पुणे, १९६७, पृ. ६१

१६) स.रा.गाडगीळ, उपरोक्त पृष्ठ १२७-२८

१७) म.रि., पृष्ठ ८०

१८) वा.सी.बेंद्रे, छत्रपती संभाजी महाराज, पुणे, १९६०, पृ. १७४

१९) कमल गोखले, शिवपुत्र संभाजी, पुणे, १९७१, पृ. २३ (दु.आ.)

२०) स.रा.गाडगीळ, (संपा.), उपरोक्त, पृ. ८४

२१) वा.सी.बेंद्रे, उपरोक्त, पृ. ३९४

२२) कमल गोखले, उपरोक्त, पृ. १२८

२३) स.शं.देसाई, शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, कोल्हापूर, १९७७, प.क्र.८६ पृ.८७

२४) स.शं.देसाई, पोर्तुगीज - मराठे संबंध, मुंबई, १९८९, पृ. ७७

२५) स.शं.देसाई, संभाजी आणि पोर्तुगीज (संभाजी स्मारक ग्रंथ), पृ. २१५

२६) कित्ता, पृ. २१८

२७) स.शं.देसाई, जुवे घेतल्याचा उल्लेख करतात, पोर्तुगीज - मराठे संबंध, पृ. ८६/८७

तर डॉ.पिसुर्लेकर म्हणतात, जुवे बेट संभाजीने काबीज केल्याचा मराठी साधनांमध्ये आधार नाही. जेथे शकावलीत ''मार्गशीर्ष मासी फिरंगीयांचे कुंभार जुवे घेतले'' अशी नोंद आढळते. पण कुंभार जुवे घेतल्याचा पोर्तुगीज दफ्तरामध्ये आधार नाही - पोर्तुगीज - मराठे संबंध, पुणे, १९६७, पृ. १०६

२८) स.शं.देसाई, पोर्तुगीज - मराठे संबंध, पृष्ठ ८६/८७

२९) कित्ता, पृ. ९०

३०) कित्ता, पृ. ९३

३१) कित्ता, पृ. ९४

३२) पां.सं.पिसुर्लेकर, उपरोक्त पृ. १०९

३३) कित्ता, पृ. ११३-१५

३४) कित्ता, पृ. १२०

३५) कित्ता, पृ. १२५

३६) कित्ता, पृ. १२६

३७) कित्ता, पृ. १२७

३८) कित्ता, पृ. १२८

३९) सेतुमाधवराव पगडी, मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द, पुणे १९६२, पृ. ३५

४०) मनूची (अनु.) ज.स.चौबळ, असे होते मोगल, मुंबई, १९८२, पृ. २०३/७४

४१) म.रि. खंड २, पृ. ९५

४२) सेतुमाधवराव पगडी, म.स्वा.यु., पृ. ४३

४३) का.ना.साने (संपादक), चिटणीस बखर, पुणे १९१५, पृ.२३ (ति.आ.)

४४) सेतुमाधवराव पगडी, म.स्वा.यु., पृ. ४२

४५) वि.का.राजवाडे, म.इ.सा., खंड ५, लेख ६

४६) G.H.Khare, Select Articles, Pune 1962, p. 111

४७) सेतुमाधवराव पगडी, मो.म., पृ. १४३

४८) स.शं. देसाई, पो.म.सं., पृ. ९६

४९) कित्ता आणि पिसुर्लेकर, उपरोक्त, पृ. १२९

५०) म.रि. खंड २, पृ. १६३-६४

५१) म.रि. खंड ३, पृ. ९६

५२) सेतुमाधवराव पगडी, मो.म., पृ. १४३

५३) शि.च.सा. खंड ६, पृ. ७/९८

५४) स.शं.देसाई, पो.म.सं., पृ. ९६

५५) कित्ता

५६) पिसुर्लेकर, उपरोक्त, पृ.१२९

५७) कित्ता पृ. १३०

५८) कित्ता पृ. १३०-१३१

५९) कित्ता

६०) स.शं.देसाई, शि.पो.का., कोल्हापूर १९७७ पृ. ११८

६१) कित्ता

६२) कित्ता पृ. ११९

६३) स.शं.देसाई, पो.म.सं., पृ. १००

६४) सेतुमाधवराव पगडी, हि.स्व.मो. पृ. ५२

६५) म.रि. खंड २, पृ. २४१

६६) जयसिंगराव पवार, महाराणी ताराबाई, कोल्हापूर १९७५ प्रस्तावना, पृ. २१

६७) श.ह.वर्टीकर, का.से.घ.का., कोल्हापूर १९७१, पृ. १७

६८) कित्ता लेख ९८, पृ. १०८

६९) वि.का.राजवाडे, म.इ.सां., खंड १५, पृ. ३५१

७०) ही लढाई कासीमखानाबरोबर झाली हे ठिकाण कर्नाटक राज्यातील चित्रदुर्ग भागात आहे चित्रदुर्गच्या पूर्वेला २२ मैलांवर !

७१) म.रि. खंड २, पृ. १७७ ते ८०

७२) डॉ.अप्पासाहेब पवार (संपादक), ता.का., खंड १, कोल्हापूर १९६९, पृ.१०६

७३) कित्ता पृ. १५

७४) सेतुमाधवराव पगडी, म.स्वा.यु., पृ. ४८

७५) कित्ता पृ. ४९

७६) सेतुमाधवराव पगडी, हिं.स्व.मो., पृ. २३०

७७) पुणे पुराभी लेखागारातील अप्रकाशित कागदपत्रे दफ्तर क्र. १, पुडके क्र. १, कागद क्र. ७

७८) सेतुमाधवराव पगडी, मो.म., पृ. १६३

७९) कित्ता, पृ. १४३

८०) सेतुमाधवराव पगडी, मो.म.सं., पृ. १२१

८१) सेतुमाधवराव पगडी, मो.द.बा., खंड १, मुंबई १९७८, प्रस्तावना पृ. २२

८२) सेतुमाधवराव पगडी, मोम. पृ. १५७

८३) पिसुर्लेकर, उपरोक्त पृ. १३४,

८४) कित्ता

८५) पगडी, म.स्वा.यु., पृ. ८१

८६) कित्ता

८७) डॉ.आप्पासाहेब पवार, उपरोक्त, पृ. ६१-६२

८८) कित्ता, पृ. १४३-४४

८९) कित्ता, पृ. १४५ ते ४८

९०) कित्ता, पृ. १७४

९१) कित्ता, पृ. १५९-६०

९२) कित्ता, पृ. १६४-६५

९३) स.शं. देसाई, मो.प.सं., पृ. १०६

९४) पिसुर्लेकर, उपरोक्त, पृ. १३५

९५) डॉ.आप्पासाहेब पवार, उपरोक्त, पृ. २०९

९६) कित्ता, पृ. २२२-२३

९७) Grant Duff - History of Marathas p. 422

९८) वासुदेव शास्त्री खरे, इचलकरंजी संस्थानचा इतिहास, पृ. २३

९९) वि.गो.खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास, खंड २, मुंबई १९८८, पृ. १५

१००) म.रि.खंड ३, पृ. ९६,

१०१) स.शं.देसाई - पो.म.सं. पृ. ११०

१०२) खोबरेकर, उपरोक्त, पृ. ३१

१०३) म.रि., खंड ३, पृ. ११२-१३

१०४) कित्ता, पृ. ११३-१४

१०५) कित्ता, पृ. ११४-१५

१०६) देसाई, पो.म.सं., पृ. ११४

१०७) कित्ता

१०८) सेतुमाधवराव पगडी, म.स्वा.यु., पृ. १०९

१०९) म.गो.रानडे, मराठी सत्तेचा उदय, पृ. १४५-४६

११०) सेतुमाधवराव पगडी, मो.स्वा.यु., पृ. १११

१११) म.रि. खंड २, पृ. ३१६

११२) डॉ.आप्पासाहेब पवार, उपरोक्त, पृ. ८ ते ११

११३) सेतुमाधवराव पगडी, मो.म., पृ. १४३

११४) वी.स.वाकसकर, शिवाजी व शिवकाल, मुंबई १९३०, पृ. १७२

११५) श.ह. वर्टीकर, उपरोक्त, पृ. १०८

११६) पगडी, मो.म., पृ. १४३

११७) वा.सि.बेंद्रे (संपादक), महाराष्ट्रेतिहासाची साधने, खंड २, मुंबई १९६६, पृ. २८३-८४

११८) वि.का.राजवाडे, संपादक, म.इ.सा., खंड ३, पृ. ५१

११९) द.ब.पारसनीस, (संपादक), शा.रो., पृ. ४१-४२

१२०) H.N.Sinha, Rise of Peshwas, Alahabad 1954, p.15

१२१) वि.का.राजवाडे, म.इ.सा., खंड ८, लेख ७८

१२२) म.रि. खंड ३, पृ. १४२

१२३) किता, पृ. १५०

१२४) त्र्यं.शं.शेजवलकर, नि.पे. सं., पुणे १९६३, पृ. १३